रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, २३ एप्रिल २०२३

# कथा!

## महाराष्ट्रात सत्तेच्या भूकंपाची अन् पत्रकारांकडून 'लांडगा आला रे आला'ची

आधुनिक केसरी

**एका गुराख्याची कथा प्रसिध्द गोष्ट आहे,तो गुरांची राखण करतांना रोज 'लांडगा आला रे आला' असे ओरडायचा,आजूबाजूचे लोक त्याचा आवाज ऐकून मदतीसाठी धावून येत असत.पण लांडगा आलेला नसतो, तो लोकांना बघून,आपण त्यांना मूर्ख बनविल्याचे समजून हसतो! तो अनेक दिवस करतो! खरच एक दिवस लांडगा येतो,तो मदतीसाठी आरडा ओरड करतो,पण लोक आता ओरडण्यावर विश्वास ठेवत नाहीत. शेवटी लाडंगा येतो,गुरांचा फडसा पाडतो! तसेत मराठी वृत्त वाहिन्यांचे झाले आहे! त्यांनी आठ दिवसापासून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवारांना लक्ष्य केले व ते भाजपा जाणार! महाराष्ट्रात सत्तेचा भूकंप होणार !असे धांदात खोटे वृत्त दिले ! पण पवार ना भाजपात गेले ना महाराष्ट्रात सत्तेचा भूकंप आला.अश्या वृत्तामुळे मात्र पत्रकारितेच्या विश्वासर्हतेवर प्रश्नचिन्ह मात्र निर्माण झाले आहे.**

भारतीय राज्य घटनेच्या कलम १९( १ )मध्ये भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य देण्यात आले आहे.मात्र हे स्वातंत्र्य अनिर्बंध नाहीत. कलम २ नुसार स्वातंत्र्यावर मर्यादा घालण्यात आलेल्या आहेत.पण राज्य घटनेत वृत्तपत्र स्वातंत्र्याचा उल्लेख नाही,असे सांगितले जाते. पण सर्वोच्च न्यायालयाने एस.पी. गुप्ता विरूध्द भारतीय राज्य संघ या खटल्याचा निकालात म्हंटले आहे. घटनेत वृत्तपत्र स्वातंत्र्याचा समाविष्ट ( गर्भित ) असल्याने त्याचा वेगळा व विशेष उल्लेख करण्याचे कारण नाही.याचा खुलासा घटना शिल्पकारांनी संविधान सभेत केला होता.तेंव्हा यात माहितीचा अधिकार,भाषण,अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा त्यात समावेश होता,असे म्हंटले.तेंव्हा भारतीय लोकशाही पत्रकार स्वातंत्र्याला महत्व आहे.पण त्याचप्रमाणे कायद्याने मर्यादा घातल्या गेलेल्या आहेत.त्यात भारताचे सार्वभौमत्व,एकात्मतता,राष्ट्रीय सुरक्षितता,परकीय राष्ट्रांबरोबर मैत्रीपूर्ण संबंध,सामाजिक सुव्यवस्था,नैतिकता,न्यायालयाचा अवमान, बदनामी किंवा गुन्हा करण्यासाठी प्रोत्साहन देणे,यासाठी वाजवी मर्यादा घालण्यासाठी कायदा करतो येतो! भारतात तसे कायदे आहेत.आज देशात अभिव्यक्ती स्वातंत्र्य व वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या दुरूपयोग केला जातोय.याला लगाम घातला गेला पाहिजे.भारतातील वृत्तपत्रावर मोठी जबाबदारी आहे.पण तेच सैराटपणे वागत आहेत. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षितता,सामाजिक सुव्यवस्थेला धोका निर्माण झाला आहे.यातून न्यायालयाचा अवमान व बदनामी करण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. या मिडीया कारणीभूत आहे.पूर्वी प्रिंट मिडीयाला याचे भान ठेवले होते. महाराष्ट्रात वृत्तपत्राची संख्या १९११ इतकी आहे.वृत्तपत्र हा व्यवसाय बनला आहे.अकबर इलहाबादीने म्हंटले आहे,खीचे ना कमानो को,ना तलवार निकालो,जो तोफ हो मुकाबिल तो अकखार निकालो! तेंव्हा काही वृत्तपत्र केवळ जाहीरातीपुरतेच काढले जातात.शासन मान्य वृत्तपत्राच्या खपाची आकडेवारी संकतेस्थळावर टाकली जात नाही, त्यानजर टाकली डोळे पांढरे होतील! आश्चर्य वाटेल!राज्यात लहान वृत्तपत्र मोठ्या कष्टाने व चिकाटाने काढली जातात.जेंव्हा मोठी साखळी वृत्तपत्र आली व छोटी वृत्तपत्रे संकटात सापडली.या मोठ्या वृत्तपत्राने अनेकवर्षे करोडाची कमाई करून घेतली,पण करोनाकाळात आर्थिक नुकसान झाले म्हणून त्यांनी शासनाकडे ४ हजार कोटीची मदतीची मागणी केली होती.१९८२ मध्ये तत्कालिन मुख्यमंत्री बॅ.अंतुले यांनी छोट्या वृत्तपत्राना मोठी मदत केली. त्यामुळे मोठ्या वृत्तपत्रांची पोटदुखी सुरू झाली. राजकारणातून अंतुले यांना पायउतार व्हावे लागले.प्रिंट मिडीयासाठी आचार संहिता आहे. ते म्हणजे वृत्तपत्र मंडळ कायदा १९७५ ( प्रेस कान्सील ॲक्ट१९७५ ) आहे. वृत्तपत्र मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वृत्तपत्राला मंडळाला कलम १४ नुसार समज देण्याचे अधिकार आहेत.राज्यात पत्रकाराचे अनेक प्रश्न आहेत.त्यात ग्रामीण पत्रकारांना शासन पत्रकार मानतच नाही. यात पत्रकार कोणाला म्हणावे ? याची शासन दरबारी अजून व्याख्या नाही.केवळ अधिस्वीकृती पत्रकारांना सवलती दिल्या जातात. याचा गैरफायदा घेतला जातआहे. एकाच कुटुंबातील सर्वांना अधिस्वीकृतीपत्र दिली जाते. दुसरीकडे पत्रकारांच्या अनेक संघटना व नेत्यांचे पीक आले आहेत. ही मंडळी पत्रकारांचे नावाने अधिवेशन घेवून लाखो रुपये वसूल करतात.तसेच ते शासनाकडून पैसा घेतात व सन्मान मिळवितात. या अधिवेशनाच्या खर्चा हिशोब कधीच सार्वजनिक केला नाही.



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


पत्रकार अधिवेशन कमाईचा धंदा बनला आहे.शिंदे व फडणवीस सरकारने पत्रकार समितीचे अजून पुनर्रगठण केलेले नाही. या समितीवर काही संघटनाची मक्तेदारी आहे,ती त्यांनी मोडून काढली पाहिजे. राज्य शासनाने अभ्यासू,अनुभवी पत्रकारांची समितीवर नियुक्त केले पाहिजे, असे वाटते.

भारतात दुरदर्शन १५ सप्टेंबर १९५९ मध्ये दिल्लीत सुरु झाले.नंतर १९७५ याची कक्षा अमृतसर मुंबईपर्यंत वाढविण्यात आली. १९७५ मध्ये सात शहरात प्रसारण सुरु झाले. १९८२ मध्ये रंगीत दुरदर्शन राष्ट्रीय प्रसारण सुरु झाले. पाहिली खासगी वृत्त वाहिनी जी. टी. व्ही. ऑक्टोबर १९९२ मध्ये सुरु झाली. देशातील सर्वात मोठे हिंदी वृत्तवाहिनी आहे. याचे संस्थापक सुभाषचंद्रा आहेत. आज देशात ८७२ चॅनल आहेत. यात ३६९ हे वृत्त देणारे आहेत. इलेक्टॉनिक, सोशल , डिझटल मिडीया, स्थानिक वृत्त वाहिन्यांनी तर धुमाकूळ घातलेला आहे.यावर ना केंद्र, ना राज्य सरकारचे प्रशासनाचे नियंत्रण नाही.या वृत्तवाहिन्या आचार संहितेचे पालन करतात का ? यात हिंदी मराठी वाहिन्यावर तर प्रत्येक घटना 'ब्रेकींग न्यूज' गुन्हेगारी स्वरूपाचे असते.सोशल मिडीया खोट्या अफवा फसविण्याऱ्या घटनामुळे अनेक ठिकाणी दंगे, हिंसाचार सारख्या घटना घडलेल्या आहेत.यात कल्पोकल्पित वृत्त खळबळजक 'ब्रेकींग न्यूज' नावाखाली देण्याची स्पर्धा सुरु आहे.यातून वृत्त वाहिनींची टी.आर. पी. वाढेल,आपल्याला जाहिराती मिळतील,पैसा मिळेल,या लालचेने काही माणसे क्षेत्राकडे आली आहेत. ज्या घटनामुळे हिंसाचार उसळेल, अशी दृश्य दाखवू नयेत,असे संकेत आहेत, त्याचे भान ठेवले जात नाही.तसेच वृत्त वाहिन्यावर रोज हिंदू व मुस्लिम असा थेट उल्लेख करुन धार्मिक चर्चा घडवून आणली जाते. या समाज मनावर काय पराणाम होता विचार केला जात नाही. यात धार्मिक कट्टर धार्मिकनेते एकमेकांच्या धर्मावर व देवतांवर उघडपणे टीका केली जाते. इतकेच नव्हे, हिंदी वृत्तवाहिन्या जाणीवपूर्वक पाक पत्रकारांना आणि महत्वाच्या व्यक्तींना चर्चेसाठी बोलावतात! ती माणसे भारत,सरकार विरोधात विधाने करतात! हे भारतीयांना का ऐकावयाचे वृत्त वाहिन्यावरील चर्चा नव्हे, आरडा-ओरड, गोंधळ, राजकारण,धार्मिक विषयावरच्या सतत चर्चा याचा वीट आला आहे. वृत्तवाहिन्यासाठी न्यूज ब्रॉडकास्टर्स एसोसिएन ( एन.बी.ए. )ची आचारसंहिता आहे.पण त्याचे पालन वृत्तवाहिन्यांकडून होत नाही,असे दिसतेय!

अमेरिकेत १८ जून १९७२ मध्ये वॉटरगेट प्रकरण घडले!पत्रकार बॉब वुडवर्डस याने यांचे शोध पत्रिकारितेमुळे तेंव्हांचे राष्ट्रध्यक्ष रिचर्ड एस. निक्सन यांना राजीनामा द्यावा लागला. सत्ताधारी पक्षाच्या डी.एन.सी. कार्यालवर दरोडा पडला होता. त्यात सी.ए. ए.चा माजी कर्मचारी होता, तो धागा पकडून त्याने वृत्त मालिका लिहिली.होती.आता भारतात शोध पत्रिकारिता लूप्त पावलेली आहे,असे मत सर्वोच्च न्यायालयाने म्हंटले आहे. पूर्वी पत्रकार शोधपत्रिका करीत असत! त्यातून भ्रष्टाचार, घोटाळे उजेडात येत असत! तेंव्हा बातम्यांची विश्वासर्हता होती. पत्रकाराला बातमीसाठी खूप मेहनत करावी लागत असे. आता बातम्या पेरल्या सारख्या वाटतात! २०१६ मध्ये अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूकीत डोनाल ट्रम्प यांनी 'फेक न्यूज' या शब्दाचा प्रयोग केला. तो शब्द प्रचलित झालेला आहे.भारतात तर फेक न्यूज,पीत पत्रकारिता,'पेड न्यूज' चे प्रमाण वाढले आहे.निवडणुक काळात तर पेड न्यूजच्या असंख्य तक्रारी निवडणूक यंत्रणेकडे येत असतात पत्रकारासाठी ही सुगीच असते! यात छोटे व मोठे मासेही आहेत! त्याप्रमाणे विविध राजकीय पक्षांची तळी उचलणारे पत्रकार आहेत. २०१६ मध्ये नामवत एका पत्रकाराने देशात मोदी सरकार येणार नाही, असे छातीठोकपणे सांगितले होते.वृत्तवाहिन्या व पत्रकार आता दोन्ही बाजूने राजकीय बाजू मांडून आपण निष्पक्ष आहोत, असे जरी भासवत असले, ते स्वतःची सत्य बाजू म्हणजे तिसरी बाजू मांडण्याचे धाडस करत नाहीत. एका हिंदी वृत्त वाहिन्यातील एका पत्रकाराने करोनाकाळात भारतीय लसीवर चर्चा करतांना "मी लस घेणार नाही' असे म्हंटले होते. अश्या पत्रकारांना, ना राष्ट्रीय सुरक्षेतेची, जनतेची काळजी,ना भ्रष्टाचाराची चीड आहे.दि.१६ व १७ जानेवारी २०१२ मध्ये एका मोठ्या इंग्रजी आणि मराठी वृत्तपत्राने 'लष्कराच्या तुकडीचे दिल्लीकडे कूच' असे मुख्य वृत्त दिले गेले होते! या वृत्ताचा अर्थ भारतात लष्कराचे बंड करणार असा अर्थ निघतो ! या वृत्ताला कोणतेही आधार नव्हता, केवळ सनसनाटी वृत्त देण्याचा प्रयत्न केला.त्यावेळेस तत्कालिन पंतप्रधान मनमोहनसिंघ व संरक्षणमंत्री ए.के अन्थोनी,तसेच लष्करप्रमुख व्ही.के. सिंह यांना हा लष्कराचा सरावाचा भाग होता, असा खूलासा करावा लागला. अश्या प्रकाराचे वृत्त देणे मूर्खपणाचे आहे.तेंव्हा राष्ट्रीय सुरक्षतेच्यादृष्टीने गंभीर बाब आहे, असे म्हणत त्यांनी टीका केली. किमान राष्ट्रीय सुरक्षाबाबत पत्रकारांनी भान ठेवले पाहिजे. हे वृत्त देताना पत्रकारांनी संरक्षण मंत्री अथवा लष्कर प्रमुख यांचे संपर्क करुन खात्री तरी करावयाला पाहिजे होती. पण पत्रकाराची ती फेकन्यूजच होती! यातून त्यांनी काय साधले ? त्या चुकीच्या वृत्ताबद्दल पत्रकाराने माफी मागितली नाही. अश्याच प्रकारचे वृत्त दि.१६ एप्रिल २०२३ रोजी एका मोठ्या मराठी वृत्तपत्राने माजी राज्यपाल सत्यपाल मलिक याचे मुलाखतीवर आधारावर दिले गेले.दि. १४ फेब्रुवारी२०१९ रोजी पुलवामा येथे हल्यात सी.आर.पी.एफ.चे ४० जवान शहीद झाले, त्यावर मुक्ताफळे उधळली!ती मुलाखत पानभर दिली गेली. सदरचे वृत्त म्हणजे,' 'शिळ्या कडीला ऊत',असाच प्रकार आहे. यात सत्यपालांचा गौप्यस्फोट! राजकीय वादळ !असे म्हंटले गेले. पण या वृत्ताची एक दोन विरोधी पक्ष वगळता कोणीही दखल घेतलेली नाही. सदरचे वृत्त एकांगी स्वरूपाचे असून त्यात लष्कर, तपास यंत्रणा,केंद्र सरकारची बाजू मांडली गेली नाही.सी.आर.पी,एफ.तपास यंत्रणेच्या पथकाव्दारे चौकशी केली गेली. या घटनेचा बदला घेतला गेला.आज सत्यपाल जे आरोप व प्रश्न निर्माण करत आहेत.ते सत्तेवर असताना गप्प का होते ? ते सत्ता भोगल्यानंतर आरोप करत आहेत! ते आता का बोलत आहेत ? त्यांचेकडे घटनेची पुरावे व सत्य माहिती होती,त्याचवेळी सांगावयाला पाहिजे होते.तेंव्हा ते मूग गिळून का बसले होते ?आता ते केवळ मोदीविरोधी गरळ ओकत आहेत!त्यात मोदी कावीळ झालेल्या पत्रकारांनी तेच पाहिजे होते. त्यांना तर मोदींची प्रतिमा वातावरण निर्मिती झाली पाहिजे. याच उद्देशाने हे वृत्त पेरले गेले. त्याला सूपारी पत्रकार म्हणतात! पुलवामा घटनेचे राजकारण केले जात आहे. सत्यपाल यांचे आरोपाला आधार,पुरावा आहे काय ? असा प्रश्न पत्रकारने विचारला का नाही ? सत्यपाल हे वादग्रस्त विधाने करण्यात प्रसिध्द आहेत. मग पत्रकारांनी त्यांच्या बोलघेवड्या विधानावर विश्वास कसा काय ठेवला ? यात अ - सत्यपाल व वृत्तपत्राने विश्वासर्हता गमावली आहे. यात संपादक ऐवजी राजकीय नेत्याने तर २०१९ ची लोकसभा निवडणूक जिंकण्यासाठी पुलवामा दहशदवादी हल्ला घडवून आणला,असे म्हणाले.देशात कोणतेही राजकीय पक्षाचा नेता देशद्रोह करणार नाही!पण वाचळवीर नेत्याने 'उचलली जीभ लावली टाळूला!. देशातील सुरक्षा संस्थे बाबत गैरसमज निर्माण केल्याप्रकरणी माजी राज्यपाल, पत्रकार व राजकीय नेत्यावर खटला भरला गेला पाहिजे.

महाराष्ट्रात गेल्या आठवडाभर मराठी वृत्त वाहिन्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांना लक्ष्य केले पवार हे भाजपात जाणार! त्यांचेकडे चाळीस आमदारांच्या सहीचे पत्र आहे! महाराष्ट्रात सत्तेचा भूंकप येणार!अश्या थापडेबाज वृत्त दिल्या गेल्या. या वृत्ताला आधार काय ?तर २०१९ मध्ये ते भाजपाबरोबर गेले व सकाळचा शपथविधी झाला होता. यावेळी ते भाजपासोबत जाणार, आहेत, अश्याच वावड्या उठविल्या गेल्या. पण जेंव्हा अजित पवारांनी पत्रकारांचे कान उपटले! मी तुम्हाला शपथपत्र लिहून देऊ का ? मी जीवंत असेपर्यंत राष्ट्रवादी पक्षासोबत राहणार आहे, असे सुनावले, त्यामुळे पत्रकार तोंडावर आपटले!या फेकन्यूजमुळे मराठी वाहिन्याचे 'लांडगा आला रे आला 'कथेप्रमाणे झाले. २०२२ मध्ये माजी मुख्यमंत्री आशोक चव्हाण यांना मिडीयाने असेच लक्ष्य केले होते.ते भाजपा जाणार असल्याचे सतत वृत्त जात होते. या वृत्ताबाबत काँग्रेस ज्येष्ठ नेत्याने माझ्याकडे विचारणा केली, तेंव्हा या केवळ पत्रकारांच्या वावड्या आहेत. ते भाजपात कधीच जाणार नाहीत,असे स्पष्ट सांगितले.यावर मी लेख लिहिला तो 'आधुनिक केसरी' चे संपादक डॉ. प्रभूराज गोरे वाचला व लगेचच अंकात प्रकाशित केला. मिडीया राजकीय नेता, उद्योगपती, तसेच अधिकारी यांना एकाद्या घटनेवरुन लक्ष्य करून त्यांचे जीवन उध्वस्त करत आहेत, याला 'मिडीया ट्रायल'म्हटले जाते! राहत इंदोरी यांची शायरी आहे, बनके के एक हादसा बाजार में जायेगा,जो नही होगा वो अकबार आ जायेगा!.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# आणिक स्मृती ठेवुनी जाती...

आधुनिक केसरी

वडिलांच्या तुटपुंज्या पगारात भागणार नव्हतं. वडिलांना मदत म्हणून दादांनी शिकवण्या सुरु करून घरच्या परिस्थितीला हातभार लावला. वडीलही तसे लवकरच गेले आणि घराची जबाबदारी दादांवर येऊन पडली. एक दोन बहिणींची लग्नं झालेली. घरावर कर्जाचा बोजा. पण आपल्या अपार कष्ट, मेहनीतीच्या जोरावर त्यांनी या परिस्थितीला धैर्याने तोंड दिले. बहिणींची लग्ने केली. त्यांची नुसती लग्नं करून तो थांबला नाही. तो त्यांचा मानसिक आधार बनला. नियमितपणे त्यांना फोन करणे, आस्थेने सगळ्यांची चौकशी करणे हे नित्याचेच ! सुरुवातीला शाळेत एका लेखनिकाचे काम करणारा हा राजेंद्र जिद्दीने शिकून शिक्षक झाला. नुसताच शिक्षक झाला नाही तर अनेक नामवंत विद्यार्थी त्याने घडवले. इंग्रजी, गणित, मराठी हे विषय त्याने उत्तम शिकवले. मराठी माध्यमाच्या शाळेत शिकवत असतानाही इंग्रजी माध्यमाच्या अनेक विद्यार्थ्यांना त्याने घडवले. त्यांच्या इंग्रजी, गणिताचा पाया पक्का केला. त्यांच्यामधील माणूस, एक जागरूक नागरिक घडवला. त्याच्या विद्यार्थ्यांतील अनेक जण पुढे मोठमोठ्या पदावर गेले, डॉक्टर, वकील, इंजिनिअर झाले.
त्याच्या या विद्यार्थ्यांमधील लोकप्रियतेचा प्रत्यय मला जेव्हा आमच्या येथील वाचनालयाची निवडणूक लागली तेव्हा आला. निवडणुकीच्या प्रचारासाठी आम्ही फिरत असताना, जिथे जिथे गेलो, त्या त्या घरातील विद्यार्थी येऊन त्याला वाकून नमस्कार करायचे. ' सर, तुम्ही कशाला फिरताय ? तुम्हाला फिरण्याची जरूर नाही. तुम्ही आम्हाला हक्काने सांगा. ' असे सांगायचे. जिथे भली भली मोठी मंडळी मत मागण्यासाठी मतदारांच्या मिनतवाऱ्या करायची, तिथे त्याच्याबद्दलचा असलेला हा आदर पाहून आम्ही भारावून जायचो. तो प्रचंड मतांनी निवडून आला आणि वाचनालयाचा उपाध्यक्षही झाला. वाचनालयात अनेक नवनवीन उपक्रम त्याने राबवले होते. वाचनालय, शाळा आणि रंगगंध नावाची चाळीसगावातील एक नाट्यप्रेमी संस्था या तीनही ठिकाणी अनेक उपक्रम त्याच्या बरोबर आम्ही राबवले. आम्हा सहकाऱ्यांच्या आणि मित्रमंडळींच्या घरात त्याला थेट स्वयंपाकघरापर्यंत प्रवेश असायचा. आपल्या प्रेमळ, विनोदी आणि खेळकर वागण्याने त्यांना घरातील भगिनी वर्गालाही आपलेसे करून घेतले होते. म्हणूनच त्याचे थेट किचनमध्ये येणे, हास्यविनोद करणे त्यांना कधी वावगे वाटायचे नाही. **क्रमशः**





## आनंदी पहाट

# संवादाचे प्रभावी माध्यम सकारात्मकतेसाठी वापरावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

काहीवेळा आपल्या आपापसातील संवादाची सुरुवातच विसंवादानं होत असल्याचं दिसून येतं. विचारांचा अभाव हे खरं तर त्यामागचं मूळ कारण असतं. संवादाचा अभाव हे माणसांमाणसांत दुरावा निर्माण होण्याचं एक महत्वाचं कारण असतं. ह्यामध्ये अनेकदा आचारांपेक्षा विचारांना महत्व आणि प्राधान्य कमी दिलं जात असतं. विवेकी विचार न करताच आचरण केलं जातं, कृती केली जाते; काहीवेळा ती तापदायक, घातक ठरू शकते. अलीकडच्या काळांत विभक्त कुटुंब, कौटुंबिक कलह आणि निर्माण झालेले क्लेश, द्वेष ह्यामुळे बहिण-भाऊ, भाऊ-भाऊ, पती-पत्नी, पिता-पुत्र, सासू-सून यांच्यात विचारांचं आदान प्रदान होतंच असं नाही. रक्ताच्या नात्यांत देखील अविचार आणि संवादाआभावी अनेक गैरसमज, समस्या निर्माण झाल्याचं दिसून येतं. आपली सुख-दुःख, भाव-भावना, विचार-आचार, ह्या बाबींची देवाणघेवाण करायला वावच नसतो, असं नाही. परंतू विचारांच्या माध्यमातून सुखाच्या यशोशिखरांवर पोहोचण्यासाठी आपापसातील संवादालाच बगल दिली जाते. परस्परांमधील नातेसंबंध, आपलेपणाची भावना, जिव्हाळा, प्रेमाचा ओलावा कोण टिकवणार? प्रगल्भ विचार आणि दिलदार मन लाभलेली कोणतीही व्यक्ती आकृती उरत नसते, तर ती स्वतःच एक कलाकृती बनून राहते. अशी व्यक्ती आपल्या संस्कृतीचं स्मरण ठेवून, स्वतःच्या प्रकृतीला अनुसरून, समाजातील विकृतीकरण थांबवण्यात सक्रीय असते. यांतूनच कलाकृती साकारली जात असते, पाहायला मिळते. अशा व्यक्ती आपलं जगण्यापलीकडचं जीवन सामाजिक बांधिलकीचं भान राखून नवनवीन कलाकृती साकारत असतात. स्वतःच भावनिक, मानसिक, आंतरिक आणि शारीरिक पातळीवर प्रत्येक संवाद घडवून आणायचा असतो. ह्या सर्वच बाबींचं समीकरण कसं मांडायचं हे ज्याला माहिती होतं, त्याला संवादात पूर्णपणे सहभागी होऊन त्या संवादाचं सुख प्राप्त करून घेता येतं. स्वतःचे विचार व्यक्त करण्यासाठी संवादासारखं प्रभावी माध्यम दुसरं कोणतंही नसतं.

# मौनं सर्वार्थसाधनम् ।

आधुनिक केसरी

खूप बोलकं असणं आणि बोलघेवडा असणं यात फरक आहे.अगदी अबोल असणं त्याहूनही वेगळं. अबोल म्हणजे अगदी कमी बोलणारे, मोजून मापून बोलणं.हो..ला...हो ,,,नाही ला...नाही...स्वतःच्या शब्दसंपत्तीतील शब्द खर्च करायचे नाही असं त्यांनी ठरवलेलं असतं. आणखी एक प्रकार म्हणजे बडबड्या.. हे लोक अगदी समोरच्याचं काही ऐकूनच घेत नसतात.मौनं सर्वार्थ साधनम.. ... मौनाने सर्व साध्य होतात म्हणे. पण मौन कधी व कुठे ठेवायचं हे कळले पाहिजे.शिक्षकाला मौन धरून चालणार आहे का? महाराजांना मौन धरलेले चालेल का? शिक्षकांना मुलांना शिकवावं लागतं. महाराज लोक समाजाचे प्रबोधन करतात .मग यांना मौन धरून चालणार नाही. मौन हे वाईट, वेडंवाकड, नकारात्मक बोलण्यासाठी धरलं जातं. चांगलं बोलण्यासाठी मौन धरू नये. आपले चांगले विचार समाजापर्यंत पोहोचवायचे असतील तर मौन धरू नका. बोला.... चुकणाऱ्याला दिशा दाखवा. आपलं व्यक्तिमत्व हे समईच्या मंद प्रकाशासारखं आहे.शांत ,सात्विक.. कमी प्रकाश असला तरी मनाला शांती देणारा तो प्रकाश आहे. धीर देणारा आहे. प्रोत्साहन, उत्साह वाढवणारा आहे. तेव्हा असेच प्रकाशरुपी शब्द आपण मुलांपर्यंत पोहोचवायचे आहे. ज्या शब्दांनी दुसऱ्यांच्या काळजात घर करता येईल असे शब्द, काळीज चिरणारे शब्द नको. उंच शिखरावर मुलांना पोहोचवायचे आहे, ते जगाने त्यांच्याकडे पहावे म्हणून नाही,तर त्यांना जगाला पाहता यावे म्हणून. संयम स्वतःवर आणि शब्दांवर ठेवायला त्यांना शिकवायचा आहे. आपल्या वागण्यातून जीवनात संयम ठेवला तर आपले अस्तित्व कोणी संपवू शकत नाही. इतरांना दोष देण्यापेक्षा आपल्या मुलांना घडवण्यात वेळ खर्च करू या. म्हणजे दुसऱ्यांना दोष द्यायला वेळच मिळणार नाही. वेदनेचे शेवटचे टोक म्हणजे मौन.. खूप मोठा अर्थ दडलेला आहे या वाक्यात.जिथे त्रास होतो तिथे मौन राहिलेलं बरं... कारण शांततेने भरलेलं मन आणि समाधानाने भरलेलं हृदय जगण्याची दिशा दाखवतो. तेव्हा चांगलं काही साध्य करण्यासाठी "मौनम सर्वार्थ साधनम्.....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग-71

# हत्ती आणि ससाची पंचतंत्र कथा

आधुनिक केसरी

“मित्रहो! हे आमचे वडिलोपार्जित घर आहे, जर आपण हत्तींना घाबरू शकलो तर, ते परत येणार नाहीत. मी त्यांना घाबरविण्याच्या एका मार्गाचा विचार करू शकतो. आपण जरी हत्तीपेक्षा लहान असलो तरी , आपण सर्व सक्षम आहोत. माझी एक योजना आहे ठरल्याप्रमाणे एक योजना बनवली, एक ससा हत्तींच्या वाटेवर असलेल्या डोंगरावर बसला. थोड्या वेळाने हत्तींचा राजा आपला संपूर्ण कळप घेऊन आला. ससा ओरडला, “ए दुष्ट हत्ती! मी तुला तलावात प्रवेश करण्यापासून रोखत आहे. हा तलाव चंद्र-देवाचा आहे. हत्तीच्या राजा स्तब्ध झाला पण तो कुठल्याही देवावर राग करण्याचे धाडस करु शकला नाही. हत्तीराजाने त्या सशाला विचारले की त्याच्यासाठी काय संदेश आहे ?- ससा म्हणाला, मी चंद्राचा देवदूत आहे. त्याने तुम्हाला त्याच्या तलावामध्ये जाण्यापासून प्रतिबंधित करीत आहे हे सांगण्यासाठी मला पाठविले आहे. काल, तुमच्या उडया मारण्याच्या प्रकारामुळे बरेच ससे मरण पावले , देव, तुमच्यावर खूप रागावले आहेत. जर आपल्याला जगण्याची इच्छा असेल तर आपण तलावामध्ये पुन्हा प्रवेश करू नये. हत्ती राजा काही काळ गप्प राहिला, आणि मग म्हणाला, हे जर खरं असेल तर, तुझा चंद्र कुठे आहे ते सांग, मी माझ्या कळपाला घेऊन दूर जाईल आणि आम्ही माफी मागू. चतुर ससा हत्तीराजाला सरोवराच्या काठावर घेऊन गेला, जेथून चंद्राचे प्रतिबिंब पाण्यात दिसू शकत होते. तो म्हणाला, “आज तो खूप अस्वस्थ आहे, कृपया शांतपणे आपले डोके खाली घ्या आणि निघून जा. तुम्ही त्यांचे लक्ष विचलित करू नका अन्यथा ते रागावतील.
हत्ती राजा पाण्यात चंद्र पाहून आश्चर्यचकित झाला. त्याने सशावर विश्वास केला आणि ते तेथून निघून गेले. त्यानंतर ससा हत्तींचा त्रास न घेता तेथे आनंदाने राहू लागले .

# निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

**अनुपम्यं हि लावण्यंकारुण्यं**
**ते तथैव च।**
**आरुण्ययुक्तभालं**
**त्वत्शिवसौभाग्यदर्शकम् ।।३।।**
**तुझे लावण्य आणि कारुण्य हे अनुपम आहे. श्रीशिवसौभाग्य दर्शक असे कुंकुम भाळी लावल्यामुळे ते आरुण्ययुक्त असे आहे.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

**मानव शक्तिक बाहरे, जगत काम कोइ नाहिं ।**
**बाहर है सो पुरुष का, सर्व शक्ति जेहि माहिं ।।३३।। (स्वर्वेद तृतीय मण्डल द्वितीय अध्याय) ०३/०२/३३**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
मनुष्य शक्तीच्या बाहेर जगात कुठलेही काम नाही की, जे तो करू शकणार नाही. जीवत्व शक्तीच्या बाहेरचे कार्य जगन्नियन्त्या परमेश्वराचे आहे , ज्याच्यात सर्व शक्ती स्थित आहेत तसेच तो अनंत क्रिया, बल, शक्तीने सदैव परिपूर्ण आहे.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# आयुष्यात संगत खुप महत्वाची!


आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यात जर काही चांगले करायचे असेल तर आपण संगत चांगल्याशी धरली पाहिजे.खास करून आपण संगत कोणाशी करावी हे समजले पाहिजे.संगत चांगल्याशी धरली तर आयुष्याचे सोने होते.मात्र संगत करण्यास चुकलो तर आयुष्यात खुप नुकसान सोसावे लागते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आजच्या काळात आपल्याला माणसं वाचता आली पाहीजे.कोण चांगला कोण वाइट हे समजले पाहिजे.काही माणसं वर वर खुप गोड बोलतात.मात्र आपल्या पश्चात आपल्याबद्दल आपली निंदा करतात.अशी माणसं आजुबाजुला खुप भेटतील मात्र संगत कोणाशी करावी हे सर्वस्वी आपल्या हातात आहे.त्यासाठी जीवनात संगतीला खुप महत्व दीले पाहिजे. मनाने स्वच्छ , चांगल्या विचारांच्या माणसाशी आपण संगत धरायला हवी.आयुष्यात आपण संगत करायचे चुकलो तर पश्चात्तापा शिवाय दुसरे हातात काही पडत नाही.आपल्याला माणसं ओळखता आली पाहीजे.आज सभोवताली जेव्हा गरज असते. तेव्हाच आपली आठवण येत असते. आयुष्यात चांगल्या माणसांची संगत लाभली तर आयुष्य बदलण्यास नक्कीच मदत होते आणि चुकीच्या लोकांच्या संगतीत आलो तर अधोगती व्हायला वेळ लागत नाही.आज चांगल्या विचारांची माणसे जीवनात असणे गरजेचे आहे.निश्चितच दिशा बदलण्यास मदत होते. आजची तरूण पिढी व्यसनाच्या मोहजालात अडकत आहे.प्रेम , प्रसिद्धी ,फॅशन नादात आपले मुळ ध्येयापासून विचलीत होत आहे.त्यासाठी आयुष्यात चांगल्या विचारांच्या माणसांची संगत धरली तर आयुष्याला कलाटणी मिळते व आपल्या आयुष्यात खुप माणसं भेटतील पण संगत पारखुनच केली पाहिजे.त्यासाठी आयुष्यात संगत खुप महत्वाची आहे.

**-संतोष दत्तू शिंदे, मु.पो.काष्टी , अहमदनगरा**

# भगवंताची स्मृती आणि कर्तव्याची जागृती

आधुनिक केसरी



प्रत्येक मनुष्य बोलताना ‘मी’ आणि ‘माझे’ अशा भाषेत बोलत असतो; म्हणजे प्रत्येक व्यक्तीला ह्या दोन्ही बाबतींत काही कर्तव्ये असतात. ‘माझे’ या शब्दात शरीर आणि तत्संबंधी सर्व गोष्टी येतात. आयुष्यात ‘मी’ चे कर्तव्य परमेश्वरप्राप्ती हे आहे; आणि देहाचे कर्तव्य देहाशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीबद्दलचे असते. देहाच्या कर्तव्यात धर्म, शास्त्र आणि नीती यांना धरून, संबंधित व्यक्तीशी करण्याच्या आचरणाचा समावेश होतो; म्हणजेच, ज्याच्याशी जसा आपला संबंध असेल त्याप्रमाणे त्याच्या बाबतीत आपले कर्तव्य चोख पार पाडणे. ‘कर्तव्य’ याचा अर्थ मोबदल्याची अपेक्षा न ठेवता ज्या ज्या बाबतीत जे करणे योग्य असेल ते करणे, असा आहे. मनुष्याने ‘मी’ आणि देह या दोहोंच्या बाबतींतली कर्तव्ये समान चालीने करीत राहिले पाहिजे. ‘मी’ चे कर्तव्य करीन पण देहाने कसाही वागेन, असे म्हणून चालणार नाही. याचे कारण असे आहे की, समजा, एखादा मनुष्य नोकरी करीत आहे; तो ती नोकरी कशाकरिता करतो याचा विचार केला तर असे दिसते की, ती नोकरी करायला दुसरे कोणी नव्हते म्हणून तो ती नोकरी करीत नसतो, तर त्या नोकरीतून मिळणारा पैसा कुटुंबरक्षणाकरिता उपयोगी पडेल म्हणून तो ती नोकरी करीत असतो. समजा, त्याने नोकरी केली पण मिळणारा पैसा घरात दिला नाही, तर त्या नोकरीचा काही उपयोग नाही. तसे, ‘मी’ चे कर्तव्य, म्हणजे भगवंताचे अनुसंधान केले, पण देहाचे कर्तव्य, म्हणजे सदाचरण आणि संबंधित व्यक्तींशी असलेली कर्तव्ये न केली, तर नोकरी करून पैसे घरी न दिल्यासारखे होईल. म्हणून प्रत्येक व्यक्तीने भगवंताची स्मृती आणि कर्तव्याची जागृती ठेवावी; आणि या दृष्टीने आपले कुठे चुकते आहे याचा शोध दर वाढदिवसाच्या निमित्ताने घेऊन, प्रत्येकाने आपली उन्नती करून घ्यावी. जेवताना भोवती उदबत्तीचा सुंदर वास आणि तोंडात गोड घास जसा असावा, त्याप्रमाणे आपण बाहेर गोड बोलावे आणि आत भगवंताचे गोड नाम घ्यावे; म्हणजेच, आपण आत-बाहेर गोड असावे. ज्याप्रमाणे एखादा गवई पुष्कळ ताना मारतो, पण शेवटी समेवर येतो, त्याचप्रमाणे भगवंताजवळ लक्ष ठेवून मग आपण काहीही केले तरी हरकत नाही. समेला विसरून मात्र उपयोग नाही. इथे तबला वाजविणारा भगवंतच आहे; म्हणून त्याचा ठेका बरोबर चालतो. ठेक्याप्रमाणे, म्हणजे भगवंताच्या ठेक्याला अनुसरून, म्हणजेच त्याच्या स्मरणात, जो गवई गाईल तो बरोबर मार्गावर राहील आणि शेवटी समेवर येईल. **आजचे बोधवचन आहे – फळाची अपेक्षा सोडून कर्म करणे याचे नाव कर्तव्य होय. श्रीराम समर्थ**

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**पायीं घातली या मिठी ॥ होतो उठाउठी । लवकरी च उतार ॥३॥**
**न करीं रे संग राहें रे निश्चळ । लागों नेदीं मळ ममतेचा ॥१॥**
**या नांवें अद्वैत खरें ब्रम्हज्ञान । अनुभवावांचून बडबड ते ॥ध्रु.॥**
**इंद्रियांचा जय वासनेचा क्षय । संकल्पा ही न ये वरी मन ॥२॥**
**तुका म्हणे न ये जाणीव अंतरा । अंतरीं या थारा आनंदाचा ॥३॥**
**पंढरीचा महिमा । देतां आणीक उपमा ॥१॥**







# अष्टपैलू व्यक्तिमत्त्व : प्रा.योगेश शर्मा

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, २३ एप्रिल २०२३

आधुनिक केसरी

अतिशय सर्वसामान्य कुटुंबात २३ एप्रिल १९८७ ला प्रा.योगेश शर्मा यांचा जन्म झाला. सरांचे प्राथमिक शिक्षण जिजामाता प्राथमिक विद्यालय, माध्यमिक शिक्षण देशीकेंद्र विद्यालय येथून पूर्ण झाले. त्यानंतर अकरावी ते पदवी पर्यंतचे शिक्षण त्यांनी राजर्षी शाहू महाविद्यालयातून पूर्ण केले. घरची आर्थिक परिस्थिती अतिशय हालाकीची त्यामुळे काही काळ शिक्षणापासून वंचित राहावे लागले. मात्र, नौकरी करीत करीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात ज्या दिवशी इतर डीटीपी ऑपरेटर यांची रजा असायची तिथे त्यांच्या जागी अर्थात आठवड्यातून तीन दिवस नौकरी करायची, ६० रुपये प्रतिदिवस मानधनावर. दैनिक लोकमतमध्ये नौकरी करीत असताना आधीपासूनच लिखाणाची आवड असल्याने ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, ज्येष्ठ पत्रकार धर्मराज हल्लाळे, हणमंत गायकवाड, श्रीराम संपते, उज्ज्वलकुमार माने, अशपाक पठाण, चेतन धनुरे, महेश पाळणे या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी काम केले. डीटीपी ऑपरेटर असतानाही वरिष्ठांनी त्यांना विविध विषयांवर लेखन करण्याची संधी दिली. यामुळे त्यांना या क्षेत्रातही आवड निर्माण झाली. वयाच्या अगदी लहानपणापासूनच त्यांनी नौकरी करीत करीत आपले शिक्षण पूर्ण केले. वेळप्रसंगी रात्री भिंतीवर पोस्टर लावणे, लग्नात जेवायला वाढणे आदी कामेही त्यांना करावी लागली. हे सगळं करत असताना शिक्षणाला त्यांनी महत्त्व दिले. बघता बघता त्यांनी आपले एम.कॉम., एम.ए. (अर्थशास्त्र), एम.फिल. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले असून, सध्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात उपप्राचार्य डॉ.राजाराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ते पीएचडी करीत आहेत. 2013 साली धनराज जोशी (जय भोले) यांच्या महाविद्यालयात त्यांना प्राध्यापक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. ज्या क्षेत्रात जाईल तिथे आपले वेगळे अस्तित्व निर्माण करण्याची त्यांची कार्यशैली शिक्षण क्षेत्रात प्रभावी ठरली. लोकमत या वर्तमानपत्राची नौकरी सोडून ते दयानंद वाणिज्य महाविद्यालयात लिपिक (क्लार्क) या पदावर कार्यरत झाले. या पदावर काम करतानाच दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी आणि प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके यांनी त्यांना प्राध्यापक पदावर काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली. इथेही त्यांनी आपल्या अध्यापन कौशल्याची चुणूक दाखवून कमी कालावधीत विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून ओळख निर्माण केली. प्राध्यापक म्हणून काम करतानाच लिखाणाची आवड असल्याने त्यांनी आजवर अनेक वर्तमानपत्रातून विविध सामाजिक विषयांवर लेखन केले आहे. पुण्यनगरी, लोकमत, एकमत, देवगिरी तरुण भारत आदी वर्तमानपत्रात त्यांचे लेख प्रकाशित आहेत. आपल्या लिखाणातून अनेकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. दरम्यानच्या काळात दैनिक मराठवाडा साथी या वर्तमानपत्रात त्यांना लातूर जिल्हा प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध झाली. इथेही त्यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण लिखाणातून सहा महिन्यांच्या आतच पत्रकारिता क्षेत्रातही नावलौकिक प्राप्त केला. त्यांच्या कार्याची आणि लेखन कौशल्याची दखल घेत त्यांना याच वर्तमानपत्रात लातूर आणि उस्मानाबाद या दोन जिल्ह्याचा वृत्त संपादक होण्याची संधी उपलब्ध झाली. रोखठोक लिखाण, परखड मत मांडण्याची शैली यामुळे अतिशय कमी कालावधीत मराठवाडा साथी हे वर्तमानपत्र त्यांनी लातूर जिल्ह्यात नावारूपाला आणले. उत्तम वक्तृत्व शैली अंगी असल्याने केवळ प्रिंट मीडिया नव्हे तर इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातूनही त्यांनी आपली वेगळी छाप पाडली आहे. एक विद्यार्थी प्रिय प्राध्यापक, उत्तम सामाजिक कार्य करणारी व्यक्ती, कल्पक व्यक्तिमत्त्व, उत्तम लेखन कौशल्य असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व प्रा.योगेश शर्मा यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.



**'कल्पक' व्यक्तिमत्त्व ही ओळख :** सामाजिक कार्याची आवड असल्याने 2015 साली प्रा.योगेश शर्मा यांनी जिवलग मित्र विशाल काटगावकर यांच्या पुढाकाराने 'वसुंधरा' या सामाजिक प्रतिष्ठानची स्थापना केली. या प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध पर्यावरण आणि सामाजिक उपक्रम राबविले जातात. नेहमीच कल्पक आणि नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेत वसुंधरा प्रतिष्ठानने कमी कालावधीत आपली वेगळी ओळख निर्माण केली. या प्रतिष्ठानचे प्रा.योगेश शर्मा हे संस्थापक अध्यक्ष आहेत. प्रतिष्ठानच्या वतीने आजवर नेहमीच नवखे आणि नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेऊन यशस्वी केले आहेत. उत्तम संघटन कौशल्य, नाविन्यता आणि कल्पकता, सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची क्षमता यामुळे आणि आजवर राबविलेल्या उपक्रमांमुळे प्रा.योगेश शर्मा यांनी प्रतिष्ठानला राज्यभर ओळख निर्माण करून दिली आहे. सरांच्या नेतृत्वाखाली प्रतिष्ठानने आजवर अनाथांसोबत दिवाळी, अनाथांसोबत गुढीपाडवा, झाडाचा गणपती, ट्री बँक, सेल्फी विथ ट्री, झाडांचा वाढदिवस, एक विद्यार्थी:एक वृक्ष उपक्रम, पर्यावरण पूरक सण-उत्सव, वृक्ष बक्षीस योजना, वृक्ष दत्तक योजना, खिळेमुक्त झाड अभियान आदी नवखे आणि नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेत वृक्ष लागवड आणि संवर्धन याचे महत्त्व घराघरात पटवून दिले. आजवर हजारो झाडांची लागवड करून यशस्वी संवर्धन केले आहे. प्रा.योगेश शर्मा यांच्या कार्याची दखल घेत त्यांची राष्ट्रीय पर्यावरण समिती, पर्यावरण संरक्षण आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ सदस्यपदी निवड करण्यात आली. याशिवाय, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सल्लागार समिती सदस्य पदीही सध्या ते कार्यरत आहेत.

**इतरांच्या मदतीसाठी नेहमीच तत्पर :** प्रा.योगेश शर्मा हे नेहमीच इतरांच्या मदतीला धावून जातात. कोरोना काळात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता गोरगरिबांना रोज स्वतः शहरभर फिरून ते फूड पॉकेट वितरित करायचे. एवढेच नव्हे तर त्यावेळेसची गरज ओळखून अनेक कुटुंबाना त्यांनी राशन किट देखील उपलब्ध करून दिली. कुठलाही संकटात असणारा व्यक्ती त्यांच्याकडे गेल्यास ते तात्काळ मदत करण्यासाठी पुढे येतात हा त्यांचा स्वभाव अगदी जवळून पाहायला मिळाला. एखादी व्यक्ती त्याच्या स्व-कर्तृत्व आणि कष्टाने यशाची उंच शिखरे गाठते. परंतु, या यशाच्या मागची व्यथा वेगळीच असते. शून्यातून विश्व निर्माण करण्याची धमक त्यांच्यात असते. असेच काहीसे एक व्यक्तिमत्त्व ते म्हणजे प्रा.योगेश शर्मा... आपल्या कार्याने सर सर्वांना परिचित आहेत. सरांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या जीवनावर अल्प शब्दांत प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या लेखाच्या माध्यमातून करीत आहे.

**36 वर्ष पूर्ण करून 37 व्या वर्षात पदार्पण करताना :** वाढदिवसाच्या अनुषंगाने प्रा.योगेश शर्मा यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांना त्यांच्या जीवन प्रवासाविषयी आणि सामाजिक कामाविषयी विचारले असता ते म्हणाले, मी आयुष्यात कुठलीही गोष्ट कधीच ठरवून केली नाही. माझे वडील हे माझे आदर्श आहेत, त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून मी सामाजिक कार्य करीत आहे. माझ्या वडिलांनी नेहमीच चांगले काम केले आहे, त्यांच्या पावलावर पाऊल टाकून काम करण्याचा छोटासा प्रयत्न नेहमीच असतो. आयुष्यात मागे वळून पाहताना तो काळ आजही आठवतो. अक्षरशः आयुष्यात पोस्टर चिटकवलेत, लग्नात जेवण वाढलोय. ही सगळी परिस्थिती बदलून आता सेटल होत आहे याचा मनस्वी आनंद आहे. आई-वडील यांच्या पुण्याईने एकदा मरता मरता वाचले, नवीन जन्म मिळाला आहे. हा जन्म चांगल्या कार्यात व्यथित करायला आवडेल अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

**शब्दांकन : संजय व्यापारी, छत्रपती संभाजीनगर**











# जात जाणिवेचे राजकारण




प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**जगभरात जे विविध प्रकारचे निर्देशांक वेळोवेळी काढण्यात येतात त्या सर्व निर्देशांकात म्हणजे भूक, लिंगभाव, दरडोई उत्पन्न, शिक्षण, अभिव्यक्ती आणि आनंद या सर्व निर्देशांकात भारताचा क्रमांक सव्वाशेच्या पुढेच आहे. सार्वजनिक जीवनात अस्पृश्यता कमी झाली म्हणून स्वतःला पुरोगामी म्हणवून स्वतःच पाठ थोपटून घ्यायची की व्यक्तिगत आयुष्यात प्रतिगामीत्व जोपासतो आहोत म्हणून खेद करायचा. अत्यंत विसंगतीने भरलेल्या आपल्या आयुष्यात त्यामुळे किती प्रश्न उभे राहतात, याकडे मात्र कोणाचे लक्ष नाही. जगात आज सगळीकडे राष्ट्रवादाचा बोलबाला आहे. तो चूक की बरोबर हे येणारा काळ ठरवेलच.**



आपल्याकडेही राष्ट्रवादी असणे प्रतिष्ठेचे समजले जात आहे. या राष्ट्रवादास जातीय स्तरिकरण आड येत नाही का, जातीय विभाजन आणि राष्ट्रवाद एकत्र येऊ शकतात का? जात हे देशातील समस्त देशवासीयांच्या विभाजनाचे, अविश्वासाचे व्यवच्छेदक लक्षण असताना राष्ट्रवाद जोपासायचा म्हणजे नेमके काय करायचे हा प्रश्न उभा राहतो. म्हणून जातीला तिलांजली दिली पाहिजे. अनेक समाजशास्त्रज्ञांनी जात हे भारताचे वैशिष्ट्य म्हणून उल्लेख केला असला तरी, हे लक्षण मिरवण्याचे तर नक्कीच नाही, एवढे मात्र अलीकडे बहुतांश लोकांना पटले आहे. प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ जी. एस. घुर्ये यांनी म्हणूनच जातवार जनगणनेला विरोध केला. कारण अशा जातवार शिरगणतीतून जातीय आकडेवारी कळण्यासोबतच जातीय राजकीयीकरण घडून येईल आणि जातिसंस्था अधिकाधिक घट्ट होण्यास मदत होईल. याच कारणामुळे १९३१ नंतर जातवार जनगणना बंद करण्यात आली. अलीकडे मात्र ही मागणी आणखी जोर धरू लागली आहे. परंतु २०२० मध्येच केंद्र शासनाने जातवार जनगणना केली जाणार नाही, हे स्पष्ट केले आहे. जन्माधारित वैशिष्ट्याला आणखी मजबुती मिळेल अशी शंका असल्यामुळे अनेक राजकीय पक्षांनी मागणी करून सुद्धा अशा प्रकारची मोजदाद होऊ शकली नाही. धर्मांतर्गत जातीभेद ही समस्या आहे, हे मानायला अनेक विद्वान तयार होत नाहीत. जगातील प्राचिनत्वाचा मान मिरवत असताना अंतर्गत विभाजन हेही तेवढेच प्राचीन आहे, हेही मान्य करायला हवे. धार्मिक श्रेष्ठत्व म्हणजे त्यातील मुठभरांचे भरणपोषण असा अर्थ निघत नाही. कारण अनादी काळापासून आपण टिकून आहोत म्हणजे काय तर पृष्ठस्तरीय भूमिसातत्याला फक्त जैविकदृष्ट्या चिकटून आहोत. त्यात मोठेपणा मिळवावा असे काही असते, तर अनेकांनी सुखासुखी आपले घर सोडले नसते. कारण स्थितीशरणतेतून आपला विकास होणे संभव नाही, त्यासाठी झगडा अनिवार्य आहे यातूनच अनेकांनी केवळ जातीय मानसिकता नको म्हणून आपली वेगळी चूल मांडली. कारण हा सर्व प्रकार राग येण्याचाच तर आहे. महाभारतात एके ठिकाणी म्हटले आहे, ज्या पुरुषाला अन्यायाचा राग येतो व जो अपमान सहन करत नाही तोच पुरुष म्हणावयाचा. ज्या पुरुषाला राग किंवा चीड येत नाही, तो आणि नपुंसक सारखेच. आणि या अर्थाचा संस्कृत श्लोक स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या विवेचनात उद्धृत केला आहे. राग हा स्वाभिमानाचे द्योतक असून हा स्वाभिमान गहाण टाकून कोणीही मग तो पुरुष असेल, जात, समूह, वर्ग कोणीही असेल त्यास उन्नती साधता येणार नाही. जातवार जनगणनेच्या मागणी मागे आपली नेमकी स्थिती काय आहे हे समजून घेण्याचा मनोदय असल्याने तशा स्वरूपाची मागणी होताना दिसत आहे. जगातील कोणतीही स्थिती निर्देशन तुलनेशिवाय शक्य नाही. मोजक्यांकडेच एकवटलेले सर्वाधिकार आणि बहुसंख्याकांची अभावग्रस्तता गोचर व्हायची असल्यास ती आकडेवारी समोर आली पाहिजे. पण या गोष्टीलाही अनेक विचारवंत विरोध करतात. त्यांच्या म्हणण्याचा सूर असा असतो की, जात ही वसाहतवादाने



## क्षितिजापल्याड

भारतीयांच्यात निर्माण केलेली वसाहतिक रचना होती आणि वसाहतींचे राज्य संपुष्टात येण्याने ती रचना देखील बेदखल झालेली आहे. तेव्हा जातीय चष्म्यातून जनगणनेचा आधार घेणे राष्ट्रहिताचे ठरणार नाही. या बाबतीत कारणमीमांसा वेगळी असली तरी उजवे आणि डावे यांचे मात्र जातवार जनगणनेच्या विरोधात मतैक्य आहे. ए. बी. वर्धन यांनी म्हटले होते की, अशा प्रकारची जनगणना करून राजकारणात जातीला मध्यवर्ती स्वरूपात आणणे हे वर्गीय एकजुटीला मारक ठरणार आहे. सामंतशाहीच्या उच्चाटनातून भांडवलशाही निर्माण झाली असल्याने जात हा घटक आपण पुन्हा मध्यवर्ती ठिकाणी आणत असू तर पुन्हा सामंतशाहीकडे जाण्याचा तो प्रकार ठरेल. असे अनेक मुद्दे यामागे आहेत. प्रश्न आहे तो जातीअंताच्या लढाईचा. कोणत्याही समाजात शोषित आणि पिचलेल्या वर्गाकडून व्यवस्था परिवर्तनाची अपेक्षा असते. कारण व्यवस्थेचे लाभार्थी असा लढा उभा करून स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेणार नाहीत, हे उघड आहे. भारतात हा लढा दलित समाजाने सुरू केला, मात्र कालौघात विचाराच्या अढळतेअभावी आणि नेतृत्वाच्या रस्सीखेचीत व्यवस्थेला जे हवे होते तेच झाले. कोणता झेंडा घेऊ हाती हेच न समजल्यामुळे आणि वैयक्तिक स्वार्थकेंद्री राजकारण सांभाळण्याच्या तडजोडीतून चळवळीची अनेक शकले झाली. अस्पृश्यता आणि सत्याग्रहाची सिद्धी या लेखात डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, महाभारतात विरपत्नी विदुला हिने आपल्या पुत्रास जसे सांगितले की, अंथरुणावर पडून कुजत किंवा शंभर वर्षे निरर्थक जीवित घालविण्यापेक्षा घटकाभर पराक्रमाची ज्योत दाखवून मेलास तरी बरे. तसेच दरेक अस्पृश्य मातेने आपल्या पुत्रास सांगण्याची वेळ येऊन ठेपली आहे. परंतु इतके मोठे असिधाराव्रत पाळण्यास अस्पृश्यांस कोणीच लावत नाही. बाबासाहेबांची ही खंत दिवसागणिक अधिकाधिक गडद होत जाताना दिसत आहे. केवळ शास्त्रीय विश्लेषणातून जातीची तटबंदी ढासळणार नाही तर जन्माधारित उच्च निचता व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनात मी पाळणार नाही, मानणार नाही या मनोवस्थेतूनच आपणास याकडे पहावे लागणार आहे. अन्यतः अनेक गोष्टीचे राजकारण होतच असते, त्यात जात जाणिवेचे राजकारण अधिक गडद होत जाईल. देशांतर्गत असमानता बाह्य शक्तींना आमंत्रण ठरत असल्याचा इतिहाससिद्ध पुरावा आपल्याकडे असताना पुन्हा त्याच चुका करणे हे शहाणपणाचे ठरणार नाही.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# जागतिक लोकशाही शासन प्रणालीचे जनक: महात्मा बसवेश्वर



प्रा.बाळासाहेब बोराडे
संपर्क ९४२३१५९९९३

आधुनिक केसरी

**भारत ही मांगल्याची भूमी आहे. याच भूमीत भगवान गौतम बुद्ध,भगवान महावीर, संत गुरुगोविंद सिंग,संत कबीर, जगद्गुरु संत तुकाराम,संत ज्ञानेश्वर यासारख्या अनेक विचारवंतांनी जगाला मानवतेचा संदेश दिला. बाराव्या शतकात क्रांतिसूर्य महात्मा बसवेश्वर हे एक सामाजिक समतेचा पुरस्कार करणारे विचारवंत होऊन गेले.महात्मा बसवेश्वर हे थोर तत्वज्ञ,समाजसुधारक,लोककल्याणकारी विचारसरणीचे व सामाजिक क्रांतीचे पुरस्कर्ते होते.त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून मानवधर्माची शिकवण दिली. निसर्गाशी नाते जोडले.स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला. वर्णव्यवस्था, जातिव्यवस्थेवर प्रहार केला. आंतरजातीय विवाह प्रोत्साहन दिले.लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला. म्हणूनच महात्मा बसवेश्वरांना जागतिक लोकशाही शासन प्रणालीचे जनक म्हणून संबोधले जाते. आज त्यांची जयंती आहे.त्यानिमित्त त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.**

क्रांतीसुर्य,समाज सुधारक महात्मा बसेश्वर यांनी बाराव्या शतकात सामाजिक समतेचा पुरस्कार केल्याचे दिसून येते. त्यांनी जातीभेद,उच्च-निच्चता, अस्पृश्यता,वर्णव्यवस्था या सारख्या अनिष्ट प्रथाविरुद्ध बंड पुकारले होते.समाजात प्रबोधन करून परिवर्तन घडवण्याचा प्रयत्न केला. समाजात जनजागृती केली. आपण सर्व एकाच ईश्वरांची लेकरे असून सर्व माणसे समान आहेत, अशी त्यांची धारणा होती. त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत सामाजिक समतेचा पुरस्कार केला. केवळ भारतच नव्हे तर जागतिक लोकशाही शासन प्रणालीचे जनक म्हणून थोर समाज सुधारक महात्मा बसवेश्वर यांना ओळखले जाते. बाराव्या शतकामध्ये जेव्हा इंग्लंडच्या संसदीय शासन पद्धतीचा जन्मही झाला नव्हता त्या अगोदर कित्येक वर्षांपूर्वी महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंडप या नावाने संस्था स्थापन केली. अनुभव मंडपच्या माध्यमातून लोकशाहीच्या मार्गाने त्यांनी स्वातंत्र्य,समता, बंधुत्व या तत्त्वाच्या आधारे दिनदुबळ्या लोकांच्या न्याय हक्कासाठी लढा उभा केला. महात्मा बसेश्वर हे विज्ञानवादी होते. त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातुन अज्ञान,अंधश्रद्धेवर प्रहार केला. वृतवैकल्प, यज्ञ, आहुती, उपवास किंवा देवाला बळी देण्याच्या प्रथेला त्यांनी कडून विरोध केला. उपवास केल्याने किंवा देवाला बळी दिल्याने लोकांच्या समस्या सुटत नाही हे त्यांनी तत्कालीन धर्मपंडितांना पटवून दिले.त्यांनी कर्मकांडाला विरोध केला. एकेश्वर वादाचा पुरस्कार केला. निसर्गावर त्यांची असीम श्रद्धा होती. मानवाने निसर्गात ढवळाढवळ न करता निसर्ग नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. कारण यातच मानव जातीचे हित सामावले आहे. बाराव्या शतकात सांगितलेल्या विचारांची आजही आपणास पदोपदी जाणीव होते. महात्मा बसेश्वर यांच्या तत्त्वज्ञानातून मानवतेची शिकवण मिळते.पृथ्वी तलावरील सर्व माणसे समान असून यात कोणताही भेदभाव नाही ही त्यांची शिकवण होती. भेदाभेद अमंगळ असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. जात,धर्म, प्रांत, वर्ण, भाषा हे भेद निसर्गाने नव्हे तर माणसानं निर्माण केले आहे.त्यांच्या मते निसर्गास सर्व सजीवसृष्टी समान आहे.त्यामुळे सर्वांना लोकशाहीच्या मार्गाने समाज जीवन जगण्याचा अधिकार आहे.त्यांनी आपल्या तत्वज्ञानातून मानवतेचा संदेश दिला आहे. महात्मा बसवेश्वरांनी स्त्री-पुरुष समानतेला महत्त्व दिले. तत्कालीन भारतीय समाजात महिलांना दुय्यम स्थान दिले जात असे. मूलभूत अधिकारापासून महिलांना वंचीत ठेवले जात होते. शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता.निर्णय प्रक्रियेपासून महिलांना दूर ठेवले जात होते.

बालविवाह, सतीप्रथा,केशवपन, विधवा, देवदासी यासारख्या कुप्रथेमुळे महिलांचे जीवन भरडले जात होते. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या आचारविचारातून स्त्री-पुरुषांना समान संधी निर्माण करून दिल्या. महात्मा बसवेश्वरांनी स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाचा पुरस्कार केला. मतदान करणे, विचार व्यक्त करणे याच बरोबर त्यांना धार्मिक,सामाजिक कार्यात सहभागीकरून घेतले. राज्यकारभारत महत्वाच्या ठिकाणी महिलांची नियुक्ती केली. महात्मा बसवेश्वर हे समतावादी विचारवंत होते. त्यांनी जातिव्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले. समाजातील कुप्रथा हाणून पाडल्या. वाईट प्रथेला मूठमाती दिल्याशिवाय समाजात नवनिर्माण होणार नाही याची जाणीव त्यांना होती. समाज निर्मितीचे ध्येय उराशी



बाळगून आपले जीवन राष्ट्राप्रति समर्पित केले. जाती व्यवस्था उखडून टाकायची असेल तर मुळावर घाव घालण्याचे मर्म त्यांनी जाणले होते. त्यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला. बाराव्या शतकात आंतरजातीय विवाह लावण्याचे महान क्रांतिकार्य त्यांनी केले. तथाकथित धर्ममार्तंडांनी या कार्यास प्रखर विरोध केला. महात्मा बसवेश्वरांवर खोटे आरोप लावून अपमानित करण्यात आले.तरीही महात्मा बसवेश्वरांनी समाज सुधारण्याचे कार्य सोडले नाही.बाराव्या शतकात त्यांनी मागास समाजातील मुलांचा विवाह ब्राह्मण मुलीशी लावून दिला.यावरून त्यांच्या जातीय निर्मूलन कार्याची कल्पना येते. त्यांनी या कार्याची सुरुवात स्वतः पासून केली होती. काही वर्षांपूर्वी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लंडनमधील थेम्स नदी किनारी महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्याच्या अनावरण करण्यात आले.यावरून महात्मा बसवेश्वरांच्या कार्याची कीर्ती सातासमुद्रापार पोहचल्याचे दिसून येते. ही बाब आम्हा भारतीयांसाठी गौरवास्पद आहे. महात्मा बसवेश्वर हे थोर तत्वज्ञ, समाजसुधारक, विचारवंत, लोककल्याणकारी विचारसरणीचे पुरस्कर्ते व सामाजिक क्रांतीचे उद्गाते होते. सर्वच क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. म्हणूनच त्यांना जागतिक लोकशाही शासन प्रणालीचे जनक संबोधले जाते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

रविवार, २३ एप्रिल २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२२९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SUNDAY 23 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-229 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-5



# पंतप्रधान मोदींना जीवे मारण्याची धमकी

## केरळ पोलीस, केंद्रीय तपास यंत्रणांकडून चौकशी सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जीवे मारण्याची धमकी पुन्हा एकदा देण्यात आली आहे. केरळ पोलीस आणि केंद्रीय तपास यंत्रणांनी या प्रकरणी चौकशी सुरू केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २४ आणि २५ एप्रिलला केरळ दौऱ्यावर असणार आहेत. या ठिकाणी ते विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार सुसाईड बॉम्बने मोदींना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. मल्याळम भाषेत ही चिठ्ठी लिहिण्यात आली आहे. केरळ भाजपाचे प्रदेशाध्यक्ष सुरेंद्रन यांच्या कार्यालयात ही चिठ्ठी आली आहे.**



केरळ भाजपाच्या कार्यालयात एक पत्र पाठवण्यात आले. हे पत्र मल्याळम भाषेत होते. यामध्ये अशी धमकी देण्यात आली आहे की पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हा केरळ दौरा करतील तेव्हा त्यांना आत्मघातकी बॉम्बने उडवले जाईल. हा हल्ला थांबवायचा असेल तर थांबवून दाखवा अशी धमकी या पत्रात देण्यात आली आहे. त्यामुळे गुप्तचर यंत्रणा आणि तपास यंत्रणा अलर्ट मोडवर आल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २४ एप्रिलला केरळच्या दौऱ्यावर असणार आहेत. या दौऱ्याचा तपशील लिक झाला आहे अशीही माहिती समोर आली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार पंतप्रधान नरेंद्र मोदींना ठार करण्याची धमकी देणारे पत्र हे मागच्या आठवड्यात केरळ भाजपा कार्यालयात आले होते. आज सकाळी हे प्रकरण समोर आले. हे पक्ष केरळ पोलिसांच्या प्रमुखांना सोपवण्यात आले आहे. तसेच पोलिसांनी आणि तपास यंत्रणांनी आपल्या नेटवर्क मार्फत या धमकीमागे कोण आहे याचा शोध घेण्यास सुरूवात केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे वंदे भारत ट्रेनला हिरवा झेंडा दाखवण्यासाठी केरळमध्ये येत आहेत. तसेच इतर कार्यक्रमांनाही ते उपस्थित असणार आहेत.

# नऊ वर्षांच्या प्रणवने केला विश्वविक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** जयवंत पब्लिक स्कूलमध्ये चौथीच्या वर्गात शिकणाऱ्या अवघ्या ९ वर्षांच्या प्रणव प्रविण गुंड याने एक नवा विश्वविक्रम केला आहे. त्याची नोंद 'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये नुकतीच झाली आहे. प्रणव याने महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांची नावे ३९ सेकंदात बोलत हा विक्रम प्रस्थापित केला आहे. प्रणवच्या नावाने ह्या विश्वविक्रमाची इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्डमध्ये अधिकृत नोंद झाली आहे. प्रणव गुंड हडपसरमधील ड्रीम्स आकृती सोसायटीमध्ये राहत असून, त्याचे आई-वडील दोघेही डॉक्टर आहेत. आई डॉ. मीनाक्षी गुंड आयुर्वेद चिकित्सक आहे, तर वडील डॉ. प्रविण गुंड हे पुण्यातील रसायु कॅन्सर क्लिनिकमध्ये कार्यरत आहेत. मुलाने केलेल्या कामगिरीमुळे आई वडील समाधानी आहेत व भावी आयुष्यात त्याला प्रोत्साहन देण्याच्या संकल्प त्यांनी दिला आहे. प्रणवच्या आई वडिलांनी भावना व्यक्त करताना सांगितले की प्रणव लहानपणापासून हुशार आहे. तो पटकन गोष्टी आत्मसात करतो. प्रणव चार वर्षांचा असताना तो विविध शहर, राज्य यांची नावे घेत असे व ती वारंवार बोलण्याचा प्रयत्न करत असे. त्याच्यामधील स्मृती व सातत्य लक्षात घेवुन त्याला प्रोत्साहन दिले. नुकतेच त्याने स्केटिंगमध्ये जिल्हा स्तरावर गोल्ड मेडल मिळवले आहे. क्यूब सोडविण्यातही त्याला रस असून, तो त्याचा नियमित अभ्यास करत आहे.



# महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** श्रीक्षेत्र सावळदबारात ग्रामपंचायत कार्यालयात दि.२२/४/२३ रोजी क्रांतीसुर्य यांची जयंती साजरी करण्यात आली.कार्यालयात महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे प्रा.जिवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते व माजी ग्रा.सदस्य फकीराभाऊ तडवी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तद्नंतर उपसरपंच मो.आरिफ मो लुखमान, संजय आप्पा काळे, आकाश कळसकर व इतर मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी प्रा.जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनचरित्र बद्दल थोडक्यात माहिती दिली. महात्मा बसवेश्वर भारत ही मांगल्याची भूमी आहे. याच भूमीत भगवान गौतम बुद्ध,भगवान महावीर, संत गुरुगोविंद सिंग, संतकबीर, जगद्गुरु संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यासारख्या अनेक विचारवंतांनी जगाला मानवतेचा संदेश दिला.बाराव्या शतकात क्रांतिसूर्य महात्मा बसवेश्वर हे एक सामाजिक समतेचा पुरस्कार करणारे विचारवंत होऊन गेले. महात्मा बसवेश्वर हे थोर तत्वज्ञ,समाजसुधारक, लोककल्याणकारी विचारसरणीचे व सामाजिक क्रांतीचे पुरस्कर्ते होते. त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून मानवधर्माची शिकवण दिली. वर्णव्यवस्था,जातिव्यवस्थेवर प्रहार केला. आंतरजातीय विवाह प्रोत्साहन दिले. लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला. म्हणूनच महात्मा बसवेश्वरांना जागतिक लोकशाही शासन प्रणालीचे जनक म्हणून संबोधले जाते.म्हणूच त्यांची जगभरात आज त्यांची जयंती करण्यात येत आहे.अशी प्रा.कोलते पाटील यांनी सांगितले. यावेळी प्रा.मनोज चोपडे,पो.पा.विलास कुल्ले, बिट जमादार मिरखॉं तडवी,पो. अमंलदार शिवदास गोपाळ, ईशा तडवी, ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.





महाराष्ट्र Business Katta












# माणसाला ग्रंथासारखा मित्र नाही :पानिपतकार विश्वास पाटील

आधुनिक केसरी


**जीवनात माणसाला ग्रंथासारखा कुठलाही मित्र नाही. ग्रंथ हे छातीजवळ राहिले की कसलीही भीती राहत नाही. तो ग्रंथसखा होऊन जातात. आत्महत्या करायला जाणारी, पडिक अवस्थेत राहिलेली माणसे पुस्तकामुळे उठून बसली. त्यांना जीवन जगण्याचा सकारात्मक मार्ग मिळाला. म्हणून वाचनाने आपल्या ज्ञानात भर तर पडतेच शिवाय ग्रंथ जादू असतात अशी भावना प्रसिध्द जेष्ठ लेखक 'पानिपतकार' विश्वास पाटील यांनी जागतिक पुस्तक दिनाच्या पूर्वसंध्येला संवाद साधत व्यक्त केली.**

दरवर्षी जगात 23 एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो. 23 एप्रिल रोजी जगातील अनेक प्रमुख लेखकांचा मृत्यू किंवा जन्म या दिवशी झाला. त्यांच्या स्मरणार्थ हा दिवस पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो. पुस्तक दिन साजरा करण्यास 1995 साली सुरुवात झाली. युनेसकोने 23 एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिन तसेच कॉपीराईट दिन साजरा करण्याची घोषणा केली.

एका सभेत हा निर्णय घेण्यात आला. जगभरातील लेखकांना सन्मान देण्याचा या मागचा उद्देश आहे. याच पार्श्वभूमीवर प्रशासकीय अधिकारी म्हणून उत्तम जबाबदारी सांभाळलेले तसेच पानिपत, झाडाझडती, महानायक, संभाजी, चंद्रमुखी, रणांगण, अण्णाभाऊंची दर्दभरी दास्तान, क्रांतीसूर्य, यासारख्या अनेक दर्जेदार आणि वाचकप्रिय कादंबरीचे लेखन करून नवा विक्रम करणारे प्रसिध्द लेखक विश्वास पाटील जागतिक पुस्तक दिनानिमित्त आधुनिक केसरीशी खास संवाद साधताना बोलत होते. माझ्या स्वतःचा अनुभव सांगतो, एक डॉक्टर मुलगा प्रेमभंग झाला म्हणून जीव देण्यासाठी शेतात जाण्याच्या तयारीत



होता. त्यावेळी त्याला घरातील देवळीत मी लिहिलेली 'महानायक' ही कादंबरी दिसली., ती घेऊन त्याने वाचून दिसली. आणि मला ही सर्व हकिकत पत्र लिहून त्याने कळवली. तो पत्रात लिहितो, माझा प्रेमभंग झाल्यामुळे मी जीव देण्यास निघालो, परंतु ही कादंबरी वाचून माझ्या मनात सकारात्मक विचार आला. म्हणून सांगायचे तात्पर्य हे की जीवनामध्ये ग्रंथ जादू असतात. ग्रंथ प्रेयसीची ऊब देतात. ग्रंथ हरवलेली माऊली असते आणि ग्रंथ वाचल्यानंतर अलौकिक समाधान लाभत असते. अलीकडे डांगोरा पिटवला जातोय की, हल्ली वाचले जात नाही. परंतु याविषयी सांगतो की, वाचकांची भूक भागविण्यासाठी त्यांना दर्जेदार साहित्य देण्यासाठी लेखक कमी पडत आहेत. वाचक कमी पडत नाहीत. तात्कालिक लेखकाच्या मनात दमदार साहित्य देण्याची ताकद पाहिजे. लोकप्रियता ही बाजारी स्वरूपाची झाली आहे. त्यातील मूळ बाजूला पडल्यामुळे परिस्थिती वेगळी झाली आहे. शहरे साफसफाई करण्यासाठी पाच ते सहा हजार कामगार नेमले जातात. परंतु एखाद्या ग्रंथालयातील पाच ते सहा लोकांना पगार दिला जात नाही. हा विरोधाभास थांबला पाहिजे. बौद्धिक साफसफाई करणाऱ्यांना सन्मान दिलाच पाहिजे अशी माझी भूमिका आहे. ग्रंथ हा बौद्धिक ठेवा आहे. शासन, राज्यकर्ते आणि समाजाने ही पुस्तकांची चळवळ जीवापाड जपली जाणे गरजेचे आहे. 400 ते 500 रुपये कोल्ड कॉफी पिण्यासाठी



घालवण्यापेक्षा, पर्यटन आणि इतर चंगळवादाला जवळ करण्यापेक्षा पुस्तके घ्या आणि वाचा, पुस्तके भेट द्या, पुस्तकांचा प्रचार- प्रसार करा. हाच पुस्तकांचा जीवनात अनमोल ठेवा आहे. अशी भावना लेखक विश्वास पाटील यांनी संवाद साधत व्यक्त केली.

**शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड**

---

तुकारामनीती
भाग -50

# पाईकपणें जोतिला सिद्धांत । सूर धरी मात वचन चित्तीं ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**प्रत्येक व्यक्ती त्या त्या काळाच्या इतिहासाचे अपत्य असतो. ज्या त्या काळातील राजकीय, आर्थिक, सामाजिक, ऐतिहासिक, लेखन आणि सांस्कृतिक घडामोडींचा प्रभाव त्याच्या सर्वच कार्यकर्तृत्वावर आढळून येतो. समकालीन घडत असणाऱ्या घडामोडी त्याच्या सर्वांगीण जडणघडणीस प्रभावित करत असतात. याच अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम हे समकालीन होते आणि त्यांनी एकमेकांना पूरक अशा भूमिका घेऊन आपआपली कार्ये संपन्न केली. लोककवी संत तुकाराम महाराजांची कीर्ती पुणे पंचक्रोशीत पोहोचली आणि याची खबरबात छत्रपती शिवाजी महाराजांना लागली. आपल्याच परिसरातील एक सामान्य शेतकरी कुटुंबातील वारकरी अभंग लिहून कीर्तनाच्या माध्यमातून जनसामान्यांचे प्रबोधन करत आहे याची शहनिशा महाराजांनी केली आणि एकदिवस प्रत्यक्ष तुकाराम महाराजांच्या कीर्तनाला जाऊन बसले, याचे तुकाराम महाराजांना मोठे अप्रूप वाटले. छत्रपती शिवाजी महाराज वारंवार कीर्तनाला उपस्थित राहताहेत हे पाहून संत तुकाराम महाराजांना छत्रपती शिवाजी महाराजांची महती माहित असल्यामुळे एका कीर्तनात त्यांनी सहजच "शिव तुझे नाव ठेविले पवित्र। छत्रपती सूत्र विश्वाचे की॥" असे उद्गार काढले.**

त्याशिवाय छत्रपती शिवाजी महाराजांना संत तुकाराम महाराजांची अवस्था माहिती झाल्यामुळे त्यांनी मौल्यवान जडजवाहीर नजराणा तुकाराम महाराजांना भेट पाठविला, परंतु वैराग्य महामेरू जगद्गुरू तुकोबारायांनी शिवाजी महाराजांचा नजराणा परत पाठवतांना राजांना उपदेशपर काही अभंग लिहून पाठवले. त्यांत "दिवट्या छत्री घोडे । हें तों बऱ्यांत न पडे ॥" या अभंगाबरोबरच

**आम्ही तेणे सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी ॥**
**तुमचे येर वित्त धन । ते मज मृत्तिकेसमान ॥**
**कंठी मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ॥**
**म्हणवा हरीचे दास । तुका म्हणे मज हे आस ॥**

हा महत्वपूर्ण अभंग लिहून महाराजांचा मूल्यवान नजराणा साभार परत केला. एकदम तरून वयात छत्रपती शिवाजी महाराजांना संत वचनांची गोडी लागली. नित्य नेमाने महाराज संत तुकाराम महाराजांच्या कीर्तनाला जाऊ लागले. त्यांच्या अभंग-कीर्तनाचा प्रभाव महाराजांच्या जीवनात दिसू लागला. छत्रपती महाराजांची वृत्ती पालटू लागली. याचा परिपाक म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज सखोल विचार करतांना अभंग लिहिते झाले.

**नाशिवंत सुखासाठी । अंतरला जगजेठी ॥**
**नाही नाहि याती गोडी । लक्ष चौऱ्यांशी जोडी ॥**
**मनुष्यजन्म गेल्यावारे । काय करशील बारे ॥**
**शिवराजे सांगे जणा । म्या तो सोडिली वासना ॥**

हा छत्रपती शिवाजी महाराजांनी लिहिलेलेला एकमेव अभंग तंजावर येथील सास्वती महालामध्ये सापडला आहे. यावरून हे लक्षात येते की; दोन युगप्रवर्तक महापुरुष एकत्र आल्यानंतर काय काय बदल होतात? मानवी जिवनात संगती किती महत्वपूर्ण आहे( ? ) याचे हे सर्वोत्तम उदाहरण म्हणायला हवे.

त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज आणि संत तुकाराम महाराजांच्या भेटी सातत्याने होत राहिल्या. त्यातच दिवसेंदिवस काळ खडतर येत गेला. छत्रपती शिवाजी महाराजांसमोर नवनवीन आव्हाने उभी राहत होती. मावळ्यांना धीर देणाऱ्या शब्दांची नितांत गरज होती. यातूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी तुकाराम महाराजांना आपल्या शूर-वीर मावळ्यांना मार्गदर्शन करण्याची विनंती केलीं आणि त्यातूनच संत तुकाराम महाराजांनी पाईकीचे अभंग लिहिले. पाईक म्हणजे एकनिष्ठ भाव, ज्यातून केवळ आणि केवळ सेवाभाव द्रवत असतो. आपला प्राण गेला तरी बेहत्तर परंतु पाईक आपली निष्ठा आपल्या दैवातावरून ढळू देत नाही. हा सर्वोच समर्पण भाव आपल्या मावळ्यांमध्ये जागविण्यासाठी संत तुकाराम महाराजांनी जवळपास १७ महत्वपूर्ण अभंग लिहून आपल्या निष्ठावान भक्तांना ते उपदेश करते झाले.

**पाईकपणें जोतिला सिध्दांत । सुर धरी मात वचन चित्तीं ॥१ ॥ पाइकावांचून नव्हे कधीं सुख । प्रजांमध्यें दुःख न सरे पीडा ॥२ ॥ तरि व्हावें पाईक जिवाचा उदार । सकळ त्यांचा भार स्वामी वाहे ॥४ ॥ पाइकीचें सुख जयां नाहीं ठावें । धिग त्यांनीं ज्यावें वांयांविण ॥४ ॥ तुका म्हणे एका क्षणांचा करार । पाईक अपार सुख भोगी ॥५ ॥**

संत तुकाराम महाराजांच्या प्रस्तुत अभंगाचे सूक्ष्मपणे निरीक्षण केले असता, आपल्याला एका निष्ठावंत माणसाच्या जीवनातील लक्ष आणि त्यातून निष्पन्न होणाऱ्या त्याच्या समर्पण भावनेचे दर्शन



होते. बाराव्या शतकापासून वारकरी संप्रदायाचे प्रारंभ झालेले कार्य सतराव्या शतकातदेखील अविरतपणे चालूच होते. एखादा संप्रदाय म्हणजेच विचार समाजाच्या एवढा खोलवर रुजून तो आजतागायत अखंडपणे का सुरु असेल? अनेक संकटांचा मुकाबला करून वारकरी आणि वारकरी संप्रदाय आज सुद्धा तेवढ्याच क्षमतेने घट्ट पाय रोवून समाजाच्या केंद्रस्थानी उभा आहे. सर्वांसाठी खुला आहे. वारकरी संप्रदायाच्या अनुयायांवर अगोदरही हल्ले झाले, आजही होत आहेत आणि पुढेही होणार असले तरी हे काम अविरतपणे चालूच राहणार आहे. समाजाला सर्वार्थाने समीक्षा करण्यासाठी खुला असलेला जगातील एकमेव वारकरी संप्रदाय असून इतर कोणत्याही संप्रदाय अथवा धर्म प्रसारकांवर एवढी टीका केल्यास त्या टीकाकारास त्या संप्रदायाचे अनुयायी धमक्या दिल्याशिवाय राहणार नाहीत, मात्र मी माझ्या "तुकाराम निती" द्वारा आणि या अगोदर शेकडो लेखक-समीक्षकांनी वारकरी संप्रदायाची विविधांगाने समीक्षा केली आहे; परंतु एकही महाराज, कीर्तनकार अथवा वारकऱ्यांचा धमकी किंवा असे का लिहिता( ? ) या संदर्भात फोन आला नाही. हे खुले आवाहन स्विकारून आम्हीच आमची समीक्षा करून पुढे जात असतो. याचा परिपाक असा की, लोक साधक-बाधक विचाराने वारकरी संप्रदायाशी जुळवून घेतात. इथे कोणतीही कट्टरता चालत नाही. याच न्यायाने तुकोबांच्या गाथ्यात आलेले हे पाईकीचे अभंग म्हणजे समाज आणि शूर योध्यांची देश-धर्म-कर्तव्याप्रती एकनिष्ठ बांधणी करण्याचे महत्कार्य आहे. माणसाची निष्ठा माणसाचे कतृत्व सिद्ध करत असते. छत्रपती शिवराय आणि संत तुकोबाराय हे एकत्र बसून विचार-विनिमय करत असत. त्यातून मरगळ आलेले, संसाराकडे आकर्षित झालेले, यवनांच्या प्रलोभनाला बळी पडणाऱ्या छत्रपती शिवबांच्या मावळ्यांना आपल्या राज्य आणि मायभूमीप्रती प्रेम, निष्ठा, जिव्हाळा, आपुलकी निर्माण होऊन हे सैनिक आपल्या प्राणाची आहुती देण्यासाठी, रयतेचे राज्य उभारण्यासाठी पुन्हा सर्वाशक्तीने उभे रहावेत यासाठी तूकोबांनी या अभंगांची निर्मिती केली आहे.

पाईक किती निष्ठावान असला पाहिजे? आपण घेतलेली शपथ त्याच्यासाठी सर्वोपरी असली पाहिजे. "प्राण जाय पर वचन न जाय" प्रमाणे पाईकाचे जीवन असले पाहिजे. पाईकपणा म्हणजेच निष्ठावंत भाव असल्याशिवाय मनुष्याचा जीवनात सुख असूच शकत नाही. त्यामुळे एखादा सैनिक जर पाईकपणे आपल्या देशाशी एकनिष्ठ झाला की त्याचा संपूर्ण भार राज्य आणि राजा उचलीत असतो. या उलट एखाद्याला पाईक होता आले नाही तर तो सर्वांच्या नजरेतून उतरल्याशिवाय राहणार नाही आणि एकदा का नजरेतून उतरला की मग त्याला कुठेच सन्मान मिळणार नाही. अशा माणसाचे जगणे म्हणजे वाया गेले असे म्हणावे लागेल. त्यालाच तुकोबाराय इथे "धिग जिणे" संबोधतात! एका क्षणासाठी केलेला पाईकपणाचा करार माणसाच्या संपूर्ण जीवानोद्धारासाठी अत्यंत महत्वपूर्ण ठरतो. माणसाच्या संपूर्ण सुखाचा तो स्वतःच आधार बनतो. त्याची निष्ठा अथवा पाईकपणा हीच त्याची ओळख होते आणि राज्य-राजा-प्रजा या सर्वांना सर्वकाळ सुखी ठेवणारा हा एकमेव पाईक भक्त सर्वांच्या केंद्रस्थानी येऊन बसतो.

यामुळेच वारकरी संप्रदाय आणि तुकोबांचा गाथा केवळ देव देव करण्यासाठी, रात्रंदिवस भजन-कीर्तन करण्यासाठी, वारीला जाण्यासाठी नसून इथल्या मातीत राबणाऱ्या प्रत्येक माणसाला लढणे आणि जगणे शिकवणारा महामंत्र आहे! तुकोबांच्या गाथ्यातील एक एक शब्द आणि अभंग म्हणजे सांप्रतकाळी नाउमेद झालेल्या माणसाला नवी उभारी देण्यासाठी सदैव चेतलेले स्फुल्लिंग आहेत. अनात्मविश्वास, अनिष्ठा, नकारात्मक विचार, दारिद्र्य, निरक्षरता, दास्यभावना जीवनातून कायमचे हद्दपार करण्याचे रामबाण औषध म्हणजे जगद्गुरू संत तुकोबांचे अभंग हे अनंत-अवीट शब्दामृत आहेत! कर्मकांडाने त्रस्त, थोतांड धर्माच्या प्रभावाने गलितगात्र झालेल्या सामान्य माणसातील देवभोळेपणा मुळासकट उपटून काढून तेथे आत्मविश्वास, श्रद्धा, प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, देश, माणूस, आई-वडील, सृष्टी याविषयी सार्वकालिक निष्ठा रुजविण्याचे महान कार्य तुकाराम बोवांनी तेंव्हाही केले होते आणि आजही तेवढ्याच ताकदीने करतांना दिसतात. गळ्यात तुळसीमाळ-मृदंग-वीणा आणि हातात टाळ घेऊन नाचत जाणाऱ्या वारकऱ्यांना हातात समशेर घेऊन छत्रपती शिवरायांसोबत मावळ्यांना लढायला प्रवृत्त करणारे आणि वर्तमानात भोवतालच्या अनंत आव्हानांना धोरोदत्तपणे तोंड द्यायला सिद्ध करणारे हे पाईकीचे अभंग म्हणजे आज नवसंजीवनीच आहेत!

संत तुकाराम महाराजांनी भजन-कीर्तन करतांना आपल्या भोवतालच्या छत्रपती शिवबांच्या मावळ्यांना टाळ वाजवायला लावून निष्ठावंत वारकरी आणि पाईकीचे अभंग लिहून तलवार चालवणारे बलवान धारकरी बनवले! हा सुंदर समन्वय संत तुकोबांच्या लेखनात आणि प्रबोधनात प्रकर्षाने दिसून येतो. सांप्रतकाळी तुकाराम नीती लिहिण्याचे मुख्य प्रयोजन म्हणजे दैनंदिन संसारातील अडचणींना सामोरे जातांना आपल्या जीवनातील पाईकपण म्हणजेच वारकरी जीवननिष्ठा, अलौकिक आनंददायी जीवनमूल्ये चिरकाल टिकून रहावीत. वर्तमानातील आलेल्या प्रसंगांना धीरोदात्तपणे तोंड देऊन आपले जीवन आनंदाने ओतप्रोत कसे भरले जाईल( ? ) यासाठी तत्पर राहून जीवन आनंदाने जगावे इत्यादी गोष्टी काही प्रमाणात साध्य करण्याचा नित्य प्रयत्न करणे हेच उद्दिष्ट! जय तुकोबाराय!

# कवी सदाशिव माळी यांच्या कवितेतील माहेरचे वर्णन



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**प्रत्येक विवाहित स्त्रीच्या मनाचा हळुवार कप्पा म्हणजे माहेर. बालपणीच्या अनेक आठवणींचा अमूल्य ठेवा म्हणजे माहेर. आई बाबांची माया, आजी-आजोबांचे कोड-कौतुक, बहिण- भावांशी छोट्या- छोट्या कारणांवरून होणारी लडिवाळ भांडणं, मैत्रिणींचा हवाहवासा तो सहवास हे सारं काही सासरी असताना प्रत्येक सासुरवाशिनीला आठवते. इयत्ता पाचवीच्या बालभारती या पाठ्यपुस्तकातील 'माहेर' या कवितेत कवी सदाशिव माळी यांनी खानदेशातील एका सासुरवाशीणीला माहेरी जाण्याची लागलेली ओढ सुंदर शब्दात व्यक्त केलेली आहे. माहेरी जाताना त्या स्त्रीला माहेरच्या माणसांची, तिथल्या प्रदेशाची आलेली आठवण व तिने माहेरी जाण्यासाठी केलेली तयारी कवितेत कवीने शब्दबद्ध केलेली आहे.**

कवी म्हणतात, **तापी काठची चिकण माती ओटा तरी बांधू ग बाई. असा ओटा चांगला तर, जातं तरी मांडू ग बाई.**

तापी नदीच्या काठची चिकण असणारी माती पाहून त्या मातीचा ओटा बांधावा असे एका सासुरवाशीनीला वाटते ... जेंव्हा छान ओटा बांधला जातो तेंव्हा त्या ओट्यावर एक जातं मांडावं अशी इच्छा त्या स्त्रीने व्यक्त केली आहे. पूर्वीच्या काळी आजच्यासारख्या पिठाच्या गिरण्या नव्हत्या. त्यामुळे जात्यावरंच दळण दळलं जायचं. त्यामुळे जातं हे प्रत्येक स्त्रीसाठी जिवाभावाचं होतं. पुढील ओळीत कवी म्हणतात,

**असं जात चांगलं तर , सोजी तरी दळू ग बाई.**
**अशी सोजी चांगली तर, लाडू तरी बांधू ग बाई.**

माहेरी जाण्याआधी सोजी काढून जात्यावर दळावी. व त्या जात्यावर दळलेल्या सोजीच्या पिठाचे छान लाडू बांधावे. व ते लाडू माहेरी जाताना सोबत न्यावे ही इच्छा त्या स्त्रीला होते. आपल्या सासरी जेंव्हा एखादी स्त्री काही पदार्थ बनवते. तेंव्हा तो खातांना तिला माहेरच्या माणसांची आठवण होते.तो पदार्थ जर तिच्या माहेरी कुणाला आवडत असेल तर तो त्या व्यक्तीला खाऊ घालावा असे तिला मनोमन वाटू लागते. सदाशिव माळी यांच्या कवितेतील स्त्रीला सुद्धा सोजीचे बांधलेले लाडू आपल्या माहेरी भावासाठी नेण्याची इच्छा होते. कवितेच्या पुढील ओळीत कवी म्हणतात,

**असे लाडू चांगले तर, शेलाच्या पदरी बांधू गं बाई.**
**असा शेला चांगला तर भाऊराया भेटू ग बाई.**

सोजीच्या पिठाचे बांधलेले लाडू घेऊन भावाच्या भेटीसाठी जावं असे त्या स्त्रीला वाटते. तिचा भाऊ तिला माहेरी घेऊन जाण्यासाठी रथ आणील व त्या रथाला नंदी जुंपिन अशी भावनाही कविने कवितेतून व्यक्त केलेली आहे.

**असा भाऊ चांगला तर, दारी रथ आणील ग बाई.**
**असा रथ चांगला तर , नंदी तरी जुंपिग ग बाई.**

नंदी जुंपलेल्या रथातून आपण आपल्या माहेरी जावं, व माहेरी सगळ्यांना भेटावं अशी ओढ या स्त्रीच्या मनाला लागली आहे.



अतिशय सुंदर शब्दात कवीने एका स्त्री भावनेचे वर्णन केले आहे. पुढील ओळीत कवी म्हणतात,

**असा नंदी चांगला तर , माहेराला जाऊ ग बाई.**
**असं माहेर चांगलं तर, धिंगा मस्ती करू ग बाई!**

सासरी असताना प्रत्येक स्त्रीला काही संसारिक जबाबदाऱ्या पार पाडाव्याच लागतात. परंतु जेंव्हा ती माहेरी येते. तेंव्हा काही दिवसांसाठी का होईना. तिला थोडा विसावा मिळतो. माहेरी घर कामातून तिला थोडीशी उसंत मिळते. त्यामुळे त्या स्त्रीला सुद्धा वाटते की पुन्हा बालपणी सारखीच धिंगामस्ती माहेरी गेल्यावर आपण करू. माहेरी असताना प्रत्येक स्त्रीला पुन्हा बालपणाप्रमाणे जीवन जगण्याची इच्छा होते. बालपणी केलेली धिंगामस्ती करण्याची इच्छा त्यामुळेच कदाचित त्या स्त्रीची झाली असेल. अशाप्रकारे आपल्या माहेर या कवितेत त कवी सदाशिव माळी यांनी स्त्रीच्या मनातील हळुवार भावना व्यक्त केल्या आहेत. इयत्ता पाचवीच्या वयोगटातील विद्यार्थ्यांना मनापासून आवडणारी ही कविता आहे.

# आणि भारावून टाकलेल्या त्या एका क्षणी...



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**कोकिळेच्या कुहू कुहूचा मधुर आवाज पडतो कानी, चैत्र पालवी फुटून,चैत्र चाहुलीचे तरंग उमटतात मनी, चैतन्याने नि आनंदाने भारावलेले क्षण. अन् आसक्त रुपी डोळ्यातले वळण वाटेवर अडकून राहिलेलं तन आणि मनं. ...आणि काल सहज परतीच्या वाटेवर परतत असताना, मन ओलेचिंब झाले. मंदिरावर ची ती भगवी पताका वाऱ्यावर फडफडून लक्ष वेधून घेत होती.पावलांना मागे खेचणारी ती जमीन खूप काही सांगू पहात असल्याची जाणीव त्या क्षणाला होत होती. मन गच्च भरुन गेले होते.एक अनामिक जवळिक जिव्हारी भिडली.अणि..!**

अन् तेव्हाही काही वर्षांपूर्वी म्हणजे लहान असताना, गुढपाडव्याची गुढी उतरली की वाटा वाटा ना वेध लागायचे मंदिरातील त्या घाटाचे,रान माळ मोकळे होऊन हिरव्या पानाचे धुमारे झाडावर डोलायचे.मोहरलेले मन उत्साह ताजेपणा अन् नवखेपणाने चमकायचे.

आठ दहा दिवस आधीच स्वच्छतेच्या कामांना उधाण आलेले असायचं. गोधड्या धुणे, भिंती सारवणे.घरांची साफसफाई, वगेरे वगेरे बरच काही... जत्रा म्हणजे हौस मौज, गोर गरीब, श्रीमंत साऱ्या गावाला आनंदाचे पेव फुटायचे. वार्षिक परीक्षा कधी तरी झालेली असायची.तर कधी थोडी मागे पुढे तर कधी ऐन यात्रेत व्हायची.तरीही आनंदाला उधाण आलेल असायचं. कळसावरची भगवी पताका मोठ्या आनंदाने वाऱ्याबरोबर फडफडायची, "जोतिबाच्या नावानं चांगभलं." च्या गजरात गावाला यात्रेचे वेध लागायचे. अगदी तसाच आनंद उत्साह पै पाहुणे आणि यातून झालेला मनमोकळा संवाद, तना मनावर आलेली मरगळ झटकून चेहऱ्यावर एक नवचैत्यन यायचे. तोच आनंद तोच उत्साह यावर्षीच्या सोहळ्यात पहायला अनुभवायला मिळाला. या सर्वात मुख्य दुवा म्हणजे एकमेकांच्या हातात असलेला तो प्रत्येक हात पाहताना अनुभवताना मिळालेला तो आनंद प्रत्येक गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर अनुभवायला मिळाला. हे काय कमी पण याच्यातच मुख्यत्वे करून या वर्षी गावातील प्रत्येक महिलेच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत असनारा आनंद अनुभवाची पर्वणी दरवर्षी पेक्षा यावर्षी काही औरच पहायला मिळाली. पंधरा दिवस आधीपासूनच गावातील प्रत्येक घर आंगन चैतन्याने भारावून गेले होते. गावातील वातावरण भक्तिमय आणि श्रध्देने भारावून गेल्या वाटा. विविध रंगांनी रंगून रांगोळीतील एखादी सुंदर कलाकृती आकाराला यावी असेच काही,दख्खनच्या राजाची सासन काठीची मनोभावे केलेली ती पूर्वतयारी, तो सफेद घोडा, केदार विजय ग्रंथाचा सप्ताह सोहळा, रामनवमी सोहळा, पहाटेचे श्रध्देने निघालेले लळीत, सासण काठीचे प्रस्थान, रत्नागिरी तील जोतिबा डोंगरावर झालेले स्वागत,मनाला सुखावून टाकत होते. आणि या सगळ्यात महत्त्वाचे असे की सोबत गावचे मुख्य ग्रामदैवत म्हणजे कुल स्वामी जोतिबा सोबत असल्याची एक जाणीव जाणवली. माहित नाही का पण सासन काठीचा हा ऐतिहासिक सोहळा देवा केदारनाथाच्या कृपेने अगदी निर्विघ्नपणे शांततेत पार पडला.

हनुमान जन्मोत्सव निनाम गावच्या यात्रेचा मुख्य दिवस यादिवशी मोठ्या भक्ती भावाने पुरण पोळी चा नैवेद्य करुन घरी डमरु वादन करुन देव बोळवन करुन देवाला नैवेद्य दाखवला जातो. त्याच दिवशी सायंकाळी जळव जोतिबा देवाचे आगमन, ढोल ताशाच्या गजरात फटाक्यांच्या आतशबाजीत वाजत गाजत मिरवणूक आल्यानंतर देवासमोर आरती होऊन देव मंदिरात येवून स्थिरावतात. अन् तदनंतर देवाचा छबिना सोहळा, मोठ्या दिमाखात जोतीबाच्या मंदिरातून भवानी मातेला भेटून जोर्तिलिंग नगरमधील जोतिबा भेटीचा सोहळा पार पाडत निश्चित स्थळी येऊन स्थिरावतो. देवाची पालखी देवळाभोवती फिरत मंदिरात एका बाजूला स्थिरावते. दुसऱ्या दिवशी यात्रेचे खेळणे, मोठ्या आनंदाने जळव देवाचे स्वागत होते. भक्तिमय झालेल्या वाटेवर घड्याळाचे काटे थोडेच थांबणार !

पाहुणे रावळे, माहेरवाशिणीनी भरलेली घरे सारे कसे चैतन्यदायी. संध्याकाळी अंथरुणावर पाठ टेकत टेकत सुख दुःखाच्या पोटऱ्या खोलता खोलता मिटलेल्या डोळ्यांच्या पापण्या पहाटे लगबगीने उघडतात. भारावलेल्या त्या वेळी झाडावरच्या त्या वेगवेगळ्या पक्षांचा आवाज आकाशातून उडत चाललेल्या पक्षांच्या किलबिलाटाचा आवाज अजून उस्ताह आणतात. अन् अन्... आशाच भारवलेल्या त्या वेळी आकाशात पश्चिमेच्या बाजूस असलेला पहाटेच्या वेळी चैत्री पौर्णिमेचा तो चंद्र , आणि त्याचे सौंदर्य नजरेत भरता भरता हरवून गेलेले मन..! शब्दात सांगणे कठीण च.

दुसरा दिवस खेळणे निवद ( नैवेद्य ) नारळ देण्यासाठी पत्र्यातल्या जोतिबाच्या पुढे अगदी सकाळी सात वाजता साखरभात घेऊन लागलेली रांग, दुपारी दीड-दोन वाजेपर्यंत चाललेली गडबड. लहान मुलाला देवाच्या पायावर घालण्यासाठी एखादी लेकुरवाळी ची धडपड मोठ्या श्रध्देने बाळाला देवाच्या पायावर ठेवल्यावर उजळलेला तो चेहरा पाहून यात्रेला आल्याचं समाधान नाही झालं तर नवलच. सुखदुःखाचे साकडे घालता घालता गोंडा, हार, सोडवान अशी सारी लगभग आतला जोतिबाला जोडी जोडी करुन नारळ देवून प्रदक्षिणा घालताना गायमुखातील तीर्थ डोळ्याना केसाना लावायचे. अन मग त्याच्या शेजारी असलेलं मारुती रायाच्या मंदिरात पायरीवर नमस्कार करत मनातल्या मनात हनुमानाचा जप करत नारळ अर्पण करुन बाहेर पडायचे. बाहेर आले की जळव जोतिबाच्या मंदिर शेजारी असलेल्या तळ्यातल्या लक्ष्मी देवीच्या मंदिरात नतमस्तक होऊन सुख दुःखाची देवाण घेवाण करत मनोभावे श्री फळ अर्पून बाहेर पडणारी पावले. अशी सारी लगभग डोळ्याचे पारणे फेडते. आणि मग नारळ अर्पण करून जत्रेतल्या खेळण्याकडे पावले वळतात. खेळण्याचा दिवस संपता संपता दुपारी आडिच-तीनच्या दरम्यान गर्दी पांगते अन फु..फु.. करत शिंग निनादत, हलगी कडाडते, ढोल अन् ताशाचा कडकड आवाज मंदिरात घुमतो. अन् रात्री आलेला देव परत निघाल्याचे साऱ्या गावाला कळते. वेळेला आलेला निवांतपणा पुन्हा एकदा चंचल होऊन देवाला पाच पावले सोडवण्यासाठी भक्तीभावाने दिपमाळेजवळ जमतं अन् आरती होऊन पुढचा प्रवास सुरु होतो. पेढ्यांच्या प्रसाद वाटता वाटता भरलेल्या मनाने नि भरलेल्या डोळ्यानी देवाला निरोप दिला जातो. कधीमधी आनंदाश्रू सारखा वरुण राजाही देवाच्या भेटिला येतो. अन् वाटेला पांगतो. शक्यतो वाटा वाटा ना घराचे वेध लागतात. रस्ते रस्त्यांनी पांगतात. अन् हळू हळू विसवणारा तो सूर्य घराघरांच्या अंगणात विसावतो. अन त्या क्षणाला आलेला तो निवांतपणा एक आगळिक निर्माण करतो. एक दिवस दोन दिवस करता करता पाकाळणीचा दिवस येतो. पाकाळणी म्हणजे यात्रेपासून पाचवा दिवस, या दिवशी पुन्हा एकदा पाच-पाच नैवेद्यचा नैवेद्य दाखवला जातो. किती वर्षातून यावर्षी हा सोहळा याची देही याची डोळा असा झाला. डोंगरावरच्या वाडी रत्नागिरी येथून आलेल्या सासन काठीचा तो ऐतिहासिक असा सोहळा आणि त्यामागची प्रत्येक भाविक भक्ताची आणि सर्व लहान थोर मंडळींची धडपड त्या प्रत्येक डोळयात चमकत होती .ख-या अर्थाने यात्रा या शब्दाचा अर्थ अनुभवला. गावाचा अध्यत्मिक, धर्मिक, सांस्कृतिक वारसा पुढच्या पिढीला देत गुलाल खोबऱ्याची उधळण करत आणि जोतिबाच्या नावानं चांगभलंच्या गजरात फटाक्यांच्या आतषबाजीत सासन काठी स्थानापन्न झाली. तेव्हा ख-या अर्थाने डोळ्याचे पारणे फिटले. मायेच्या हळव्या स्पर्शाची जाणीव ती ओली, त्या एका अत्युच्च क्षणाला ओलीचिंब करून गेली. जुळलेल्या मना मनाच्या तारा उसवलेल्या संसाराचे टाके घालता घालता त्या पवित्र चरणी लीन होतात. पुढे चालणाऱ्या त्या प्रत्येक पावलावर समरप्रीत होतात. अशा ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार व्हावे हे खरचं अहो भाग्यमचं.

यात्रा संपते वाटा वाटा नी पांगते. देवळावर उडालेला गुलाल जमिनीवर विसावतो. भारावलेली मने शिवेपार होत जातात, तेव्हाची मनाची झालेली उलघाल, हाताचे ते पालव अस्पष्ट होत शिवेंपार होताना, कृतज्ञता म्हणून असेल किंवा काही कारणाने असेल त्या आनंदाश्रुरुपी मोत्यानी घरंगळत जाऊन त्या परमेश्वराच्या चरणी स्थिर व्हावं. असेच वाटतं राहते. कसं असते ना ! तरुण वर्ग म्हणजे गावची शान असतो. गावाचा कणा आधारस्तंभ असतो. त्याचे याच्यापेक्षा मोठे कोणते उदहारण असू शकते. अशा वेळी अभिमानाने ताठ झालेली मान त्या जोतिबाच्या चरणी नतमस्तक होते तेव्हा, परमेश्वरा जवळ एकच मागणे मागवेसे वाटते. त्या प्रत्येक पाठीवर आशीर्वादाचा तो हात असाच कायम रहावा.

विकासाच्या प्रत्येक पावलावर तुमची सोबत आणि कष्ट करणाऱ्या हाताला यश लाभावे. त्या प्रत्येकाच्या पाठीवर वरदहस्त कायम रहावा हीच श्री चरणी मनस्वी इच्छा.

अर्पिते पावन चरणाला भाव भक्तीची फुलं रं भाव भक्तीची फुलं रं...
देवा जोतिबा चांगभलं हो देवा जोतिबा चांगभलं.

# विजेच्या तारांमुळे येणारे मृत्यू ; एक शोकांतिका...!



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**माणसे असोत किंवा मुके प्राणी असोत या, पृथ्वीतलावर कायमचे ते निवासी नसतात. जन्म आहे सोबतच मृत्यू सुद्धा निश्चितच ठरलेला असतो. व आजपर्यंत तो कोणालाही चुकला नाही कारण, निसर्गाचा तो नियमच आहे. याचा सर्वांनी स्वीकार करायला पाहिजे. यामध्ये दररोज कोणी अपघातात मरण पावतात तर..कोणी दारू पिऊन मरण पावतात, कोणी उपाशी मरण पावतात तर...कोणाकडे पैशाची सोय नसल्यामुळे व कोणी मदत न केल्याने बिना उपचाराने मरण पावतात, एखाद्या वेळी विजेचा कडकडाट झाला की, वीज पडल्याने मरण पावतात प्रत्येकांचे मृत्यू होणे किंवा येणे हे वेगवेगळे असतात.**

आपण सर्वजण चांगल्याप्रकारे जाणूनच आहोत पण तिथेच नाहकच कोणाच्या मृत्यूचे कारण बणने हे तर..योग्य नाही. व कोणत्याही माणसाचे हे कर्तव्य सुध्दा नाही माणसाला वाचवणे हा माणुसकी धर्म आहे मारणे माणुसकी धर्म नाही. याचा प्रत्येकांनी अभ्यास करायला पाहिजे. एखाद्याची काहीही चूक नसताना नाहकच इतर गोष्टींमुळे मृत्यू येत असेल तर. ..याला आपण काय म्हणावे... ? बरेचदा आपण वृतपत्रात किंवा टेलिव्हिजनवर येणाऱ्या बातम्यांमध्ये वाचले असणार, ऐकले असणार. ..किंवा त्या ठिकाणी घडलेल्या दुदैवी घटनेच्या ठिकाणी जाऊन बघितले असणार. .ती, घटना म्हणजेच वास्तव स्वरुपात असलेली व शासनाच्या हलगर्जीमुळे होणारी जिवीतहानी व नाहकच गोर, गरीबांचा, बळीराजाचा, मोलमजुरी करणाऱ्यांचा, कामगारांचा व मुक्या प्राण्यांचा मृत्यू जिवंत विजेचा ताराच्या स्पर्श होऊन जात जात असेल तर. .आपण दोष कोणाला द्यावे. .. ?आजपर्यत बरेचदा जिवंत तारा समीनीवर पडल्यामुळे व त्यातून झालेल्या स्पर्शाने बरेच लोकांचे तसेच मुक्या प्राण्यांचे जीव गेलेले आहेत. अशा दुर्देवी घटना होणे हि एक प्रकारची शोकांतिकाच म्हणावे लागेल. ..आपण आजपर्यंत अशा अनेक घटना वाचले असणार किंवा वाचण्यात आले असतील यात काही शंका नाही. एवढेच नाही तर..अशा प्रकारच्या घटना गोर, गरीब, बळीराजा, मोलमजुरी करणारे तसेच मुक्या पाळीव प्राण्यांच्या बाबतीत घडत आहेत. अशा घटना, घडताना बघून शासन या घटनांकडे लक्ष का देत नाही हा अनेकांना पडलेला भारी प्रश्न आहे. दुःख एका गोष्टीचं वाटतो की, जगाला पोसणाऱ्या बळीराजाच्या पिकाला वाचविण्यासाठी पूर्ण वीज पुरवठा मिळत नाही व वीजबील गगणात जाऊन भिडलेला दिसतो वरतून निसर्ग ही कोपत आहे शासनही पूर्णपणे लक्ष देत नाही, पिकलेल्या मालाला पाहिजे तेवढा भाव मिळत नाही मग एवढा वीजबिल त्याने कुठून भरावे... ?या कडे शासनाची पाहिजे तेवढी लक्ष नाही एवढेच नाही तर.. जिवंत विजेच्या पडलेल्या तारांमुळे होत असलेल्या स्पर्शाने अनेकांचे जीव जात आहेत,कित्येक गेले आहेत. सोबत गाय, बैल, म्हसी, शेळ्या, मेंढ्याचा सुद्धा जीव गेलेला आहे एवढे सारे नुकसान होताना सुद्धा याकडे खरच कोणी लक्ष द्यावे. .. ? यामध्ये बळीराजा, गोर, गरीब, पाळीव प्राणी तसेच मोलमजुरी करणाऱ्यांचा जीव जात आहे. असेच जर...वारंवार होत राहिले तर. .मोलमजुरी करणारे, गोर,गरीब काय खाऊन जगावे.. ? व बळीराजाने काम तरी कसे करावे. . ? पाळीव प्राण्यांनी कुठे जाऊन पोट भरावे.. ? आधीच त्यांची संख्या घटत चाललेली आहे. जिथे, तिथे संकटांच्या डोंगरापायी त्यांच्या जीवनात अंधार दिसत आहे . आशेचा किरण कधी त्यांच्या जीवनात येईल की, नाही माहीत नाही आजही एवढ्या घटना घडत असताना सुद्धा काही ठिकाणी विजेच्या डिपीला कुलूप लावलेला दिसून येत नाही. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कारण बरेचदा लहान मुले खेळत असताना त्या उघड्या डिपीकडे जाऊ शकतात अशा दुर्दघटना होण्या आधीच काळजीपूर्वक लक्ष दिले तर...मुळात अशा घटना, घडताना दिसणार नाही. त्याच प्रमाणे जमीनीवर पडलेल्या जिवंत तारामुळे स्पर्श होऊन कोणी मृत्यूच्या दारात जाणार नाही या,सर्व महत्वाच्या गोष्टींकडे शासनाने लक्ष देणे अत्यंत काळाची गरज आहे.

# संबंध

आधुनिक केसरी

**सुख दुःखाचा धागा त्यास जीवन असे नाव. त्यात भेटती आपले जिवलग, मन जुळता, जुळतात प्रेमाचे, मायेचे, स्नेहाचे जवळचे संबंध. काही नाते ही मनातून असतात... त्यांना कोणते नाव देण्याची गरज नसते. मनातून जे नाते जुळते ते खरे आपुलकीचे, माणुसकीचे नाते असते. वर वरच्या नात्याचा काही उपयोग नसतो. माणूस समाजप्रिय प्राणी आहे, तो एकटा जगू किंवा राहू शकत नाही. त्या साठी नित्य जीवनात त्याचा कोणाशी ना कोणाशी संबंध हा येतच असतो. तो आला तर तो माणूस... प्रत्येकाला येथे मन आहे.. ते प्रत्येकाने जपले पाहिजे.**

काहींना सवयच असते,नित्य इतरांना नावे ठेवण्याची, बढाई मारण्याची... आपलेच म्हणणे खरे करण्याची, अशा स्वार्थी नात्याचा, संबंधाचा काही उपयोग नाही.त्या पासून चार हात दूर रहावे. आपल्याच नावाचा उपयोग करून मोठे होणारे लाखो भेटतात.. अन् काम झाले की तेथेच आपली बदनामी करून मोकळे ही होतात.. मग त्याला काय अर्थ राहतो.. ते ही विसरतात.. आपल्याला नित्य पाहणारा कोणी तरी आहे ? त्यांचे अस्तित्व कधी विसरू नका म्हणजे झालं.



रस्त्याने जाणारे भाऊ बहिण असले तरी, आपण त्यांना नावे ठेवायला कमी पडत नाही, किंवा त्यांचे नको ते संबंध जोडून ही रिकामे होतात ? जिभेला हाड च नाही ना ? तुम्ही तरी काय करणार ? आपल्या अवयवांचा दुरुपयोग केल्याशिवाय करमत नाही ना ? चांगले विचार मनाला शिवत च नाही ? जे स्वतःच्या मनात, डोक्यात येते ते आपण बोलत राहतो,पण त्याचा दुष्परिणाम किती होतो, हेच विसरत चाललो आहे. माया, ममता, जिव्हाळा नित्य तुडविली जात आहे. गोतावळा कमी कमी होत चालला आहे.जो तो स्वार्थी जीवन जगत आहे. खोट्या आशेवर जीवन जगुन काय उपयोग ? मायेचे नाते हे खरे आपले नाते असते. संबंध हा शब्द खूप खोल आहे.त्याच्यात खूप मोठा अर्थ दडला आहे.

प्रत्येकाने एकमेकांशी जिव्हाळ्याचे,सौख्याचे संबंध ठेवावे. रक्ताच्या नात्यापेक्षा हेच लोक आपल्या लवकर अन् निस्वार्थी वृत्तीने मदतीला येतात.माणुसकी धर्म पाळणारे लोक आपल्या जिवाभावाची असतात.सरड्यासारखी रूपे बदलणारी संबंध नसावी.ते निर्मळ, प्रेमळ, स्पष्ट, पवित्र, एकनिष्ठ, घनिष्ठ असावे. मांडुळालाही दोन तोंडे नसतात,पण येथे माणसांना दोन तोंडे आलीत गोगलगाय अन् पोटात पाय अशी लोक आहेत.. नित्य बुरखा घालून अवती भवती वावरतात. पण, त्याचा काय उपयोग. खायचे दात वेगळे, अन् ...जसे दिसते तसे असतेच असे बिल्कुल नाही. समाधान हा फार मौल्यवान खजिना आहे.. तो जीवनात नित्य जपावा.

त्याची सर कशालाच नाही ? ते ज्याच्याजवळ आहे, त्याचा सारखा कुबेर कोणीच नाही ? माणुसकीचा पुजारी तिन्ही लोकी पुजला जातो. कोणी माथ्याला टिळा, गंध लावला म्हणजे तो खूप मोठा योगी होत नाही. त्याचासारखा जहरी साप कोणताच नाही.

म्हणून म्हणावेसे वाटते....संबंध हे जिवाभावाचे, निस्वार्थी, प्रेमळ, मायाळू, स्पष्ट, एकनिष्ठ असावे..त्यात बिल्कुल गर्व नसावा..

**सौ.प्रतिमा अरुण काळे**
**निगडी प्राधिकरण पुणे,४४**

# संयम

आधुनिक केसरी

असं म्हणतात, की वाट पाहण ही एक कला आहे. त्यात वेळ आणि संयम हे साथीदार असतात . संयम ठेवला की योग्य वेळ आल्यावर वाट पाहण लाभदायक ठरत . वाट पाहण ही कला अनेक प्रकारे आपल्या प्रत्येकालाच आत्मसात आहे . कधी कधी प्रेमाची , कुणाच्या येण्याची, कधी कुणासवे बोलण्याची किंवा संवादाची , किंवा निर्णयाची आपण वाट पाहतो . वाट पाहाण हे एका छोट्या स्तरापासून मोठ्या स्तरापर्यंत मर्यादित असत . आज कुणी तरी सहज म्हटल की तो माझ्या आयुष्यात कधी येणार, मी किती दिवसापासून वाट पाहतेय त्याची, पण तो अजून नाही आला किंवा तो मला कधी आणि कसा भेटेल अजून किती वाट पाहू ? म्हटल ह्याच उत्तर योग्य वेळ आल्यावरच कळेल. तिला ते फारस पटलं नाही कारण संयम ठेवण फार अवघड आहे असं तीन म्हटल. खरंतर या निसर्गाच्या आणि डोंगराच्या सानिध्यात हे मला अचानक आठवलं याच उत्तर काय ? ह्या झाडांना डोंगरांना नद्यांना यांनाही कधी कोणत्या जोडीदाराची गरज पडत नाही का ? जर पडत असेल तर ती नेमकी कोणाची असावी बरं ! सृष्टीचा एवढा पसारा... सुर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत..... नकळतपणे कितीतरी कालखंडापासून अनियमित सुरू आहे. वाऱ्याची एखादी मंद झुळूक खूप असते उत्तर द्यायला असं म्हणतात. वाट पाहून शेवटी मला उत्तर मिळालं ते असं की तो रामराया. आता अजून एक महत्त्वाची गोष्ट वाट पाहणं हे फार संयमी लक्षण आहे असं मी आधी म्हटलं, तसं संतही आपल्याला तेच सांगतात. आपल्या गुरूंपासून तर आप्तेष्टांपर्यंत सगळे म्हणतात वाट पाहून दमलो होतो पण बरं झालं ! बाबा तू आलास आता उदाहरण म्हटलं तर भक्तश्रेष्ठ भरताच. प्रभू श्रीरामांच्या हाती राज्य देण्यासाठी त्याला १४ वर्षे वाट पाहावी लागली. तसेच रामरायाच्या तीनही मातांनी आपल्या मुलांसाठी तर उर्मीलेने तिच्या पतीसाठी वाट पाहिली. केवढा हा संयम!!! परमपूजनीय श्री गोंदवलेकर महाराज हे गुरु शोधार्थ बराच काळ भटकत राहिले आणि त्यानंतर श्री तुकामाईंची आणि त्यांची भेट झाली. छत्रपती शिवाजी महाराजांना जेव्हा समर्थ रामदास स्वामींची भेट घ्यावी अशी इच्छा होती तेव्हा नेमके समर्थ कुठे आहे तेथून तर समर्थांची भेट होईपर्यंत वाट पाहावी लागली .असे म्हणतात की, प्रत्येक गोष्टीसाठी योग्य वेळ नक्की येते पण ती येईपर्यंत संयम असावा कधी काही जण भावना अनावर होऊन आत्महत्या करतात. एवढा ही संयम आपल्यात का नसतो ? आपण तेवढी वाट का पाहू शकत नाही. एखादा सुंदर क्षण सूर्यास्ताचा किंवा सूर्योदयाचा डोळ्यात साठवण्यास आपल्याला कमीत कमी चार पाच तासांचा गड किंवा डोंगर चढाई करावी लागते. त्यातही काही लोक वायफळ बोलत लवकर ती गोष्ट होईल म्हणून खूप घाई करतात, पण शेवटी सूर्याच्या वेळेला तो उगवतो किंवा मावळतो . आपल्या म्हणण्याने तो लवकर किंवा उशिरा उगवेल असं होत नाही. या साऱ्यांत प्रश्न उद्‌भवतो की नेमका संयम कसा अंगीकृत करावा ? त्यासाठी अध्यात्मात खूप छान उपाय सांगितले आहे त्यापैकी एक म्हणजे माळ जपण. या प्रयोगात१०८ मणी संपेपर्यंत आपण संयम ठेवतो किंवा सातत्याने ते करत गेल्याने संयम आपसूक वाढतो. दोन-पाच माळा होईपर्यंत उठायचे नाही. असा निश्चय जरी केला तरी आपल्यात अर्धा ते एक तास संयम आपोआप येऊ लागतो. दुसरा म्हणजे ध्यान धारणा किंवा ध्यान केंद्रित करण. त्यात आपण ओमकार म्हणू शकतो किंवा आवडत्या देवाचं नाव घेणं हे केल्यानेही संयम अंगी येतो. तसेच आपल्या शरीरात कायम एक ऊर्जा स्रोत वाहत असतो. त्यालाच आपण हार्मोन्स चेंजेसही म्हणतो. ह्याच ऊर्जा स्त्रोतामुळे आपल्यात चंचल संयम राहतो व वरील प्रयोगामुळे तो ही ताब्यात येऊ शकतो म्हणण्यापेक्षा ती ऊर्जा आपण योग्य ठिकाणी वापरू शकतो. अनेकदा आपण असं ऐकतो की शास्त्रज्ञ वेडा झाला, ह्याला त्याच्या कामाने झपाटल आहे वगैरे. अशा लोकांनी अती उच्च पातळीला जाऊन काम केल्यामुळे त्यांचा संयम नष्ट होतो. परंतु पूर्वी महर्षी कनाद, वाल्मिकी हे सगळे त्याच पातळीला जाऊन काम करायचे. पण त्यांना ह्या अध्यात्मिक सरावांची सवय होती म्हणून त्यांना कधी दुसर्या सरावांची गरज पडली नाही . म्हणजेच एकंदरीत संयम अंगी आणायला आपल्याला विज्ञानाइतकेच अध्यात्म ही गरजेचे आहे. जेणेकरून संयम अंगी बांधला की वाट पाहणे जमेल आणि आणि ध्येयपूर्ती घडेल किंवा आपल स्वप्न पूर्ण करण्यास वाट पाहण ही जमेल.आणि जेव्हा ते स्वप्न सत्यात उतरेल तेव्हा आनंदाने ते जगण्याच बळ मिळेल शेवटी अध्यात्माने सारे सिद्ध होतं आणि साध्य करता येत असं म्हणतात हेच विधान खर. शेवटी संत तुकाराम महाराज म्हणतात तेच खरे .. असाध्य ते साध्य करिता सायास ।। कारण अभ्यास तुका म्हणे ..

**– प्राजक्ता रविंद्र मनवेलीकर**

# पोलीस कोणत्या परिस्थितीत एन्काउंटर करतात



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**१३ एप्रिल २०२३ रोजी माफिया अतिक अहमदचा मुलगा असद अहमद आणि त्याचा सहकारी गुलाम मोहम्मद पोलीस चकमकीत ठार झाल्याची बातमी आली. या घटनेने चकमकीच्या चर्चेला उधाण आले आहे. उमेश पाल खून प्रकरणात दोघेही आरोपी होते. असद आणि गुलाम यांनी गोळीबार केल्याचा दावा यूपी पोलिसांनी केला, त्यानंतर पोलिसांनाही गोळीबार करावा लागला. याच क्रमात दोघांचा मृत्यू झाला. मात्र यूपीचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी या चकमकीला 'खोटे' म्हटले आहे. माजी मुख्यमंत्री मायावती यांनीही या प्रकरणाची चौकशी आवश्यक असल्याचे म्हटले आहे. भारतीय संविधान किंवा कायद्यात कुठेही एन्काउंटर या शब्दाचा उल्लेख नाही. पोलिसांना कोणत्याही नागरिकाचा जीव घेण्याचा अधिकार नाही. बळाचा वापर किंवा गोळीबार करण्याबाबतही स्पष्ट नियम आहेत की कोणतीही जीवघेणी इजा होऊ नये.**

दुसरा पर्याय नसतानाच पोलीस ही मर्यादा ओलांडतात कारण जसे .. स्वसंरक्षणः जेव्हा संशयित किंवा आरोपी पोलिस दलाच्या जीवाला धोका निर्माण करतो. सामान्य नागरिकांची सुरक्षाः जेव्हा संशयित किंवा आरोपींमुळे सामान्य नागरिकांच्या जीवाला धोका असतो.

असे असतानाही सर्वसाधारण कायदा व सुव्यवस्थेत चकमकीची चर्चा आणि मान्यता वाढत असल्याचे दिसून येत आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने फेब्रुवारी २०२२ मध्ये संसदेत सांगितले की, जानेवारी २०१७ ते जानेवारी २०२२या कालावधीत देशात पोलीस चकमकीत ६५५ लोकांचा मृत्यू झाला. माओवादी अतिरेकी प्रभावित छत्तीसगडमध्ये सर्वाधिक १९१ मृत्यू झाले. यानंतर उत्तर प्रदेशचा ( ११६ ) क्रमांक लागतो. यूपी पोलिसांनी १०,७१३ चकमकी केल्या. एकट्या मेरठ पोलिसांनी ३,१५२ चकमकी केल्या, ज्यात ६३ आरोपींना प्राण गमवावे लागले आणि १,७०८ अटक करण्यात आली. योगी सरकारमध्ये गुन्हेगारांवर कारवाईचा आणखी एक आकडा समोर आला आहे. यूपी पोलिसांनी याला 'सेल्फ डिफेन्स ॲक्शन' म्हटले आहे. त्यानुसार या कारवाईत गेल्या ६ वर्षात १८१ गुन्हेगार मारले गेले आहेत. ही आकडेवारी २० मार्च २०१७ ते १२ एप्रिल २०२३ पर्यंतची आहे. हे आकडे पाहून असे वाटू शकते की एन्काउंटर ही गुन्हेगारांवर त्वरीत कारवाई करण्याची प्रभावी पद्धत आहे. पण देशातील इतर राज्यांप्रमाणे यूपीमधूनही अशी अनेक प्रकरणे समोर आली, जेव्हा पोलिसांवर पैसे, पदोन्नती किंवा पदकांसाठी एन्काउंटर केल्याचा आरोप झाला. इंडिया टुडे ऑगस्ट २०१८ मध्येचकमकीसाठी यूपी रोखप्रकरणाचा भंडाफोड झाला. त्यानंतर यूपी पोलिसांनी तेथील लोकांवर कारवाई केली. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात जेव्हा मुंबई पोलिसांनी अंडरवर्ल्डशी संबंधित लोकांचा मोठ्या प्रमाणावर सामना करायला सुरुवात केली, तेव्हाही कधी प्रतिस्पर्धी टोळ्यांकडून तर कधी नेत्यांच्या इशाऱ्यावर मारल्या गेल्याचे आरोप झाले. अशा प्रकरणांसाठी एक शब्द वापरला जातो - अतिरिक्त न्यायिक हत्या. माने पोलिसांनी कायद्याच्या पलीकडे जाऊन खून केला. वेगवेगळ्या प्रसंगी सर्वोच्च न्यायालयानेही पोलीस चकमकींना चुकीचे ठरवले आहे. २०२१ साली प्रकाश कदम विरुद्ध राम प्रसाद विश्वनाथ गुप्ता या खटल्यात न्यायालयाने भाष्य केले होते. पोलिसांनी केलेली खोटी चकमक ही थंड रक्ताची हत्या आहे, असे न्यायालयाने म्हटले होते. आणि असे करणाऱ्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने २०१४ मध्ये पोलीस चकमकीत मृत्यूबाबत अनेक प्रतिक्रिया दिल्यानंतर मार्गदर्शक तत्त्वे जारी केली होती. खरं तर, १९९९ साली 'पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज' ( PUCL ) या सामाजिक संस्थेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेत मुंबई पोलिसांनी १९९५ ते १९९७ दरम्यान केलेल्या ९९ चकमकींवर प्रश्न उपस्थित केले होते. या कथित चकमकीत १३५ जणांचा मृत्यू झाला. प्रदीर्घ सुनावणीनंतर २०१४ साली आदेश आला. न्यायमूर्ती आरएम लोढा आणि न्यायमूर्ती रोहिंटन नरिमन यांनी १६ कलमी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. पोलीस चकमकीत मृत्यू झाल्यास एफआयआर नोंदवावा, असे न्यायालयाने म्हटले आहे. याशिवाय अनेक सूचनाही दिल्या.

पोलिसांना कोणत्याही प्रकारच्या गुन्हेगारी कृतीची माहिती मिळाल्यास ती लेखी ( केस डायरीच्या स्वरूपात ) किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमातून नोंदवावी लागेल. चकमकीत कोणाचा जीव गेला तर गुन्हा दाखल करावा. कलम १५७ अन्वये गुन्हा दाखल करावा. याची माहिती तातडीने न्यायालयाला देण्यात यावी. संपूर्ण घटनेचा स्वतंत्र तपास सीआयडी किंवा अन्य पोलीस ठाण्याच्या पथकाकडून होणे आवश्यक आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडून त्यावर देखरेख ठेवली जाईल. हा पोलीस अधिकारी चकमकीत सहभागी असलेल्या सर्वात वरिष्ठ अधिकाऱ्यापेक्षा एक रँक वरचा असावा. कलम १७६ अन्वये पोलिस गोळीबारात झालेल्या प्रत्येक मृत्यूची दंडाधिकारी चौकशी व्हायला हवी. याचा अहवाल CrPC च्या कलम १९० अंतर्गत अधिकृत असलेल्या न्यायदंडाधिकारी यांना पाठवणे आवश्यक आहे.




घटना कोणत्याही विलंबाशिवाय, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग ( NHRC ) किंवा राज्य मानवाधिकार आयोग ( SHRC ) यांना कळवावी. जखमी गुन्हेगार/पीडितांना वैद्यकीय मदत देण्यात यावी. दंडाधिकारी किंवा वैद्यकीय अधिकाऱ्यासमोर त्याचे बयाण नोंदवावे. एफआयआर आणि पोलिस डायरी न्यायालयाला विलंब न लावता उपलब्ध करून दिली जाईल याची खात्री करावी.

तपासानंतर, CrPC च्या कलम १७३अंतर्गत अहवाल न्यायालयात पाठवला जावा. तपास अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या आरोपपत्रानुसार या प्रकरणाचा लवकर निपटारा करण्यात यावा. मृत्यू झाल्यास, कथित गुन्हेगार/पीडित यांच्या पुढील नातेवाईकांना शक्य तितक्या लवकर माहिती दिली जावी.

पोलिसांच्या गोळीबारात मृत्यू झाल्यास, सर्व प्रकरणांचा सहामाही तपशील पोलिस महासंचालकांनी ( DGP ) NHRC कडे पाठवला पाहिजे. तपासात पोलिसांची चूक आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करावी किंवा तपास पूर्ण होईपर्यंत त्याला निलंबित करावे. पोलीस चकमकीत मारल्या गेलेल्या व्यक्तीच्या आश्रितांना भरपाई देण्यासाठी IPC चे कलम ३५३-A लागू केले जावे.

घटनेच्या कलम २० अन्वये, संबंधित अधिकाऱ्याला त्याची शस्त्रे तपासासाठी तपास यंत्रणेकडे सोपवावी लागतील. पोलीस अधिकाऱ्याच्या कुटुंबियांना माहिती देण्यात यावी. आरोपी अधिकाऱ्याला वकिलाची सोय करावी. घटना घडल्यानंतर लगेच संबंधित अधिकाऱ्यांना आउट ऑफ टर्न प्रमोशन किंवा कोणताही शौर्य पुरस्कार देऊ नये. कोणत्याही परिस्थितीत, संबंधित अधिकाऱ्यांच्या शौर्याबद्दल शंका नसतानाच हा पुरस्कार दिला जातो किंवा शिफारस केली जाते याची खात्री केली पाहिजे. जर पीडितेच्या कुटुंबाला असे वाटत असेल की या प्रक्रियेचे पालन केले गेले नाही किंवा स्वतंत्र तपासात गैरप्रकार झाल्याची भीती असेल तर ते सत्र न्यायाधीशांकडे तक्रार करू शकतात. तक्रार आल्यानंतर सत्र न्यायाधीश त्याची चौकशी करतील. NHRC ची मार्गदर्शक तत्त्वे काय आहेत ?

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानेही वेळोवेळी पोलीस चकमकींवर कठोर भाष्य केले आहे. मार्च १९९७ मध्ये एनएचआरसीचे तत्कालीन अध्यक्ष न्यायमूर्ती एमएन व्यंकटचलिया यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले होते. यामध्ये अनेक राज्यांमधून बनावट चकमकींच्या तक्रारी येत असल्याचे सांगण्यात आले. न्यायमूर्ती व्यंकटचलिया यांनी लिहिले की, जर पोलिस कर्मचाऱ्याच्या गोळीने एखाद्याचा मृत्यू झाला असेल, तर त्या पोलिस कर्मचाऱ्यावर हत्येचा गुन्हा न मानता दोषी मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. कारण पोलिसांना कोणत्याही व्यक्तीचा जीव घेण्याचा अधिकार नाही. NHRC ने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना काही मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. चकमकीत मृत्यू झाल्याची माहिती मिळताच पोलीस ठाण्याच्या प्रभारींनी तातडीने माहिती नोंदवावी.आरोपीच्या मृत्यूची वस्तुस्थिती आणि परिस्थिती तपासण्यासाठी त्वरित पावले उचलली जावीत.या चकमकीमध्ये पोलीस स्वतः सहभागी असल्याने अशा प्रकरणांचा तपास राज्य CID सारख्या स्वतंत्र एजन्सीमार्फत केला पाहिजे.या प्रकरणांचा तपास चार महिन्यांत पूर्ण करावा. तपासात एखाद्याविरुद्ध खटला निघाला तर त्यावर जलद सुनावणी झाली पाहिजे.कोणत्याही प्रकरणात कोणी दोषी आढळल्यास, मृत व्यक्तीच्या कुटुंबाला नुकसान भरपाई द्यावी.

पोलिस कर्मचाऱ्याच्या गोळीने एखाद्याचा मृत्यू झाल्यास, पोलिस कर्मचाऱ्यावर आयपीसीच्या संबंधित कलमांतर्गत गुन्हा दाखल केला पाहिजे. पोलीस कारवाईत मृत्यू झालेल्या सर्व प्रकरणांची दंडाधिकारी चौकशी झाली पाहिजे. ही चौकशी तीन महिन्यांत पूर्ण करावी. पोलीस कारवाईतील सर्व मृत्यूंची माहिती NHRC ला देण्यात यावी. एसपी किंवा एसएसपी स्तरावरील अधिकारी घटनेच्या ४८ तासांच्या आत आयोगाला माहिती देतात. घटनेचा अहवाल दिल्यानंतर तीन महिन्यांच्या आत दुसरा अहवाल सादर करावा लागेल. त्यात शवविच्छेदन अहवाल, दंडाधिकारी चौकशी आणि पोलिस अधिकाऱ्यांचा तपास अहवाल असावा. मे २०१०मध्येही एनएचआरसीचे तत्कालीन अध्यक्ष न्यायमूर्ती जीपी माथूर म्हणाले होते की, पोलिसांना कोणालाही मारण्याचा अधिकार नाही.

चकमकीच्या बहुतांश घटनांमध्ये पोलिस 'प्रतिशोधात्मक गोळीबार' असा शब्दप्रयोग करतात. CrPC च्या कलम ४६ मध्ये असे नमूद केले आहे की जर एखाद्या गुन्हेगाराने अटक टाळण्याचा प्रयत्न केला किंवा पोलिस कोठडीतून पळून जाण्याचा प्रयत्न केला किंवा पोलिसांवर हल्ला केला, तर पोलिस त्या अपराध्याविरुद्ध बदला घेऊ शकतात. पण खुनी हल्ला झाल्याशिवाय पोलिस गोळीबार करू शकत नाहीत.

# बाळासाहेब...

आधुनिक केसरी

**२३ मार्च २०२३ हा दिवस बाळासाहेब देसाई यांचा ४० वा स्मृतिदिन. बाळासाहेब गेले त्याला बघता-बघता ४० वर्षे झाली. काळ कोणाकरिता थांबत नाही. पण महाराष्ट्राच्या बांधणीमध्ये गेल्या ५०-६० वर्षांत जी मोठी माणसं होती... ज्यांनी महाराष्ट्राच्या बांधणीमध्ये खूप काही दिले.... त्यात बाळासाहेब हे नाव मोठे होते. यशवंतराव चव्हाण यांच्यापासून याची सुरुवात झाली. त्यामध्ये वसंतराव नाईक, बाळासाहेब देसाई, शंकरराव चव्हाण, राजारामबापू, यशवंतराव मोहिते, विदर्भातील बॅ. वानखेडे, मधुकरराव चौधरी, प्रतिभाताई पाटील सगळी टीम अशी काही भारी होती.... भारदेसाहेब... पागेसाहेब... जयंतराव टिळकसाहेब... गवईसाहेब... असे अनेक वर्ष प्रभावी काम केलेले अध्यक्ष आणि सभापतीही आता होणे नाही. असे मंत्रिमंडळ पुन्हा होणे नाही... तसे निर्णय पुन्हा होणे नाही.... तशी बांधणी आता होणार नाही... याचा अर्थ विकास थांबेल असे नाही... विकास कदाचित अधिक झपाट्याने होईल... मुंबई- पुण्याप्रमाणे गावागावात विमानसुद्धा येईल... पण, राजकारणातले 'इमान' राहिलेले नाही. हाच मोठा फरक झाला आहे.**

बाळासाहेबांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने मरळी येथे त्यांच्या गावी जात आहे. बाळासाहेबांचे नातू शंभुराज यांनी अगत्याने आमंत्रित केले आहे. गेल्या ५०-६० वर्षांचा सगळा काळ अशावेळी डोळ्यांसमोरून जातो. देशामध्ये महाराष्ट्राचे मोठेपण का मानले गेले, त्या प्रश्नांच्या उत्तराचे, ही सगळी मोठी माणसं प्रतिनिधी आहेत. त्यांच्यात वाद झाले नाहीत, असे नाही. मतभेद हे जिवंतपणाचे लक्षण आहे... पण, त्या वादाला कुठे थांबवायचे... हे या नेत्यांना माहिती होते.... यशवंतराव आणि वसंतदादादा यांचेही वाद झाले.... दादांचे आणि राजारामबापू यांचेही वाद झाले.... वसंतराव नाईक आणि बाळासाहेब देसाई यांच्यातही थोडेसे अंतर आले होते. पण हे वाद महाराष्ट्राच्या बांधणीच्या आड कधीच आले नाहीत. शिवाय ही माणसं एवढी मोठी होती की, यांच्या वादाची चर्चा आपल्यासारख्या छोट्या माणसांनी करणे हे चुकीचे आहे. आकाशातील ताऱ्यांचीही भांडणे आहेत, असे मी समजतो. त्यांनी उभे केलेले काम महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राची अशी बांधणी पुन्हा होणार नाही. अगदी मुंबई राज्यापासून एक- एक निर्णय बघितला तर... या मंडळींचे मोठेपण आता तर प्रकर्षाने जाणवते... कारण शरद पवारसाहेब सोडले तर त्यांच्या तोडीचा जवळपास तसा एकही नेता आज नाही. निर्णय घेण्याची ती क्षमताही नाही... बांधणी हा विषय दूरच राहिला. बाळासाहेबांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने आज हे सगळे आठवत आहे. मी गेली ६३ वर्षे राज्यशास्त्राचाच विद्यार्थी आहे. विधानमंडळाचे ग्रंथालय हेच माझे महाविद्यालय आहे... या ग्रंथालयात खूप काही शिकायला मिळते... वाचायला मिळते... १९३५ च्या कायद्याच्या आधारे ब्रिटीश सरकारने १७५ सदस्यांची विधानसभा स्थापन केली. आणि विधानसभेची पहिली निवडणूक झाली. पहिल्या निवडणुकीत काँग्रेसने ८८ जागा जिंकल्या. मुंबई प्रांताचे पहिले मंत्रिमंडळ १९ जुलै १९३७ ला स्थापन झाले. बाळासाहेब खेर हे पहिले मुख्यमंत्री. या पहिल्या विधानसभेचे चित्रिकरण व्ही शांताराम बापूंच्या प्रभात फिल्म कंपनीने केले. आणि त्यानंतर 'काँग्रेस पार्टी का अधिकार स्वीकार' या नावाचा चित्रपट पुण्यात दाखवला गेला. १९५२ साली लोकसभेचे पहिले अध्यक्ष दादासाहेब मावळणकर होते. मुंबई राज्याच्या पहिल्या विधानसभेचे अध्यक्षही दादासाहेबच होते आणि ते बिनविरोध निवडले गेले होते. विधानसभेच्या पहिल्या दिवशी कामकाजाची सुरुवात देश परतंत्र असताना 'वंदेमातरम' या गीताने झाली. तोच दाखला देवून ३० वर्षांपूर्वी आमदार राम नाईक यांनी विधानसभा अधिवेशनात पहिल्या दिवशी 'वंदेमातरम' आणि शेवटच्या दिवशी 'राष्ट्रगीत' हा प्रस्ताव आणला होता आणि तो मंजूरही झाला. आजची आपली जी घटना आहे ती घटना समिती स्थापन करण्याचा पहिला ठराव मुंबई राज्य विधानसभेने केला होता. त्यावेळच्या मंत्र्यांचा पगार महिन्याला ५०० रुपये इतका होता. त्यांना सरकारी बंगला नव्हता. घरभाडे १०० रुपये होते. विधानसभा आमदारांना विविध समित्यांच्या बैठकीचा भत्ता तीन रुपये होता.

महाराष्ट्राची बांधणी ज्याला म्हणता येईल, असा पहिला पुरोगामी कायदा.... म्हणजे द्विभार्या प्रतिबंधक कायदा.... याच मुंबई विधानसभेत मंजूर झाला. लिलावती मुन्शी यांनीच तो प्रस्ताव मांडला होता. औद्योगिक संबंध कायदा ( Industrial Relations Act ) याच विधानसभेत मंजूर झाला. कॉम्रेड डांगे यांचे सात तासांचे भाषण याच विधेयकावर झाले होते. 'हरिजनांना मंदिर प्रवेश मिळालाच पाहिजे' यासाठी साने गुरुजी यांनी पंढरपूरला बेमुदत उपोषण केले होते. तो कायदा याच विधानसभेने मंजूर केला. पुढे घटनेमध्ये बाबासाहेबांनी कायद्यानेच अस्पृश्यता नष्ट करून टाकली. पण, त्याचा पहिला कायदा मुंबई विधानसभेत मंजूर झाला होता.

शैक्षणिक क्रांतीत महाराष्ट्र खूप पुढे आहे. बाळासाहेब देसाई हे यशवंतराव चव्हाण यांच्या महाराष्ट्राच्या पहिल्या मंत्रिमंडळात शिक्षण मंत्री होते. त्याच बाळासाहेबांनी १२०० रुपये उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांचे शिक्षण मोफत केले होते. कोल्हापुरचे शिवाजी कृषी विद्यापीठ बाळासाहेब शिक्षण मंत्री असतानाच कॅबिनेटसमोर प्रस्ताव येवून हे विद्यापीठ मंजूर झाले होते. पण यालाही फार मोठी परंपरा आहे. या शैक्षणिक क्रांतीची सुरुवात मुंबई राज्यानेच केली. १९४८ साली पुणे विद्यापीठाची स्थापना करण्याचा कायदा मुंबई विधानसभेत मंजूर झाला. १९४९ साली नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई विधानसभेनेच प्रस्ताव मंजूर केला. माध्यमिक शालांत परीक्षा मंडळ स्थापना ही मुंबई राज्यानेच केली. त्यावेळी 'मॅट्रीक' ही ती परीक्षा होती. पुढे त्याचे एस. एस. सी. परीक्षा मंडळ झाले.

'कसेल त्याची जमीन' हा अत्यंत पुरोगामी कायदा याच विधानसभेने मंजूर केला. या कायद्यापूर्वी आणलेल्या विधेयकावर आमदार दत्ता देशमुख ( संगमनेर ) यांचे पाच तासांचे भाषण ३५० पानांचे आहे. खासगी गाड्यांचे राष्ट्रीयकरन करून एस. टी. महामंडळाची स्थापना याच विधानसभेने केली आणि १५ ऑगस्ट १९४८ ला पुणे- अहमदनगर ही एस. टी. धावली. त्याचे पहिले प्रवासी बाळासाहेब भारदे हे होते.

अशा या पुरोगामी कायद्यांची परंपरा असलेल्या महाराष्ट्राने, महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्त्वाखाली हीच परंपरा कायम राखली. बाळासाहेब त्याच परंपरेचे प्रतिनधी. आज देशामध्ये ७ कायदे असे आहेत जे महाराष्ट्र विधानसभेने प्रथम मंजूर केले. 'डोक्यावरून मैला वाहून न्यायला बंदी' करणारे हे पहिले राज्य. माणसांची घाण माणसांनी वाहून न्यायची नाही. हे ठामपणे सांगणारे यशवंतराव... त्यासाठी पर्यायी व्यवस्था करताना पहिल्या वर्षी ३८ कोटी रुपयांची तरतूद करणारे हे राज्य. त्यावेळचे हे ३८ कोटी.... एम. आय. डी. सी. ची स्थापना हा याच राज्याचा पहिला निर्णय. आज मुंबईपेक्षा अधिक रोजगार राज्याच्या औद्योगिक वसाहतीमध्ये आहेत. त्याचे श्रेय या पुरोगामी निर्णयालाच आहे. त्यानंतर वसंतराव नाईक यांच्या नेतृत्त्वाखाली रोजगार हमी कायदा, एकाधिकार कापूस खरेदी, भाड्याच्या घरांची निर्मिती एक नव्हे असे अनेक लोकहिताचे कायदे करणारा महाराष्ट्र....



आज हाच महाराष्ट्र असा डोळ्यांसमोर येतो... यशवंतराव, वसंतराव नाईक, बाळासाहेब सगळे असे डोळयासमोर येत आहेत... या सगळ्या मंडळींमध्ये काही अपवाद सोडले तर यशवंतराव, दादा, बाळासाहेब सगळ्यांचे लहानपण कठीण परिस्थितीत गेले... दारिद्र्यात गेले... पण, कोणाच्या मातेने, कोणाच्या मावशीने, कोणाच्या काका-मामाने संस्कार करून या नेत्यांना घडवले. आज या नेत्यांची नाव सगळ्यांना माहिती आहेत... पण त्यांना घडवणाऱ्या त्या माऊली आणि ते काका-मामा काळाच्या विस्मृतीत गेले आहेत... मग त्या यशवंतरावांच्या विठामाई असतील... दादांची मावशी असेल... बाळासाहेबांचे मामा असतील... किती कष्टात या माणसांनी दिवस काढलेत.... बाळासाहेब दहा वर्षांचे असताना कोल्हापुरात आले... शाहू महाराजांच्या बोर्डींगमध्ये प्रवेश मिळाला. सकाळी एका दवाखान्याची साफसफाई करून महिना दहा रुपये मिळवले... त्यातून बी.ए.एल.एल.बी शिक्षण पूर्ण केले. १९४१ साली ते सातारा लोकल बोर्डाचे अध्यक्ष झाले आणि रयत शिक्षण संस्थेला पाच हजार रुपयांचे अनुदान जाहीर करून टाकले. ब्रिटीश सरकारने त्याची चौकशी केली. पण, कर्मवीर भाऊराव आण्णांचे काम इतके उच्च दर्जाचे होते की, अशी संस्था मोठी झाली पाहिजे, या निर्णयावरच सरकार आले. खरोखरच या महाराष्ट्राची काय कमाल आहे.... कर्मवीर अण्णांसारखा माणूस कोणत्याही पदावर नाही... पण, ग्रामीण भागातील मुले शिकली पाहिजेत, यासाठी रुपया-दोन रुपये वर्गणी जमा करून या महान शिक्षणशास्त्रींनी 'रयत' उभी केली. आज या संस्थेत सहा लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. १५०० प्राध्यापक आहेत... त्या संस्थेला पहिले त्या काळातील पाच हजारांचे अनुदान बाळासाहेब देसाई यांनी दिले. आज त्याच संस्थेला रामशेठ ठाकूर यांच्यासारखे पाच-पाच, दहा-दहा कोटी रुपये देणगी देवून संस्था प्रचंड मोठी झाली आहे. कर्मवीर आण्णांना स्वर्गात केवढे समाधान असेल... यशवंतराव चव्हाण जेव्हा रयत शिक्षण संस्थेचे आण्णांच्या नंतर अध्यक्ष झाले तेव्हा ते म्हणाले होते की.... 'मी, मुख्यमंत्री झालो त्या दिवशी मला जेवढा आनंद झाला नाही.... त्याच्यापेक्षा जास्त आनंद रयतचा अध्यक्ष झाल्यावर झाला आहे...' बाळासाहेबांनी १९४१ साली सातारा जिल्ह्यात ३०० शाळा सुरू केल्या. पण, जेव्हा ते शिक्षण मंत्री झाले, हातात अधिकार आला आणि शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेचा विषय आला तेव्हा बाळासाहेब म्हणाले की, 'हे विद्यापीठ शाहूमहाराजांच्या नगरीतच झाले पाहिजे' आणि तसे ते झालेही. या सगळ्या माणसांचे मोठेपण म्हणजे एकेकाच्या कतृत्त्वासाठी स्वतंत्र प्रबंधाचे विषय आहेत. १९६० ते १९८० या काळात या महाराष्ट्रात ३१ मोठी धरणे उभी राहिली. ७०० मध्यम धरणे उभी राहिली. १५००० मॅगावॅट औष्णिक वीजनिर्मिती झाली. चार कृषी विद्यापीठे झाली. अन्यधान्याच्या बाबतीत महाराष्ट्र स्वयंपूर्ण झाला. ते दिवस आठवा..... जेव्हा रेशनसाठी रांगा लावाव्या लागत होत्या. अन्न-धान्याच्या निर्मितीत महाराष्ट्र आघाडीवर आहे... एका दिवसात हे घडलेले नाही. शैक्षणिक क्रांती.... तंत्रशिक्षण क्रांती... शेतीमधील क्रांती... या सगळ्यांसाठी योग्य निर्णय करणारे नेते आणि कष्ट करणारी जनता... शासन आणि प्रशासन हातात हात घालून किती प्रभावीपणे काम करू शकते... असा हा अतिशय प्रभावी कालखंड होता. लोकशाहीच्या सगळ्या चांगल्या परंपरा याची सुरुवातही महाराष्ट्रानेच केली. 'विरोधी पक्षनेत्याला कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा' याची सुरुवात महाराष्ट्रानेच केली. त्यावेळचा विरोधी पक्ष आणि सत्ताधारी, महाराष्ट्राच्या बांधणीसाठी हातात हात घालून काम करत होते.

रोजगार हमीसाठी कर लावायला पहिला प्रस्ताव विरोधी पक्षानेच आणला होता. ते वातावरण आता पुन्हा कधीच पहायला मिळणार नाही. बाळासाहेब विधानसभेत सांगायचे.... 'लोकशाहीमध्ये चांगला विरोधी पक्ष असणे आमची ही जबाबदारी आहे... विरोधी पक्षनेत्याला पहिल्यांदाच एस. टी. महामंडळाचा संचालक बाळासाहेबांनीच केले. बाळासाहेबांनी केलेल्या कामाची यादी फार मोठी आहे. कोयना धरणाचा पहिला निर्णय मुंबई राज्यात झाला. यशवंतराव मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी त्याला गती दिली आणि बाळासाहेबांकडे बांधकाम खाते आल्यावर अवघ्या चार वर्षांत हे धरण पूर्ण झाले. मुंबई-गोवा हा रस्ता बांधकाम खात्यामार्फत काँक्रीटचा करण्याचे काम बाळासाहेबांनीच केले. गृहखात्यामधील अनेक निर्णय पोलिसांच्या हितासाठी झाले. वरळीच्या पोलीस वसाहती हा बाळासाहेबांचाच निर्णय.... सलग ४० वर्षे ते आमदार होते. त्यावेळचे नेते यांचे पाय जमिनीवर होते. यशवंतराव चव्हाण निवडणुकीत कधीही पराभूत झाले नाहीत. १९५२, १९५७, १९६२ विधानसभा नंतर नाशिकहून बिनविरोध लोकसभा नंतरच्या लोकसभेच्या तीन टर्म कराडमधून १९८० पर्यंत... वसंतदादा १९५२ साली आमदार झाले.. पण मंत्री झाले ते १९७२ साली. विधानसभा असो... लोकसभा असो... दादा कधीही पराभूत झाले नाहीत. बाळासाहेब त्याच्याही पुढे... सलग सहावेळा विधानसभेत आमदार... आणि एकाच मतदारसंघातून म्हणजे पाटण. १९६७ साली बिनविरोध निवडून आलेले एकमेव आमदार. दरारा असलेलेही एकमेव मंत्री... पण, मनाने अतिशय हळवे आणि प्रेमळ.

मधुकर भावे

या सर्व नेत्यांसोबत वावरता आले... त्यांना भेटता येत होते... बोलता येत होते... त्यांच्यासोबत प्रवास करायला मिळत होता... खूप काही शिकायला मिळत होते... साहित्य.... पत्रकारिता... कला... नाटक... चित्रपट.... सगळ्या क्षेत्रातील ही मोठी माणसं हे महाराष्ट्राचे वैभव आहे. बाळासाहेबांच्या पुण्यतिथीच्या निमत्ताने एखाद्या चित्रपटासारखे अनेक प्रसंग डोळ्योसमोरून जात आहेत... संग्रहातील एक फोटो पाहिला... माणसं मनाने किती मोठी होती.... त्याचे उदाहरण सांगून थांबतो... बाळासाहेबांनी जेव्हा सातारा लोकल बोर्डातर्फे रयत शिक्षण संस्थेला ५००० रुपयांचे अनुदान जाहीर केले त्यावेळी कर्मवीर आण्णा बाळासाहेबांना लोकल बोर्डाच्या कार्यालयात भेटायला गेले. आण्णांनी सोबत हार नेला होता... बाळासाहेबांना ते हार घालू लागले... बाळासाहेबांनी हार घालू दिला नाही... हातातच ठेवला... म्हणाले, 'आण्णा, आम्ही सत्तेवर आहोत.... आमचे कर्तव्य आम्हाला केलेच पाहिजे... सत्तेवर नसताना तुम्ही जी वणवण करून शिक्षणाचे काम करीत आहात.... खरे तर मीच तुम्हाला हार घातला पाहिजे..' महाराष्ट्रातल्या त्या पिढीतील सगळी माणसं अशी मनानं मोठी होती... अनेकजण या नेत्यांचे वाद सांगतात... पण, यांचे मोठे मन कोणी सांगत नाही. यशवंतरावांनी दादांशी झालेला वाद मिटवून सांगलीच्या जाहीर सभेत दादांचे मोठेपण खुल्या मनाने सांगितले. राजारामबापू आणि दादांचा वाद झाला... पण, बापूंच्या ॲसिटोन प्रकल्पाचे उद्घाटन करायला दादा आले आणि म्हणाले की, 'भांडण विसरा... विकास कामात दादा-बापू एक आहेत...' बाळासाहेब देसाईंच्या एकसष्ठी समारंभाचा सत्कार करायला त्यावेळचे केंद्रीय गृहमंत्री यशवंतराव चव्हाण स्वतः आले. ही तर एकाच पक्षातील मंडळी. पण, शे. का. पक्षाचे नेते उद्धवराव पाटील... यांचा औरंगाबादचा सत्कार करताना यशवंतरावांनीच पुढाकार घेतला. एस. एम. जोशी यांचा सत्कारही यशवंतरावांच्या हस्ते झाला. महाराष्ट्राचे मोठेपण केवळ विकासाची मोठी कामं उभी करण्यातच नाहीत... तर, परस्पर आदर आणि मोठ्या मनाने सर्वांना वागवण्यामध्ये आहे. म्हणून तर या राज्याचे नाव.... महा... राष्ट्र.... आहे. या नावातच सगळी शक्ती आहे.



# निसर्गप्रतिमांमधून व्यक्त होणाऱ्या आशयघन कविता

अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**कविता म्हणजे काय ? याची साधी - सरळ व्याख्या म्हणजे 'कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त आशय व्यक्त करणारी रचना.' भारतीय मीमांसकांपासून ते पाश्चिमात्य भाषाभ्यासकांपर्यंत अनेकांनी काव्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. पण कवितेची ठोस अशी व्याख्या आपण ठरवणं शक्य नाही. कविता ही नितळ, प्रवाही असते नदीच्या प्रवाहासारखी. नदी ज्याप्रमाणे इतर प्रवाहांना स्वतःमध्ये सामावून घेते, तसेच कविता ही संवेदनशील मनातील शब्द सहज स्विकारते. तिला कोणत्याही साच्यात बंदिस्त करता येत नाही. ती मुक्तरंग आहे.**

ज्येष्ठ समीक्षक म. सु. पाटील म्हणतात, 'तिचा वेध घेण्यासाठी कवी स्वतःमध्ये जितका खोलवर बुडी घेतो, तितका तो कमी वैयक्तिक बनत जातो. तो मानवाच्या मूलभूत स्वभावापर्यंत पोचतो. अशा वेळी सर्वांना समान अशा मानवभावांची नाना रूपे आकलण्यात व ती अभिव्यक्त करण्यात तो गढून गेलेला असतो. तेथे कवीचे भाव वैयक्तिक राहत नाहीत. आविष्कार प्रक्रियेतच ते स्व-पर-तटस्थसंबंधांच्या पलीकडे जातात, म्हणून ते कोणाचेही होतात. त्यांना विश्वात्मता प्राप्त होते. ' ती कविता मनाच्या गाभाऱ्यापर्यंत पोहचण्यासाठी महत्त्वाचा दुवा आहे भाषा. अनुवाद या प्रक्रियेमुळे इतर भाषेतील साहित्याचा आस्वाद घेणे शक्य झाले आहे. असाच एक काव्यसंग्रह रसिक वाचकांच्या भेटीस आला आहे. साहित्य अकादेमी पुरस्कार प्राप्त कोंकणी कवितासंग्रह 'चित्रलिपी' याचे मूळ कवी परेश कामत आहेत. या मूळ कोंकणी कवितांचा मराठी अनुवाद संवेदनशील कवी, लेखक, निवेदक, संपादक, अनुवादक गीतेश शिंदे यांनी यथार्थपणे केला आहे. गीतेश शिंदे यांनी कोंकणीतील ज्येष्ठ कवी माधव बोरकर यांच्या साहित्य अकादेमी पुरस्कार प्राप्त 'यमन' कवितासंग्रहाचाही मराठी अनुवाद केला आहे. त्यामुळे 'चित्रलिपी' कवितासंग्रहाचा मराठी अनुवादही तितकाच समर्पक झाला आहे. 'चित्रलिपी' कवितासंग्रहातील कविता ह्या प्रवाही आहेत तसेच वास्तवतेचा स्विकार करणाऱ्या आहेत. विविध प्रतिमांच्या माध्यमातून मानवी मनाचा तळ अगदी स्पष्टपणे प्रतिबिंबित केला आहे. अनुवाद करणं म्हणजे मूळ कवितेतील शब्दांना ज्या भाषेत अनुवादित करायचे आहेत, त्या भाषेतील प्रतिशब्द योजणे एवढेच नसते तर ती कविता अनुवादित करताना मूळ कवीने व्यक्त केलेला भावार्थसुद्धा टिपता यायला हवा. मूळ आशयाला कुठेही धक्का न लावता मूळ कवीला अभिप्रेत असलेला भाव गीतेश शिंदे यांनी समर्पकपणे 'चित्रलिपी' मधून उलगडला आहे.

समुद्र, खडक, पाणी, झाडे, पक्षी , होड्या अशा प्रतिमांचा वापर करून मानवी जीवनाचे सूत्र, त्याच्या भावना टिपल्या आहेत. या कवितांमध्ये हिरवागार रंग आहे, पाण्याच्या प्रवाहात निर्माण होणारे जलतरंग आहेत, पक्षांची किलबिल आहे, आकाशात निर्माण होणाऱ्या पिवळ्या रंगाच्या किरणांचं दृश्य आहे, पानांची सळसळ आहे, एकंदरीत निसर्गाने निर्माण केलेल्या विविध रंगांची उधळण या कवितांमध्ये उतरली आहे. या कवितासंग्रहातील कविता वाचताना त्यातील शब्द डोळ्यांसमोर एक चित्र निर्माण करतात, ही चित्रे विविध रंगछटांमधून व्यक्त होत असतात. ही चित्रणात्मक रचना 'चित्रलिपी' होऊन वाचकांना गुंतवून ठेवते.

**'रात्रीच्या ह्या तुडुंब भरलेल्या काळोख्या पाण्यात**
**उगवलेली ही चंद्रकोर मला होडीसारखी**
**दिसते...'**

'होडी' कवितेतील ह्या ओळी पहा, रात्रीचं आकाश आणि त्यात उगवलेली चंद्रकोर ही कवीला पाणी आणि त्यात उभी असलेल्या होडीसमान भासते. काय कल्पना आहे ! ही दृष्टी कवीची आहे. यालाच कवित्वशक्ती म्हणतात. या कवितांमध्ये जसे प्रकाशाचे रंग आहेत, तसेच काळोख, अंधार, काळ्याकुट्ट या शब्दयोजनेतून मानवी मनात दाटलेली एकटेपणाची भावना व्यक्त झाली आहे. 'एकांत सुद्धा एका खडकाप्रमाणेच काळाकुट्ट' ( खड़क ), ' काळ्याकुट्ट तळाशी गोठलेलं पाणी वर चढेना ' ( काळोखी विहीर ) , ह्या कवितेतील ओळी मनाची एक अवस्था मांडतात.

**'काळोखात सुद्धा जिला दिसते तीच कविता पाहू शकते,**
**फुलवू शकते गर्भाशयात उजेडाचा गर्भ ....'**

'उजेडाचा गर्भ' कवितेतील ओळी किती आशयघन आहेत.




अंधकाराकडून प्रकाशाकडे नेणारा हा प्रवास आशादायी आहे. 'शब्द पोहत पोहत येतात कवितेत' या आणि अशा कवितेतील ओळी वाचकांना आकृष्ट करतात. तांबड़ा, सोनपिवळी, हिरवेगार, जांभूळपिकी अशा विविधांगी रंगांची सुयोग्य रचना यामुळे या कविता वाचताना मूळ कवितासंग्रह वाचण्याची इच्छा मनात नक्कीच निर्माण होते. या कवितासंग्रहातील प्रत्येक कविता एक वेगळा आशय मांडते. पाण्यात साखर जशी विरघळते , तशाच ह्या कविता संवेदनशील मनात सहज सामावून जातात. मानवी मनाचे व्यवहार, निर्मळ शब्दांनी विणलेले प्रितीचे बंध आणि निसर्गप्रतिमांनी स्व- अस्तित्वाची जाणीव करून देणारा हा कवितासंग्रह आहे. तसेच प्रत्येक वाचकाला आशयगर्भ आणि सकस तितकेच संवेदनशील काव्यानुभूती अनुभवल्याचा प्रत्यय येईल.

**( चित्रलिपी - कवितासंग्रह / मूळ कवी : परेश कामत / अनुवाद : गीतेश शिंदे / प्रकाशक : साहित्य अकादेमी / मूल्य : १९० रुपये )**

# चिंता वाढवणारा भस्मासुर थांबवा हो...!

## लोकसंख्यावाढ अभिमान नव्हेच; आधुनिक केसरी जनचर्चेत वाचकांच्या संतप्त प्रतिक्रिया

आधुनिक केसरी जनचर्चा

आधुनिक केसरी

**चीनला मागे टाकत भारताने लोकसंख्या वाढीत प्रथम क्रमांक मिळवला आहे. परंतु हा प्रथम क्रमांक येत्या काळात अनेक सामाजिक प्रश्न निर्माण करीत भयावह चिंता निर्माण करणारा आहे. हा विषय अभिमानाचा नव्हेच हा अनेकदा विचार करण्यास भाग पाडतो. याला आवर घालण्याचे ठोस उपाय करण्यात न आल्याने आज आपल्यावर ही वेळ आलेली आहे. याला कसलाही वेळ न घालवता वेळीच आवर घालणे सर्वांची सामाजिक जबाबदारी आहे. हा प्रश्न यानिमित्ताने अनेक गुंतागुंत निर्माण करणारा आहे. म्हणूनच चिंता वाढवणारा भस्मासुर थांबवा हो...! अशी हाक आधुनिक केसरी जनचर्चेत वाचकांनी मांडली.**

### देशहित जाणा; ठोस निर्णय घ्या...



प्रचंड वाढलेली महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, अनागोंदी, स्वैराचार या सर्वांची कारण मीमांसा शोधण्याचा प्रयत्न केला तर त्याचे मूळ लोकसंख्या वाढीत आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. भारताची वाढणारी लोकसंख्या ही समस्या स्वातंत्र्योत्तर काळात फार महत्त्वाची मानली गेली होती. शालेय जीवनात लोकसंख्या एक भस्मासूर असे निबंध लिहून घेतल्या पासून गावातील शासकीय इमारतीवर हम दो हमारे दो असे फलक असो किंवा शासकीय कर्मचाऱ्यांना नसबंदी केस करायला लावण्याचे उद्दिष्ट देणे असो, जागतिक लोकसंख्या नियंत्रण दिवस साजरा करणे ह्यामुळे त्या प्रश्नांचे गांभीर्य मनात घर करून असायचे.मात्र मागील दशकात ही समस्या अस्तित्वात आहे ह्यांचाच मुळी व्यवस्थेला विसर पडलेला दिसतो. लोकसंख्या वाढ, व्यसनाधीनता, अशा प्रश्नांकडे कोणाचेही लक्ष राहिले नाही. आज अचानक एका सर्व द्वारे आपण चीन पेक्षा पुढे गेल्याचे पाहताच त्यावर चर्चा परिचर्चा सुरू झाल्या. मात्र मागील जवळपास दहा पंधरा वर्षांपासून लोकसंख्या वाढ ही समस्या आहे या प्रश्नाचा कोणीही विचारच केलेला दिसून येत नाही म्हणूनच आज ही समस्या आक्राळ विक्राळ रूप घेऊन समोर आली आहे. न वाढणारी जमीन, शेत जमिनीचे कमी होत जाणारे प्रमाण, पर्यावरणाचा होणारा रास, त्यामुळे पाणी समस्या, अशा अनेक समस्यामुळे लोकसंख्येला पुरणारे अन्न सुद्धा निर्माण होणे दुरापास्त तो होत आहे अशा परिस्थितीत शासनाला पुन्हा काही कठीण निर्णय घेण्याची वेळ येणार आहे भावनिकता आणि हेवेदावे बाजूला ठेवून शासनाने ठोस निर्णय घेतले पाहिजे आणि त्यावर राजकारण न करता देश हितासाठी सर्वसामान्य जनतेपासून सर्वांनी त्या निर्णयाला सकारात्मक रीतीने घेतले पाहिजे. – **किरण डोंगरदिवे, मो. 7588565576**

### जागरूकता आणि प्रबोधन व्हावे...



लोकसंख्या वाढीचा भस्मासूर अनेक समस्येचे मूळ आहे. आज लोकसंख्या वाढीच्या दुष्परिणामामुळे अनेक गोष्टींचा तुटवडा जाणवतो आहे. बेरोजगारी, इंधन तुटवडा, जलसंकट, या साऱ्या लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेल्या समस्या आहेत. लोकसंख्या वाढीच्या दुष्परिणामांची जाणीव आणि देशावर होणारा एकंदर परिणाम याबद्दलची जागरूकता नागरिकांमध्ये होणे आवश्यक आहे. व छोटे कुटुंब सुखी कुटुंब याचे महत्त्व समजून घेणे महत्त्वाचे आहे. आधुनिक मेडिकल साधनाबद्दल जागरूकता, याबद्दल मोकळेपणाने संवाद , विविध भाषणांचे विषय, साहित्यिकांचे विषय, साहित्य संमेलनाचे विषय परिसंवादाचे विषय लोकसंख्या नियंत्रणाचे महत्त्व सांगणारे असणे काळाची गरज बनली आहे. तरच या सर्व समस्यांच्या मुळापर्यंत पोहोचता येईल. या छोट्या छोट्या गोष्टीतून प्रबोधनातून लोकसंख्या वाढीवर नियंत्रण शक्य होणार आहे.

**– प्रवीण संगमकर काळे**
**मो. 8698701955**

### एक कुटुंब एक मूल ही जबाबदारी लादावी...



1952 मध्ये कुटुंब नियोजनासाठी राष्ट्रीय कार्यक्रम सुरू करणारा भारत हा जगातील पहिला देश आहे. पण आज आपण लोकसंख्येत प्रथम क्रमांक मिळवत आहोत हे भूषणावह नाही. मग सदरील कार्यक्रमाचा कितपत प्रभावीपणे राबवला गेला त्याचे आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. धार्मिक समजुती व संतती नियमन याचा मोठा प्रभाव लोकसंख्येवर होतो .त्यामुळे समान नागरी कायदा अस्तित्वात असणे गरजेचे झाले आहे .लोकसंख्या नियंत्रण लवकरच झाले नाही तर खूप बिकट परिस्थिती निर्माण होईल. त्याचा विस्फोट अनेक गुंतागुंत निर्माण करणारा आहे. शैक्षणिक ,आरोग्य सुविधा धान्य तुटवडा याचा मोठा परिणाम नक्कीच होईल. या भस्मासुराला आवरत एक कुटुंब एक मूल ही ठोस जबाबदारी निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**– प्रमोद कुलकर्णी**
**मोबाईल– 7249205507**


### वर्ग विग्रह परवडणारा नाही...



चीनला मागे टाकत लोकसंख्येत भारताने प्रथम क्रमांक मिळविला हे आपल्यासाठी शरमेने मान खाली करणारा क्षण आहे. भारताने प्रगती करीत शेती, शिक्षण, पर्यावरण व तांत्रिक युगात प्रगती केली परंतु सामाजिक भान हरपून वाढत गेलेली लोकसंख्या वाढ देशाच्या अखंड अस्मितेला ठेच पोहचणारी ठरली आहे. सरकारी ठोस भूमिका नसल्यामुळेच हा प्रश्न अस्वस्थ करीत बहरत गेला हे वेगळे सांगण्याची गरज नाही. सक्ती होत नाही, निर्णय पंगुता, धोरणाची लवचिकता आणि या सगळ्यांचा परिणाम म्हणून वर्ग विग्रह वाढला आणि या समस्येने आक्राळ विक्राळ रूप धारण केले. म्हणून हा भस्मासुर अंगावर शहारे आणतोय, ठोस दीर्घकालीन नियोजनाची गरज क्रमप्राप्त आहे.

**–अमर चव्हाण, मो. 9960391846**

### जड झालेले लोकसंख्येचे ओझे पेलेल का ?



संयुक्त राष्ट्राच्या जागतिक लोकसंख्या अहवालानुसार जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेला देश भारत ठरला असून आजमितीस 142 कोटी 86 लाखांवर पोहोचला आहे.प्रजनन क्षमतेचा उत्कट बिंदू डोकं चक्रावून जातं. समूहाचे विस्थापन,आर्थिक अस्थिरता,बदलते वातावरण हे जरी लोकसंख्या वाढीचे अनुमान असले तरीही एकूण साधनसंपत्ती नुसार दरडोई गरजा आपण पुरवू शकू का? जागतिक तापमान वाढ,हवामान बदल, घटत चाललेली जल पातळी,प्रदूषण अशा एक ना अनेक कारणांमुळे जागतिक स्तरावर सातत्याने विचार होत असताना लोकसंख्या वाढीमुळे अनेक समस्या आ वासून उभ्या ठाकतील. प्रजनन क्षमता वाढीवर जर अंकुश ठेवता न आल्यास प्रक्षोभ झाल्याशिवाय राहणार नाही. लोकसंख्या वाढीमुळे सर्वदूर जल्लोष करण्यापेक्षा त्याच्यापेक्षा मी किती वरचढ आहे ही अहमहमिका न तपासता लोकसंख्येनुसार आपण किती कुशल आहोत, विज्ञाननिष्ठ राहून देशासाठी,या समाजासाठी काहीतरी देणे लागतो याचा सर्वंकष मूल्यमापन होणे गरजेचे आहे, नव्हे ती एक सामाजिक व सामूहिक जबाबदारी आहे असे मला वाटते. नाही तर... लोकसंख्येचे ओझं जड जाईल.

**– वसंत राठोड, मो. 9892401089**

# बाबासाहेबांनी फुकटात दिले हे सांगायचे घेतले जातात पैसे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारतामधून आंबेडकरवाद वगळून समाज व्यवस्था निर्माण करणे अशक्य आहे. समाजातील ज्वलंत प्रश्न व त्या प्रश्नांवरती उपाय हे फक्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर देऊ शकतात. माणसाच्या सर्वांगीण विकासासोबत विषमतेला, जातीयतेला, गाडून देशाला सक्षम व विज्ञानवादी बनवण्याचे काम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी केले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन जगातील डोक्यामध्ये मेंदू असलेला आणि मनामध्ये माणुसकी असलेल्या लोकांना देशांना नेहमीच सामाजिक, आर्थिक, राजकीय, व न्यायिक ऊर्जा देऊन, मार्गदर्शनाचे काम करेल. बाबासाहेब आंबेडकर वेगवेगळ्या विषयांमध्ये पारंगत तर होतेच परंतु त्यांची राजकीय व सामाजिक क्रांती जगाला विचार करायला लावणाऱ्या आहेत. आणि म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना भारतच नव्हे तर जगामध्ये जे जे देश विज्ञान व मेंदूचा वापर करतात, ते देश त्यांना वैचारिक गुरु मानतात. भारतामध्ये मात्र परिस्थिती उलटी आहे. जातीयतेचे, अस्पृश्यतेचे चटके सहन करून, शिक्षणाच्या जोरावरती अनेक पदव्या मिळवल्या. पदवी म्हणजे फक्त कागदाचा भार नसून व्यवस्था परिवर्तनाचा वार होत्या. शिक्षणाच्या जोरावर बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक क्रांत्या देशांमध्ये घडवून आणल्यात. विषमतास अज्ञान, पाखंड, जातीवाद, अस्पृश्यता इत्यादी गोष्टी सुधारून सर्व मानवाला एका लाईन मध्ये उभे केले. जातीयतेमध्ये मानवाचे सर्व हक्क, अधिकार, धार्मिक ग्रंथांनी काढून घेतले होते.**

ते धार्मिक ग्रंथ बाबासाहेबांनी जाळून देशाला समता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्य व हक्क , अधिकार बहाल करणारे संविधान देऊन, जगातील सर्वात मोठी राजकीय क्रांती घडवून आणली. बाबासाहेबांचे सुरुवातीचे जीवन कष्ट परिश्रम व गरिबीत गेले. एवढे असताना सुद्धा ज्यावेळेस डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांजवळ पैसा यायला सुरुवात झाली, तेव्हा त्यांनी त्या पैशाचा उपयोग स्वतःच्या भौतिक सुखासाठी न करता समाजाच्या हितासाठी, समाजाच्या उत्थानासाठी केला. जेथे जाती जाती मध्ये माणसाला माणसाचा विटाळ व्हायचा, तेथेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी एका ताटामध्ये जेवण्यासाठी भाग पाडले, ज्या ठिकाणी माणसाचे शिक्षण, नोकरी, हक्क- अधिकार हिरावून घेतले होते, परंतु माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी ते आवश्यक होते. माणसाला जगण्यासाठी व विकासासाठी जे काही आवश्यक आहे ते सर्व बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःच्या खर्चातून, स्वतःच्या मेहनतीतून, मिळवून दिले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला वाचता येत नव्हते तरीही वृत्तपत्र काढून समाजामध्ये ऊर्जा भरली. समाजातील लोकांना शिकता यावे व शिक्षणातून जीवन घडावे, म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःच्या खर्चतून शिक्षण संस्था निर्माण केली. व लाखो करोडो लोक शिकून आज मोठे झालेले आहेत. हे सर्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी फुकट दिले. कोणतीही अपेक्षा न ठेवता समाजाच्या कल्याणासाठी, बाबासाहेबांनी आयुष्य, पैसा व वेळ खर्च केला. हे सांगणारे व स्वतःला आंबेडकरवादी समजणारे, अनेक लेखक, कवी, गायक, वक्ते आज निर्माण झालेले आहेत. भीम जयंती कार्यक्रम असला, तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर बोलण्यासाठी, त्यांच्या विचारावर प्रबोधन करण्यासाठी, हजारोच नाही तर लाखो रुपयांची सुपारी घेतली जाते. जिथं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व फुकटात दिले तेच कार्य, तेच विचार, समाजामध्ये सांगण्यासाठी जेव्हा स्वतःला आंबेडकरवादी समजणारे लोक भल्या मोठ्या पैशाची मागणी करतात, तेव्हा त्या लोकांच्या विचाराची व बुद्धीची किव येते. फक्त दिलेले हक्क- अधिकार स्वाभिमान व सर्वसामान्य लोकांसाठी केलेले कार्य हे तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे काम जागृत व सुशिक्षित व्यक्तीचे आहे. जातीयतेची घाण डोक्यामध्ये असल्याने, महापुरुषांना जातीत बंद करण्याची प्रथा भारतामध्ये आहे. आणि म्हणून बाबासाहेबांना सुद्धा जातीमध्ये बंद करण्याचा प्रयत्न केला. परंतु बाबासाहेब ही जातीची संपत्ती नसून, ही देशाची संपत्ती आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे देशाला तारणारे आहेत. डॉक्टर बाबासाहेबांच्या विचार व कार्यातून, समाजाचे उत्थान कसे झाले, हे सांगणे सामाजिक जबाबदारी, सामाजिक इमानदारी, व जिवंत असल्याचे लक्षण आहे. परंतु स्वतःला आंबेडकरवादी समजणारे, स्वतःला अभ्यासक समजणारे, लोक हे सांगण्याचे लाखो रुपये घेतात, तेव्हा त्यांची बुद्धी विकसित झाली नाही, याची कीव येते. जिथे बाबासाहेबांनी समाजासाठी एक एक क्षण खर्च केला, त्यासाठी काही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचाराचा व नावाचा, चळवळीचा स्वार्थी लोकांनी, व्यापार करायला सुरुवात केली. बाबासाहेबांचे नाव घेऊन माणूस चांगला बोलतो, चांगला गातो, म्हणून समाजातील लोक हाच बाबासाहेबांचा वैचारिक वारस आहे चळवळ चालवतो, या अपेक्षेपोटी मागेल तेवढा पैसा देण्यासाठी तयार होतो. हे आंबेडकरवादी लोकांचे अज्ञान आहे. परंतु याच अज्ञानाचा फायदा घेऊन चळवळीच्या नावाखाली लोक करोडपती झालेत, चळवळ पोट भरण्याचा साधन नाही, हे स्टेजवरून सांगणारे लोक त्याच कार्यक्रमाचे लाख रुपये घेतात. ज्या ठिकाणी या लोकांना मागतील तेवढा पैसा मिळत नसल्याने त्या ठिकाणी हे लोक जाण्याचे सुद्धा टाळतात. याचाच अर्थ बाबासाहेबांच्या नावाचा व्यापार सुरू करून, जेथे फायदा होईल तेथेच हे लोक बोलतात. चळवळ सांगण्याचा निरागस प्रयत्न



करतात. परंतु स्वतःच्या अंगी मात्र चळवळ, विचार स्वाभिमान ह्या कोणत्याही गोष्टी नसतात. जिथे बाबासाहेबांनी सर्व स्वतःहून, फक्त मागास लोकांचा विचार केला, त्यांच्याकडून कोणतीही अपेक्षा केली नाही, आणि त्याच बाबासाहेबांचा नाव घेऊन त्याच बाबासाहेबांचे विचार सांगण्यासाठी हे लाखो रुपयांची मागणी करतात, त्याच ठिकाणी विचारधारेचा वाचाळवळीचा खून करून व्यापार जगवला जातो, हेच सिद्ध होते. फक्त पैसा घेऊन बाबासाहेब सांगणारे लोक, कधीही चळवळीचे व बाबासाहेबांच्या विचाराचे होऊ शकत नाहीत. चळवळीचा व बाबासाहेबांच्या विचाराचा माणूस कधीही स्वार्थी वृत्तीचा नसतो.तो अविरतपणे कोणत्याही प्रकारची अपेक्षा न करता, समाजामध्ये बाबासाहेबांचे विचार व कार्य वेगवेगळ्या माध्यमातून पेरण्याचा प्रयत्न करतो. त्याला ना पदाची अपेक्षा असते, ना पैशाची. तरीही तो बाबासाहेबांचे विचार रूजवण्याचे काम करत असतो.तोच खरा बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा व चळवळीचा कार्यकर्ता हीच सिद्ध होते. स्वतःला विद्वान व फार मोठे वक्ते, लेखक,गायक समजणारे लोक समाजाकडून हजारो लाखो रुपयांची खंडणी तर घेतातच, परंतु कार्यक्रमाच्या ठिकाणी हे स्वतःच आयोजकांना आम्हाला मानपत्र द्या, अशी मागणी करून स्वतःची पाठ स्वतः थोपटून घेऊन, धन्यता मानतात. पैसे घेताना स्वतःची पाठ थोपटताना व समाजाला लुटताना या लोकांना थोडाही काही वाटत नाही. उलट वर तोंड करून आम्हीच कसे आंबेडकरवादी आहोत, हे पटवून देण्यामध्ये मात्र ते व्यस्त असतात. 14 एप्रिल व आंबेडकरवादी कार्यक्रम संपला तर वर्षभर हे लोक कुठे गायब होतात ? कधीच कोणाला थांबुन बोलत नाहीत, नवीन तरुणांना लेखक,वक्ता,गायक बनण्यासाठी हे साध समर्थन करत नाहीत. कार्यक्रमाची सुपारी नसेल तर, किंवा यांचा आर्थिक फायदा कुठे नसेल तर, हे महाशय लोकांना वेळही देत नाहीत. फोनवरही बोलत नाहीत. एवढे हे व्यस्त असतात. परंतु पैशाचे बंडल दाखवला तर लाचार होऊन, वेळ काढून स्वतः फोन करून, कार्यक्रमाबद्दल विचारणा करतात. बाबासाहेबांनी स्वाभिमान समाजाला दिलेला आहे. परंतु वक्ते, गायक, थोडक्यात जे सुपारी बाज आंबेडकरवादी आहेत, या लोकांकडे बघितले तर स्वाभिमान आणि प्रामाणिकपणा थोडाही दिसून येत नाही. लिलावामध्ये जशी बोली लावल्या जाते त्या पद्धतीने हे कार्यक्रमाची बोली लावून आपली तारीख ठरवून घेत असतात. लोकांनी पैसा प्रसिद्धी व मानसन्मान देऊन हे वैचारिक व आर्थिक लाचार बनले आहेत. आणि म्हणूनच आंबेडकरवादी चळवळ ही मागे पडली व लाचार लोक चळवळीचे शिलेदार झालेत. पैसा घेताना बाबासाहेबांनी फुकट दिलं आणि आम्ही ते सांगण्याचे पैसे घेणाऱ्यांना सामाजिक समस्या मात्र थोडे दिसत नाहीत. एवढे हे आपल्या व्यापारामध्ये व्यस्त होऊन, चळवळीचाच लिलाव करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु लोकांनी सर्वबाजू समजून घेऊन, सुपारी बाज लोकांना वठणीवर आणण्याचे काम करावे. कारण या लोकांना मोठे करणारे आंबेडकरवादी लोकच आहेत,तर खाली ओढण्याची ताकद सुद्धा त्यांच्या तच आहे. म्हणून आंबेडकरवादी लोकांनी जागृत होणे आवश्यक आहे.

# जीवनातील प्रयत्न, प्रामाणिकपणा आणि कष्ट करिअरला मार्ग दाखवणारे ठरते : प्रा. दासू वैद्य


आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** युवकांनी कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे आहे, याची दिशा महाविद्यालयीन जीवनात ठरते. त्यासाठी मनातील निश्चित संकल्प इतरांना न सांगता उद्धिष्ट निश्चित करा. आपल्या अंगभूत कलागुण आणि इच्छाशक्तीच्या बळावर हळुवारपणे मार्गक्रमण करताना कधी अपयश आले, तर खचून जाऊ नका, असा मौलिक सल्ला प्रसिद्ध कवी प्रा. दासू वैद्य यांनी तरुणाईला शनीवारी दिला. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक राज्यस्तरीय सांस्कृतिक युवा महोत्सव 'स्पंदन-२०२३' (नाट्यकला) उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजित मुळे होते. कवी प्रा. दासू वैद्य यांनी पारंपरिक शैलीत भाषण करण्यापेक्षा थेट युवकांशी संवाद साधला. त्यांचा संघर्षमय प्रवास, सामाजिक उपक्रम, मराठी नाट्यसृष्टीतील अनुभव आणि प्रवासातील आठवणींमुळे त्यांचा संवाद उत्तरोत्तर रंगतदार झाला. मी मराठवाड्यातील असल्यामुळे खडतर प्रवासातून मी हे यश मिळवीले आहे. त्यामुळे डॉक्टरांनी यशाकडे मार्गक्रमण करताना हळुवार करा, म्हणजे धोका कमी असतो.

जीवनातील प्रयत्न, प्रामाणिकपणा आणि कष्ट करिअरला मार्ग दाखवणारे ठरते. आयुष्यात लहान-मोठा, गरीब-श्रीमंत असे काहीच नसते. आई आणि वृक्ष दोनच गोष्टी महत्त्वाच्या असतात. एक जन्म देते आणि दुसरे श्वास. या दोन्ही गोष्टींची उतराई कोणत्याही पद्धतीने शक्य नाही. असे प्रा. दासू वैद्य यांनी सांगितले. 'स्पंदन २०२३' महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या अधिपत्याखाली होत असून मा. कुलगुरू लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर यांच्या संकल्पनेतून होत आहे. या कार्यक्रमासाठी विद्यापीठाचे डॉ. मिलिंद निकुंभ (प्रति कुलगुरू, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक), डॉ. सुनील फुगारे ( उप-कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा समन्वयक, स्पंदन २०२३), डॉ. मनोजकुमार मोरे (संचालक, विदयार्थी कल्याण विभाग, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक) व डॉ. राहुल शिंदे (समन्वयक, स्पंदन २०२३, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक) यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक राज्यस्तरीय सांस्कृतिक युवा महोत्सव 'स्पंदन-२०२३' (नाट्यकला) छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, श्री. रणजीत मुळे, संस्थेचे सचिव



श्री. पद्माकर मुळे व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी तथा आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकांत देशमुख यांच्या नेतृत्वाखाली संपन्न होत आहे. स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. किशोर शिरसाट, सौ. स्मिता साबळे, प्रो. गजानन दांडगे, ॲड. पदमनाथ पाठक, ॲड. सुजाता पाठक, डॉ. योगिता तळेकर, श्री. दत्ता जाधव, डॉ. वैशाली बोधले, प्रो. नितीन गरुड, श्री. रवी कुलकर्णी, डॉ. अजय मगर, डॉ. रुपाली म्हस्के काम पाहत आहे. यावेळी आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकांत देशमुख, डॉ. अमित वांगीकर, प्राचार्य डॉ. संदीप कांबळे, कृषी महाविद्यालय संचालक डॉ. दत्तात्रय शेळके, अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, तंत्रनिकेतन महाविद्यालय प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, दंत महाविद्यालय अधिष्ठाता डॉ. लता काळे, आयुर्वेद महाविद्यालय शैक्षणिक प्रमुख डॉ. जयश्री देशमुख, मानव संसाधन अधिकारी श्री. अशोक आहेर, जनसंपर्क अधिकारी श्री. संजय अंबादास पाटील, विभागप्रमुख आणि महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, स्पर्धक, नाट्यरसिक आदी उपस्थित होते.



प्रसाद दत्त पाठक
संपर्क क्र.: 9819112805

# अस्वस्थ करणारा लेखसंग्रह

आधुनिक केसरी

**'व्यथा बळीराजाच्या आणि..... 'सारांश' पाठोपाठ आलेला श्री दिलीप देशपांडे यांचा दुसरा लेखसंग्रह . वृत्तपत्र लेखनात दिलीप देशपांडे हे नाव आता सर्वज्ञात झाले आहे . ऐरणीवरच्या विषयावर लिहिणे, खोलात शिरणे, नेमक्या प्रश्नाला हात घालणे ही त्यांची वैशिष्ट्ये या पुस्तकात ठळकपणे दिसून येतात .**

पुस्तकातील लेख दोन विभागात आहेत. पहिला भाग शीर्षकानुसार बळीराजाच्या व्यथा वेदनांचा आहे आणि दुसरा प्रासंगिक पण समयोचित विषय हाताळणारा. दुसऱ्या भागातले दहा लेख वेगवेगळ्या विषयांना स्पर्श करणारे आहेत. त्यात व्यक्तीविशेष , भाषा , गीतसंगीत , वाचन यांचा समावेश आहे. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करतांना या पंचाहत्तर वर्षात आपण, आपल्या देशाने काय आणि कसे कमावले , मिळवले , गमावले याचा लेखाजोखा मांडताना लेखकातला सुजाण जागरूक नागरिक आपल्या अपेक्षा मांडतो. अत्याचार , भ्रष्टाचार कमी होत नाही याची खंत व्यक्त करतो . प्राथमिक सोयी सुविधा यांना अजूनही पारखा असलेला खेड्या पाड्यातला माणूस त्यांना अस्वस्थ करतो. 'शोध अस्वस्थ कल्लोळाचा ' आणि ' दारिद्र्याची शोधयात्रा ' या पुस्तकांचा परिचय करून देतांना त्यांना त्यातल्या साहित्यिक मूल्यांपेक्षा मानवी जाणीवा जास्त महत्त्वाच्या वाटतात. वाचन, पुस्तके, ग्रंथप्रसार हे लेखकाच्या आवडीचे विषय आहेत. ग्रंथाली वाचक चळवळ त्यांनी जवळून पाहिली आहे, त्यात सक्रिय सहभाग घेतला आहे त्यामुळे वाचाल तर वाचाल हे केवळ टाळीचे वाक्य रहात नाही.

महाराष्ट्र राज्यातल्या ग्रंथप्रसार करणाऱ्या अनेक व्यक्ती, संस्था यांचा गौरवपूर्ण उल्लेख, त्यांच्या कार्याची डोळस दखल ते घेतात. डॉ अनिल अवचट यांचे कार्य जगावेगळे. लोकांना व्यसनमुक्त करण्यासाठी त्यांनी मुक्तांगण स्थापन केले. त्यांच्या निधनाचे दुःख लेखक मोजक्या शब्दात व्यक्त करतो . डॉक्टरांच्या कार्याचा चांगला परिचय करून देतो. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे अजोड कार्य, त्यांचे राष्ट्रप्रेम, भोगलेला खडतर असा कारावास, नंतर केलेले समाजसुधारणेचे प्रयत्न, काव्यनिर्मिती, भाषाशुद्धी, नवीन पर्यायी समर्पक शब्दांची देणगी याबद्दल लिहून देशपांडे यांनी स्वातंत्र्यवीरांना मानवंदना दिली आहे. आपण मराठी भाषेवर नितांत प्रेम करतो पण तिचा वापर मनःपूर्वक वाढवला पाहिजे असा आग्रह लेखक धरतो तो रास्तच आहे. 'संगीत रंगभूमीवरील तपस्वी ' असा पंडित रामदास कामत यांचा उल्लेख आणि त्यांचा परिचय हा लेखकाच्या रसिकतेची पावतीच आहे. स्वामी विवेकानंद हा तर आपल्या राष्ट्राचा मानबिंदू. धर्म म्हणजे देशप्रेम , धर्म म्हणजे सामर्थ्य, धर्म म्हणजे कर्तव्य, धर्म म्हणजे युवाशक्तीच्या सकारात्मक ऊर्जेचा राष्ट्राच्या प्रगतीसाठी आणि रक्षणासाठी केलेला सुयोग्य वापर. विवेकानंदांचे प्रेरणादायी विचार कसे उदात्त, मार्गदर्शक आहेत हे लेखकाने सांगितले आहेत. युवकांना विधायक कार्यात आणले पाहिजे यावर ते भर देतात. श्री शरद पोंक्षे हे आजचे आघाडीचे कलावंत आहेत . ते प्रखर विचाराचे वक्तेही आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकर हा त्यांच्या चिंतनाचा आणि सादरीकरणाचा विषय असतो. प्रस्तुत लेखात मात्र त्यांच्या ' मी नथुराम गोडसे ' या नाटकाच्या संघर्षमय वाटचालीची चर्चा केलेली आहे. सुरुवातीला नाटकाला विरोध झाला, नंतर बंदी आली. विषय राजकीय होता त्यामुळे राजकीय विरोध होणे सहाजिकच होते. प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतातच पण हिंसेचे समर्थन आणि उदात्तीकरण दोन्ही असमर्थनिय पण शेवटी आविष्कारस्वातंत्र्य आहेच. संग्रहाचा पहिला विभाग अर्थात बळीराजाच्या व्यथा हा खूपच अस्वस्थ करतो, अंतर्मुख करतो. संपूर्ण विश्व हे शेतकऱ्यांचे ऋणी आहे. पोटात जाणारा प्रत्येक घास हा शेतकऱ्यांच्या कष्टावर शिजलेला असतो पण... हा पणच त्याच्या व्यथांचे मूळ कारण आहे. शेतीच्या, शेतकऱ्यांच्या विविध समस्यांचे विश्लेषण, उहापोह करणारे चौदा लेख या भागात समाविष्ट आहेत. पेरणी ते आत्महत्या अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न श्री देशपांडे करतात. हा शोध काठावर उभे राहून घेतलेला नाही. लेखक स्वतः शेतकरी आणि बँक अधिकारी अशा दोन्ही भूमिकांमधून समस्यांचा धांडोळा घेतांना दिसतात. या पुस्तकातील सर्व लेख दैनिक आधुनिक केसरी छत्रपती संभाजीनगर यातून,व ईतर ही वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झालेले आहेत. लेखक स्वतः छत्तीस वर्षे जिल्हा सहकारी बँकेत कार्यरत होते, त्यातही दोन वर्षे क्षेत्रीय अधिकारी आणि जवळपास सोळा वर्षे विशेष वसुली अधिकारी होते. त्यामुळे शेती कर्जे आणि वसुली यावर ते अधिकारवाणीने लिहितात म्हणून औचित्यभंग होत असला तरी आमदार, मंत्री यांचा नामोल्लेख ते निर्भीडपणे करू शकतात. शेती शास्त्रशुद्ध करा किंवा पारंपरिक पद्धतीने तिचे यश हे पूर्णतया पावसावर अर्थात निसर्गावर अवलंबून असते .तरीही शेतकरी, शेतमजूर,वाहतूकदार, अडते, दलाल, मापारी, व्यापारी,शीतगृह चालक, वेअरहाऊस मालक,घाऊक व किरकोळ विक्रेते आणि ग्राहक या साखळीत ग्राहकाने मोजलेले पैसे आणि शेतकऱ्याला मिळालेले दाम यात आश्चर्यकारक अशी तफावत असते. साखळीतल्या प्रत्येकाला आपला वाटा जरूर मिळावा पण उत्पादन घेणाऱ्या, कष्ट करणाऱ्याच्या पदरात किती पडते याची खंत कुणालाच नाही हे दुर्दैवी आहे. तलाठी, तहसीलदार, जिल्हाधिकारी, महसूल आयुक्त, कृषी सचिव, मंत्री, मुख्यमंत्री, प्रधानमंत्री एवढी जवाबदार यंत्रणा देशाचा आर्थिक कणा असलेल्या शेतकऱ्याच्या विकासासाठी कटीबद्ध असतांना त्याला आत्महत्या करण्याची वेळ येते म्हणजे मुळातच खोट आहे हे नक्की. लेखकाने अत्यंत पोटतिडिकेने विचार मांडले आहेत. ते स्वतः शेतकरी असल्याने त्या विचारांना धार आहे. वर्तमानपत्रात हे लेख मालिका स्वरूपात प्रकाशित झाल्याने काही मुद्दे पुन्हापुन्हा येतात त्या त्रुटीकडे दुर्लक्ष करता येईल . या विषयावर पुष्कळ चर्चा व्हावी, समाधानकारक तोडगे निघावे, शेतकरी हाच आपल्या एकूण अर्थव्यवहाराचा केंद्रबिंदू ठरून आपले अर्थसंकल्प सादर केले जावे, शेती विकासासाठी नवीन कल्पना राबवल्या जाव्या आणि अत्यंत आत्मीयतेने त्यांची अंमलबजावणी व्हावी अशी आशा सर्वच सुजाण नागरिक करतील. श्री देशपांडे यांना पुढील लेखनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.




**व्यथा -बळीराजाच्या... आणि...**
**लेखक : दिलीप देशपांडे. प्रकाशक : शॉपिजन**
**पृष्ठसंख्या : 113 मूल्य : 268**



भानुदास धोत्रे
संपर्क 7972625086

# कोमेजलेलं कोकरू.....!!

आधुनिक केसरी

**नंदिनीच्या घरची दयनीय अवस्था पूर्णपणे माहित झाल्यापासून, पवार गुरुजी तिच्यावर सतत लक्ष ठेऊन होते. ते तिच्या अडीअडचनींची बारकाईने विचारपूस करीत असत. वेळी अवेळी गरजेनुसार तिला मदतही करीत असत. पवार गुरुजी शिकवत असलेल्या तिसऱ्या इयत्तेत ती शिकत होती.**

ठुसका बांधा, गोल चेहऱ्यावरचं बसकं नाक, कानापर्यंत कापलेले काळेभोर केस, गौर वर्ण, अंगावर मळकट फाटके कपडे, अर्धवट पडलेल्या पांढऱ्याशुभ्र दातांचं बोळकं विचकावून, थोडं गालातल्या गालात हासत, लाजतच ती पवार गुरुजींशी बोलायची. घरी घडलेल्या सर्व बारीक सारीक हकीकती गुरुजींना निःसंकोचपने सांगायची. गुरुजीही तिच्याशी एकरूप होऊन तिच्या कोवळ्या वयाच्या कोमल बाळबोध भावना अगदी शांतपणे ऐकून घ्यायचे. खेळण्या बागडण्याच्या एवढुश्या लहान वयात तिच्यावर बेतलेले कठीण, दुःखभरे प्रसंग ऐकून गुरुजीही आवक होऊन जायचे. भावनिक होऊन जायचे. एखाद्या दिवशी जर नंदिनी वर्गात दिसली नाही तर पवार गुरुजी अस्वस्थ होऊन तिच्याविषयी तिच्या मैत्रिणीजवळ विचारपूस करायचे. तिच्या वाट्याला आलेल्या दुःख, व्यथा, वेदनेशी ते एवढे एकरूप होऊन गेले होते की, नंदिनी वर्गात दिसली नाही तर त्यांना अगदी बेचैन वाटायचं.

शाळेपासून थोड्याच अंतरावर नंदिनीचं घर होतं. आई, वडील, आजी,आजोबा, आणि तिच्यापेक्षा लहान असणारी दोन गोंडस भावंड. असा तिचा एकंदरीत परिवार. पण तरूण वयातच तिचे वडील दारूच्या व्यसनाकडे वळले होते. दारूच्या व्यसनामध्ये पूर्णपणे गुरफटून गेले होते. आई आणि वडिलांमध्ये घरात दररोजंच भांडणं आणि मारामाऱ्या व्हायच्या. घरातले आजी आजोबाही थकलेले होते. नवरा बायकोची भांडणं होऊ नये म्हणून अधून मधून ती दोघेजण मुलगा आणि सुनेच्या भांडणामध्ये पडायचे. पण दारूच्या पूर्णपणे अधीन झालेला मुलगा त्यांच्यावर हात उगारण्यासही मागेपुढे पाहत नसायचा. त्यामुळे तेही त्यांच्या दररोजच्या भांडणं तंट्याला आणि कटकटीला पुरते वैतागून त्रस्त झाले होते. दोघांच्याही पदरात कुणाचीतरी दृष्ट लागावी अशी कोवळी तीन गोंडस लेकरं देवान दिली होती. पण व्यसनाच्या आधीन झालेल्या नंदिनीच्या वडिलांना त्याचं काहीच सोयीर सुतक वाटत नव्हतं. त्यांना ना-नंदिनीच्या आईबद्दल प्रेम जिव्हाळा होता ना-तिच्यासह तिच्या भावंडाबद्दल. नंदिनीच्या आजोबांनी तिच्या वडिलांचं दारूचं व्यसन सुटावं म्हणून त्यांना दोन तीन वेळेस "व्यसन मुक्ती केंद्रातही" नेऊन बघितलं. पण त्याचा काही फारसा उपयोग झाला नाव्हता. थोडे दिवस ते दारू सोडायचे नि काही दिवसांनी परत प्यायला सुरुवात करायचे. त्यामुळे नंदिनीच्या आजी आजोबांनीही त्याच्यापुढे हात टेकले होते. 'आपलंच नशीब फुटकं' म्हणून कसे तरी आलेले दिवस काढत होते. आपल्याच लेकाची ही तीन सोन्यासारखी गोंडस लेकरं व त्यांची होणारी भावनिक परवड पहिली की त्यांचा जीव आतल्या आत पिळून निघायचा. पण ते सर्व सोसल्या शिवाय त्याला कुठला इलाजही नव्हता. म्हणून आलेले दिवसं निभावून नेणे सुरु होते. अशातच नंदिनीची आई घरातील रोजच्याच भांडण तंट्याला वैतागून माहेरी निघून गेली होती. तिनं तिन्ही लेकरांना नवऱ्याकडेच ठेऊन दिलं होतं. त्यामुळे इयत्ता तिसरीमध्ये शिकणाऱ्या नंदिनीवर तिच्यापेक्षा दोन लहान भावंडांची जबाबदारी येऊन पडली होती. घरात आजीनं जे काही केलं ते स्वतः खायचं नि आपल्यापेक्षा लहान भावंडांनाही खाऊ घालायचं. त्यांची शी-सू करायची, त्यांना खेळवायचं, रात्री त्यांना झोपू घालायचं. आईची आठवण आली की तिची लहान भावंड रडत बसायची. पण ही तिसरीतली नंदिनी त्यांची समजूत काढीत, गाणे कविता म्हणत त्यांना झोपू घालायची. ह्या सर्व घटमटीत तिला अभ्यासाला खूपच कमी वेळ मिळायचा. तरीही बिचारी वर्गात चांगली हुशार होती. तिला चांगलं लिहिता वाचता येत होतं. कविताही बऱ्यापैकी पाठ होत्या. गणितातही तिची गती चांगली होती. म्हणूनच ती पवार सरांची लाडकी विद्यार्थिनी होती. तसं पाहिलं तर नंदिनीसाठी कुठलीही परिस्थिती अनुकूल नव्हती. सगळीकडून तिची परवड आणि उपेक्षा सुरु होती. पण अशाही परिस्थितीला शरण न जाता आलेल्या संकटाला सामोरं जात, संकटावर मात करीत तिचं शिक्षण सुरु होतं. तिचं वयचं काय होतं ? उनंपुरं साडेआठ नऊ वर्षाचं. पण एखाद्या परिपक्व माणसासारखी समज आणि उमज तिला अनुभवातून आली होती. म्हणूनच म्हणतात की, "अनुभव हा माणसाचा सर्वश्रेष्ठ गुरु आहे" ते काही खोटं नाही. अलीकडे नंदिनीची आत्याही तिच्या वडिलांकडे म्हणजेच नंदिनीच्या आजोबांकडे राहायला आली होती. तिलाही मुलबाळ होत नसल्यामुळं तिच्या सासरच्या लोकांनी तिला माहेरी पाठवून दिलं होतं. बिचाऱ्या म्हाताऱ्या आजी आजोबावर संकटावर संकटं येऊन अदळत होती. "घर फिरलं की वासेही फिरतात." अशी एक ग्रामीण म्हण आहे. अगदी त्याच पद्धतीच्या घट्नांची मालिका सुरु होती. नंदिनीच्या आत्याच्या डोक्यावरही थोडाफार परिणाम झालेला असल्यामुळे, ती नंदिनी आणि तिच्या लहान भावंडांना बरे पहात नव्हती. त्यांचा ती दुस्वास करायची, तिरस्कार करायची.

एके दिवशी असेच नंदिनी तिच्या दोन्ही लहान भावंडांना घेऊन शाळेत आली. तिघेही बहीण भाऊ कोपऱ्यातल्या बेंचवर दाटीवाटीणे बसली होती. सर काय म्हणतील म्हणून तिची दोन्ही लहान भावंड भेदरलेल्या नजरेनं सरांकडे पाहत होती. पण पवार सर नंदिनीची परिस्थिती जाणून होते. त्यांनी तिला आपल्या जवळ बोलावलं तिची विचारपूस केली. तिच्याबरोबर तिच्या दोन लहान भावंडांनाही रोज शाळेत घेऊन येण्यास परवानगी दिली. भावंडामुळे तिला शिक्षणापासून वंचित राहावं लागू नये. तिच्याबरोबरच तिच्या भावंडांनाही दुपारचे मध्यान्न भोजन खाऊन पोटाची भूक काहीअंशी शमविता यावी. या उदात्त हेतूने पवार सर तिला सांभाळून घेत होते. एकीकडे शहरातील सूट बूट घालून, बाटलीबंद पाणी आणि पिझ्झा बर्गर डब्यात घेऊन, व्हॅनमध्ये ऐटीत बसून शाळेत जाणारी मुलं कुठं ? अन ही परिस्थितीला शरण आलेली नंदिनी सारखी बाळबोध लेकरं कुठं ? किती हा विरोधाभास ? अशी विदारक परिस्थिती एखाद्याच्या वाट्याला येते की, त्यानं कायमचं कोलमडून पडावं. पुन्हा उठून काही करू पाहण्याचं बळ आणि त्राण त्याच्या गात्रात शिल्लक राहूच नये. त्यानं सतत नियतीशरण राहावं. दैवाधीन राहावं. अशारीतीनं ह्या "कोमेजलेल्या कोकराचं" नियतीशरण राहून..... दैवाधीन राहून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेणं सुरु होतं. सोबत पवार सरांसारखे संवेदनशील, हळव्या मनाचे शिक्षक होतेच. वेळी अवेळी शैक्षणिक अडचणीसाठी ते तिच्यासाठी सदैव धावून जात. तिला प्रत्यक्ष मदत करीत. त्यामुळं आई, वडील, आजी, आजोबा, आत्या या सर्वांपेक्षा तिला आपले गुरुजी जवळचे वाटत. आजही आशा अनेक वाडी, वस्ती, तांड्यावर पवार गुरुजींसारखे संवेदनशील मनाचे गुरुजी" कोमेजलेल्या कोकरांची माय होऊन" शिकवतांना पहिले की, "गुरु शिष्याचं पवित्र नातं" सोन्यासारखं उजळून निघतं. मुलं ही खरंच देवा घरची फुलं आहेत याची खऱ्या अर्थानं साक्ष पटते आणि गुरु हा विद्येचा सागरू, दयेचा आगरू असल्याची अनुभूती येते.

## लेक माहेरवाशीण



येते लेक माहेराला
आई दळण दळते
आठवून बालपण
आई पिठ ही मळते

चुलीवर भाकरीला
आई गरम करते
विचारात चटक्याने
आई भानावर येते

लेक सासूरवाशिण
आई वाट ही पहाते
डोळे लागे वाटेवर
आई पहात रहाते

गाडी येते दारावर
आई धावत ही जाते
लेक धावत कुशीत
आई आनंदून जाते

बाप लांबून बघतो
आणि लपून रडतो
डोळे पुसून तो येतो
लेकी बघून हसतो

जयेश अ.माधव

## तू लढायला शिक

शिक बाई शिक, थोड लढायला शिक
खाली मान घालून, नको चालूस पुढे
आता तरी थोड माग फिरायला शिक
शिक बाई शिक, थोड लढायला शिक...
आलाय पुन्हा उफाळून
त्यांचा संस्कृतीचा अभिमान
गोड बोलून करतील तुला
पुन्हा एकदा बंदिवान
तळ उघडा पडलेल्या विहीरीसारखी
होशील पुन्हा रीती
हीच असते गं बाई गुलामगिरीची नीती
गुलामीच बंधन आता तोडायला शिक
शिक बाई शिक पुन्हा लढायला शिक
समतेच वारं थोड घ्यायला शिक...
रोपात वाढलेल्या तणासारखी
मनुची पिलावळ वाढू लागली जागोजागी
बलात्कार खुनाच आलय नवं पिक
पावल जरा जपुन तिथ टाकयला शिक
डोळ्यातल स्वप्न तुझ्या जपायला शिक
शिक बाई शिक थोड लढायला शिक...
दहा दहा पोर जन्माला घाला
सांगायला नुसतं यांच काय जात
कुठं पेलायच असत यांना
गर्भारपणाच ओझ
यांच्या मधाळ फसव्या जाळ्यात
तू अशी फसू नको
पारतंत्र्याच्या पिंजऱ्यात पुन्हा जाऊन बसू नको
रांधा, वाढा, उष्टी काढा
जाईल यातच जन्म सारा
सांग मग तुझ्या नशिबी
कुठला आलाय मोकळा वारा
होशील कैद पुन्हा उंबऱ्याच्या आत
करून तुला सती सावित्री
ढकलतील पुन्हा अंधार युगात
झिडकारून टाक हा बेगडीपणा
परिवर्तनाच नव आभाळ
कवेत घ्यायला शिक,
शिक बाई शिक, थोड लढायला शिक...

प्रा.डॉ. संगीता दोंदे, छत्रपती संभाजीनगर

## मी बाप झालो अन मला बाप कळाला

मी बाप झालो अन मला बाप कळाला
तो शेतात राबणारा आणि मी ऑफिसात
दोघांमधला फक्त फरक कळाला
मी बाप झालो अन मला बाप कळाला...
तो राबत होता शेतामधे फाटलेलं
शर्ट आणि फाटलेलं धोतर
मळलेले शेणामातीचे अंग आणि
घामाच्या वाहणाऱ्या
धारा सोबत घेऊन लेकरांच्या चोचीत
संध्याकाळी
घास भरविण्यासाठी
मीही आज तेच करतो लेकरांसाठी
ऑफिसात जाऊन
फरक फक्त एवढाच की बाप
शेतात राबायचा अन मी ऑफिसात राबतो
फाटलेलं शर्ट नाही ना धोतर फाटलेलं
सुटा बुटात राबतो
मीही आज माझ्या लेकरांची
संध्याकाळची सोय व्हावी म्हणून
खूप त्रास होतो
बाप असल्याचा राबतांना
अन पटकन डोळ्यांत पाणी येतं आणि आठवतो
मग बाप तेव्हा न कळालेला
मी बाप झालो अन मला बाप कळाला...
पैसे नसतांना लेकरांचे लाड पुरविणारा
स्वतः अनवाणी राहून लेकरांना चप्पल देणारा
तंबाखूच्या पुडीवर स्वतःची भूक भागवून
लेकरांना पोटभर खाऊ घालणारा
चांगल्या कपड्यात लेकरांना ठेवून
स्वतः फटक्यात राहणारा
मला बाप आठवतो
बापाचे सारे दुःख आज अंगात साठवतो
माझ्याच लेकरांसाठी हे सर्व करतांना मला
माझा बाप कळाला
मी बाप झालो अन मला माझा बाप कळाला...

प्रा.डॉ.अभिमन्यू गवई
छत्रपती संभाजीनगर,9860283241

## उसूल ....

पुरखों की रिवायतों को उसूल बना ले
सादगी को ही तु अपना गहना बना ले
रंग बनकर मै उतर जाऊं अभी
तु मेरे खयाल की तस्वीर बना ले
फिर से एक नई कहानी लिख दे
फिर से मुझे अपना मुजरिम बना ले
तुझ में देख सकूं मैं चेहरा अपना
अपने चेहरे को तु आईना बना ले
गर पार करना है इश्क़ का दरिया
वफ़ा को तु अपनी कश्ती बना ले
मायूसी के साथ कटेंगे नहीं रास्ते
यादों को सफ़र का सामां बना ले
गर सुनना है तुझे खुदा की जुबां
किसी पेड़ पर अपना घर बना ले
बलराज संघई, 9420015108

## हे स्वप्नांचं आभाळ

हे स्वप्नांचं आभाळ आपलं कधीच नव्हतं
हे उमगलं मला खाचखळगे अन् ठेचा खावून.
तरी या निरभ्र आकाशात मी स्वप्न वेडे पाहत होतो
नसलेल्या ढगांना आकार मनाजोगा देताना
उन्हात करपलेल्या साऱ्याच स्वप्नांना
रंग छान देत होतो.
भर उन्हात त्या स्वप्नांच्या पाठीमागे
भाजलेल्या पावलांनी धावत होतो.
मृगजळ समजून झळा उन्हाच्या
रोज रोज खात होतो.
आता मात्र वास्तवात
होरपळ व भाकरीच्या चंद्रासाठी पळपळ
अन् हरवलेल्या अस्मितेच्या शोधाबरोबर
या जीवनसंघर्षात काटेकुटे
अन् दगडधोंड्यांशी लढाई रोजचीच आहे.

ज्ञानेश्वर गायके. कन्नड
मो..९४०३३८४८८९

## स्वच्छतादूत

परिसर आपला
स्वच्छ करू
आपण सर्व मिळूनी
हाती झाडू धरू

रस्त्यावर केरकचरा
नका कुणी टाकू
घरातील प्लॅस्टीक पिशव्या
नालीत नका फेकू

कचरा नालीत टाकता
तुंबेल घाण पाणी
दुर्गंधी पसरेल सर्वत्र
आरोग्याची होईल हाणी

निरोगी आरोग्यासाठी
दूर करूया घाण
स्वच्छता राखण्याची
असावी सर्वांना जाण

जिथे स्वच्छता तिथे देवता
युगाचा नारा नवा
निसर्गाचे संगोपण करूनी
घेवूया स्वच्छ हवा

स्वच्छतेकडून समृद्धीकडे
आपण सारे जाऊ
हाती झाडू घेवूनी
स्वच्छतादूत होऊ

रवींद्र चालिकवार
मो.9011559106



## खारुताई



इवली -इवली खारुताई,
तिला असते नेहमीच घाई...
कधीं खाली, कधीं वर
धावत जाते भराभर...

काड्या- मुड्या ,कापूस घेऊन,
घर करते मऊ -मऊ...
इकडे तिकडे फिरून आणते,
बाळासाठी गोड खाऊ...

खारुताई धीट किती ?
जरासुद्धा घाबरत नाही...
छोट्याशा फांदीवरही,
अगदी सहज चढतेस बाई...

कसं बरं चढता येतं ,
सांग तुला झाडावर...
मला तर वाटते भीती,
काटाच येतो अंगावर...

इवलासा जीव तुझा ,
करतेस गं किती काम ?
कधीच दिसत नाहीस मला,
करतांना तू आराम...

खारुताई खारुताई
होशील का गं कधी जाड ?
वाटतं जवळ घेऊन तुझे
खूप -खूप करावेत लाड...
खूप -खूप करावेत लाड...

सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे
-चोपडे, परभणी.९८२३०६६६६

## देवाचा बाजार

कशी माणसाची जात।
किती रे हरामखोर॥
पोटासाठी देवाचा हो।
त्यानं मांडला बाजार ॥धृ॥
बुवा,भट खूप झाले।
चार वेद बरळलें॥
हजारांच्या नोटांनी रं।
खिसे तुडुंब भरले ॥1॥
मंत्र दोन म्हणती नी।
घेती दक्षिणा अपार॥
देव साधन पोटाच।
त्याचा मांडला बाजार ॥2॥
पोट पुजाऱ्याचं चाले।
गरीबाच्या धनावरं॥
मंदिरात रे तिजोऱ्या।
भरल्यात भारंभार ॥3॥
म्हणे करा दानधर्म।
तुम्हा पावेल ईश्वर॥
देव काय मंडईचा।
भाजीपाला आहे कारं ॥4॥
गृहशांती, पितृशांती।
सारं थोतांड सांगती॥
स्वतःच्याच स्वार्थासाठी।
जनलोका फसवती ॥5॥
नको नको अरे बाबा।
असा फसुरे माणसा॥
पूजा पाठ नी विधिनं।
देव तुला भेटे कसा ॥6॥
देव बघ माणसात।
शोध तया निसर्गात॥
आहे तुझारे श्रीहरी।
तूझयाच ह्दयात ॥7॥
बांध संग विज्ञानाशी।
जोड ईश्वराचा ध्यास॥
तुज आळवुनी सांगे।
मनु तुकोबांचा दास ॥8॥


कवीराज : मनीष आहिरे
सटाणा, नाशिक 7588069679



## लावण्यखणी



लावण्यखणी, तुझ रुप रुपवान
जणू हिरव्या झाडाला रंगीबेरंगी पान
कानामधी डूल आणि नाकामधी नथ
खुलूनी दिसे तुझ नक्षीदार रुप
तुझ्यासंगतीला सात सुर सारे
तुझ्या प्रितीचे वाहते गुलाबी वारे
डोंगरातून वाहणारी जणू तू दरी
ह्दयाला मोहणारी तू एक परी
हो तू माझी राणी मी होतो तुझा गडी
एकमेकांच्या संगतीन
जुळवू दोन मनाची एक कडी
लक्ष्मण वाल्डे-कन्नड
जि.संभाजीनगर
मो.नं-8888606068



तुला!

मी मागे नसतानाही
असल्याचा भास होतो ना तुला!
लोकांशी महत्त्वाचं बोलतानाही
माझा जोक आठवतो ना तुला!
आपण गर्दीत चालतानाही
माझ्यासोबत एकांत जाणवतो ना तुला!
इतरांसोबत जोरात हसतानाही
माझा दुरावा रडवतो ना तुला!
कधी उदास वाटतानाही
माझा चेहरा हसवतो ना तुला!
तुला नको असतानाही
माझा आवाज लाजवतो ना तुला!
तू शब्दांनी नाकारतानाही
चेहराच सांगतो, मी आवडतो ना तुला!

निशा भुसकर
२५.०५.२०१७



कोणाच्या तरी येण्याने आयुष्यच कधी कधी बदलून जातं
आपलं सारं जगच त्यांच्याभोवती फिरू लागतं
जिवंत राहणं आणि एक एक क्षण जगणं
यातला फरक समजू लागतो
नाही नाही म्हणता आपणही
प्रेमात पडू लागतो

कधी हसणं विसरून गेलो तर
ते हसायला शिकवतात
जीवन हे खऱ्या अर्थाने
जगायला शिकवतात

पण एक दिवस जेव्हा ते दूर निघून जातात....

आपलं आयुष्यच अर्थशून्य वाटू लागतं
त्यांच्या गोड आठवणींमधे वेडं मन झुरू लागतं

कारण प्रत्येकालाच गरज असते एका साथीदाराची,
प्रत्येक क्षणाला प्रीतीच्या रंगात रंगवण्यासाठी
त्याच्या गोड गुलाबी स्वप्नात हरवण्यासाठी

म्हणूनच ........
असेल जर कोणी असं खास तुमच्याजवळ
जाऊ देऊ नका त्यांना कधी दूर
एकदा जवळ घेऊन म्हणून तर बघा

# मृत मेंढ्यांची संख्या दीडशेवर; मेंढपाळांना मदत देण्यात यावी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** सिल्लोड तालुक्यातील अंधारी येथे ॲपल बोर जास्त प्रमाणात खालल्याने सोमवार आणि मंगळवारी मिळून तब्बल १२० मेंढ्या विषबाधेतून दगावल्या. मंगळवारी पशुसंवर्धन जिल्हा उपआयुक्त डॉ. प्रदीप झोड तथा विभागीय रोग अन्वेषन प्रयोग शाळेचे डॉ. रोहित घुमाळ, सिल्लोडचे तहसीलदार विक्रम राजपूत यांनी घटनास्थळी भेट देत मेंढपाळाना मार्गदर्शन केले. पशूवैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचार करूनही दोन दिवसांपासून मेंढ्या मृत्यूमुखी पडण्याचे सत्र सुरूच असल्याने मेंढपाळ साहेबराव शिंदे, चिंधा तोरवे, वाल्मिक तोरवे, साहेबराव तोरवे भेदरले आहेत. त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मंगळवारी तहसीलदार विक्रम राजपूत, प्रभारी गटविकास दादाराव आहिरे, मंडळ अधिकारी गजेंद्र चांदे, तलाठी ज्ञानेश्वर क्षीरसागर यांनी पंचनामा केला. या मेंढपाळांना शासनस्तरावरून आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन - तहसीलदार राजपूत यांनी यावेळी दिले.

यावेळी डॉ. महेश पवार, डॉ. संजय गायकवाड, डॉ. राजेश्वर जळके, डॉ. किशन गोरे, डॉ. एन. के. भुजंग, डॉ. शाम चव्हाण, डॉ. रामनाथ भोजने, डॉ. बळीराम गायकवाड, डॉ, रोहित घुमाळ, डॉ. भाऊराव भालेराव, डॉ. मनोहर गोरे यांनी मेंढ्यांची तपासणी करून औषधोपचार केले. मेंढपाळ किसन चिंता थोरवे माझ्या दीडशे मेल्यांना विषबाधा होऊन त्या मरण पावल्या मी अत्यंत गरीब कुटुंबातील असून माझे हे फार नुकसान झाले असून माझ्या कुटुंबांच्या इतर उदरनिर्वातीसाठी मला



शक्य होऊन तेवढ्या संख्येने मला रोख स्वरूपात मदत करण्यात यावी यासाठी कुटुंबाचा उदरनिर्वाह होईल माझी बँक डिटेल्स फोन पे नंबर ९९२१८३९७०६

# आ. हिरामण खोसकर यांना फोनवरून धमकी

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीसाठी शेवटच्या



टप्प्यात जोरदार प्रचार सुरू आहे. भाजप-शिवसेना शिंदे गटाच्या शेतकरी विकास पॅनलचे नेते शिवाजी चुंभळे यांनी थेट महाविकास आघाडीचे आमदार हिरामण खोसकर यांना फोनवरून धमकी दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तालुका पोलिस ठाण्यात शिवाजी चुंभळे यांच्यासह त्यांचे चिरंजीव अजिंक्य चुंभळे यांच्यावर अदखल गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिकमध्ये १४ बाजार समित्यांच्या निवडणुकांचा रणसंग्राम सुरू असून, गुरुवारी माघारीची अंतिम मुदत संपल्यावर निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले. त्यामुळे शुक्रवारी चिन्ह वाटप व याद्या जाहीर झाल्याने निवडणूक प्रचाराला जोर आला आहे. त्यामुळे प्रत्येक उमेदवार मतदारसंघ पिंजून काढत आहे. नाशिक कृषी बाजार समितीत महाविकास आघाडी विरुद्ध भाजप शिवसेना शिंदे गट असे चित्र असले तरी पिंगळे गट विरुद्ध चुंभळे गट अशी पारंपरिक लढत होणार आहे. त्यामुळे दोन्ही गटांकडून मतदारसंघात जोरदार प्रचार सुरू एकमेकांना खिंडीत पकडण्याची एकही संधी दोघेही सोडत नाहीत. महाविकास आघाडीमुळे इगतपुरी मतदारसंघाचे काँग्रेसचे आमदार हिरामण खोसकर हेदेखील पिंगळे गटासोबत प्रचार यंत्रणेत सहभागी झालेले आहेत. त्याचा राग मनात धरून भाजप-शिवसेना शिंदे गटाच्या शेतकरी विकास पॅनलचे नेते शिवाजी चुंभळे यांनी आमदार खोसकर यांना मोबाइलवरून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे समोर आले आहे. त्याचबरोबर चुंभळे यांचे चिरंजीव अजिंक्य चुंभळे यांनी देखील आमदार खोसकर यांना धमकी दिली आहे.



# आय.एस.ओ. जि.प. उच्च प्रा.शाळा मल्हारा येथे शाळा पूर्वतयारी प्रशिक्षण संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** ISO जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा मल्हारा पं. स. अचलपूर, येथे दिनांक 21-4-2023 ला मल्हारा केंद्रातील सर्व शाळेतील वर्ग 1ते 5 च्या शिक्षकांचे शाळापूर्व प्रशिक्षण मेळावा मोठया आनंदीदायी पद्धतीने पार पडला या कार्यक्रमाचे उदघाटक गावचे प्रथम नागरिक सरपंच नारायणराव बोरेकार, अध्यक्ष उत्तमराव शेळके ( शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ) प्रमुख अतिथी दीपकराव तायडे ( उपाध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती ) शालिनी वायकर मॅडम ( डी.ओ.डी पंचायत समिति अचलपूर )मुख्यद्यापक कु. शिला सोळंके, तज्ञ मार्गदर्शक केन्दप्रमुख श्रीकृष्ण उघडे सर, श्री धोटे सर श्री जाधव सर ( उच्चं श्रेणी मुख्य. ) राणी तायडे मॅडम हे होते. मेळाव्यामध्ये केंद्रातील सर्व शिक्षक यांनी आनंदीदायी पद्धतीने मेळाव्यात सहभाग घेतला, कडक तापमान असल्यामुळे मा. केंद्रप्रमुख तसेच कर्तव्यनिष्ठ उच्चं श्रेणी मुख्य.कु शिला सोळंके यांनी नास्ता व बिसलेरी स्केन ची व्यवस्था केली होती त्यामुळे मेळाव्यात अधिक रंजकता आली. जाधव सर पळसकर सर, आदर्श शिक्षक बबलू कराळे सर यांनी वर्ग पहिली मध्ये प्रवेश नाटिका सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. घोषवाक्य, मुनादि, बँड पथक या मुळे शाळेतील परिसर उत्साहाने नाहून निघाला होता.हा मेळावा यशस्वी होण्याकरिता शाळेतील शिक्षक कल्पना चौधरी, बबिता पंडित, रुपलाल बेठे, किरण साकरकर, रश्मी पानझाडे, यांनी मोलाची कामगिरी पार पाडली.

# गरवारे कम्युनिटी सेंटरतर्फे वसुंधरा दिना निमित्ताने मार्गदर्शन व चित्रकला स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** वसुंधरा दिन हा आपल्या पृथ्वीच्या पर्यावरणाच्या संवर्धन साठी जागृती करण्यासाठी साजरा केला जातो या दिनाचे औचित्य साधून गरवारे कम्युनिटी सेंटर तर्फे जेष्ठ अभ्यासक सुधीर कोरटीकर यांचे मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी त्यांनी वसुंधरेचे आपल्या जीवनातील महत्त्व, वसुंधरेबद्दल ची आपली जवाबदारी या बद्दल विशेष माहिती उपस्थित विद्यार्थांना दिली तसेच पृथ्वीचा समतोल राखण्यासाठी महत्त्वाचे वृक्षारोपण करावे आणि वृक्षतोड कमी करावी. नद्याचे जल स्वच्छ ठेवणे आपल्या सभोवतालच्या पर्यावरणात स्वच्छता राखणे. शेतीत जैविक खतांचा वापर करा, रासायनिक खाते कमी वापरावी इत्यादी महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या तसेच विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली यामध्ये विद्यार्थांनी आपल्या मनातील वसुंधरेचे चित्र रेखाटले याप्रसंगी गरवारे कम्युनिटी सेंटर चे संचालक सुनील सुतवने शालवी दंडे यांची उपस्थिती होती.



# नुकसानभरपाई मिळावी म्हणून स्वभिमानीचे २५ रोजी आमरण उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यात संततधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे अतोनात नुकसान झालेले आहे. यामुळे हजारो हेक्टरवरील शेती पिकाला फटका बसला आहे. यामुळे पैठण तालुक्यात सप्टेंबर - आक्टोबर 2022 दरम्यान छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात झालेल्या काही ठिकाणी अतिवृष्टी व पैठण तालुक्यातील संततधार पावसामुळे कापुस, तुर, सोयाबीन मका, कांदा, भाजीपाला व फळबागांचे अतोनात नुकसान झाले. त्यामुळे हजारो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. याबाबत छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री यांनी याबाबत स्वतः आश्वासन देवून शेतकऱ्यांना संततधार पावसामुळे नुकसानीची भरपाई तात्काळ देण्याचे कबुल केले परंतु त्यास सहा ते सात महिन्याचा कालावधी उलटुन देखील नुकसान भरपाई देण्यात आली नाही . त्यातच आता पैठण तालुक्यातील अवकाळी पावसाने सुध्दा शेतकऱ्यांचे गहु, बाजरी, कांदा व इतर पिकांचे देखील अतोनात नुकसान झालेले आहे.



संततधार पावसामुळे पैठण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेल्या नुकसानी बाबत दि . 24.4.2023 रोजीपर्यंत नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ऑनलाईन जमा करावी नसता नाविलाजाने दि .२५ एप्रिल रोजी शेतकरी व स्वाभीमानी शेतकरी संघटनेच्या वतीने पैठण, ता. पैठण येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळा परिसरात रोजी सकाळी आमरण उपोषण सुरु करण्यात येईल असे लेखी निवेदन तहसीलदार यांना स्वभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष ज्ञानदेव मुळे यांनी दिले आहे.

RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com

# पिंपरी चिंचवडमध्ये राज्यस्तरीय शरीरसौष्ठव अजिंक्यपद स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज




**पुणे :** तरूणांना फिटनेस व शरीर सौष्ठवाच्या लागलेल्या ध्यासाला एक सकारात्मक व हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच उदयोन्मुख व शरीरसौष्ठव पटूना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने पिंपरी चिंचवड येथे दोन दिवसीय राज्यस्तरीय महाराष्ट्र श्री शरीर सौष्ठव अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

इंडियन बॉडी बिल्डर्स फेडरेशन मान्यता प्राप्त महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशन संलग्न बॉडी बिल्डिंग ॲण्ड फिजिक स्पोर्ट्स असोसिएशन, पिंपरी-चिंचवड संघटना व महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे अध्यक्ष किरण सावंत यांच्या सौजन्याने महाराष्ट्र श्री २०२३ भव्य राज्यस्तरीय शरीरसौष्ठव ही स्पर्धा गूरूवार, ४ मे व शूक्रवार, ५ मे २३ या दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. या सर्व अजिंक्यपद स्पर्धा सिल्व्हर बँक्वेट हॉल जवळ डांगे चौक रावेत बीआरटी रोड ताथवडे. पिंपरी चिंचवड, पुणे येथे होणार आहे. यामध्ये पुरुष शरीर सौष्ठव, मेन्स फिजिक, महिला शरीर सौष्ठव व वूमन मॉडेल फिजिक या गटात स्पर्धा असतील. वर्ल्ड बॉडिबिल्डींग अण्ड फिजिक्स स्पोर्ट्स फेडरेशन चे जनरल सेक्रेटरी श्री चेतन पठारे यांच्या शब्दाला मान देऊन ही महाराष्ट्र श्री या स्पर्धेच्या आयोजनासाठी जबाबदारी किरण सावंत यांनी स्वीकारली, महाराष्ट्र बॉडिबिल्डींग असोसिएशनच्या नवनिर्वाचित अध्यक्ष पदावर निवडून आलेले किरण सावंत यांच्या आज पर्यंत शरीरसौष्ठव या खेळासाठी केलेल्या उल्लेखनीय कामगिरी कौतुकास्पद असून भविष्यात ते अजून चांगल्याप्रकारे स्पर्धेचे आयोजन करतील तसेच महाराष्ट्रातील खेळाडूंना वेळोवळी मदत करतील असे वर्ल्ड बॉडिबिल्डींग अण्ड फिजिक्स स्पोर्ट्स असोसिएशन व एशियन बॉडीबिल्डींग अण्ड फिजिक्स स्पोर्ट्स असोसिएशनचे कायदेशीर सल्लागार श्री. विक्रम रोठे यांनी नमूद केले. या स्पर्धासाठी साऊथ एशियन बॉडिबिल्डींग अँण्ड फिजिक्स स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. प्रशांत आपटे यांनी शूभेच्छा दिल्या. महाराष्ट्र बॉडी बिल्डींग असोसिएशन सेक्रेटरी राजेंद्र चव्हाण आणि खजिनदार सूनिल शेगडे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धचे आयोजन बॉडी बिल्डिंग ॲण्ड फिजिक्स स्पोर्ट्स असोसिएशन पिंपरी-चिंचवड करत आहे.अशी माहिती आज इथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

ही स्पर्धा १२ गटांमध्ये होणार असून महाराष्ट्रातील २२ जिल्हातील खेडाळू सहभाग घेणार आहेत. ज्यामध्ये प्रामुख्याने मुंबर्ईचा रस्सेल डिब्रोटो, अजिंक्य रेडेकर, नितीन म्हात्रे, निलेश दगडे, सूशांत राजंणकर, उमेश गूप्ता, रोहन गूरव, पिंपरी चिंचवडचा श्रीनिवास वास्के, तोसिफ मोमीन, अदिती बंब, रेणूका मूदलीयार, शितल वाडेकर व तन्विर हक यांच्यामध्ये चुरस होणार आहे. राज्यभरातून अधिकाधिक तरूण- तरूणींनी या स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशनने केले आहे.

स्पर्धेतंर्गत वजन तपासणी व स्पर्धा होणार आहे. मेन्स फिजिक दोन गटात होणार असून ही स्पर्धा दिनांक गुरूवार, ४ मे रोजी सायंकाळी ४ ते १० या वेळात होईल. तर पूरूष शरीर सौष्ठव आणि महिला शरीर सौष्ठव व वूमन मॉडेल फिजिक स्पोर्ट्स ही स्पर्धा शुक्रवार ५ मे २०२३ रोजी फिजिक वजन तपासणी सकाळी १० ते दुपारी ३ व स्पर्धा संध्याकाळी ५ ते ११ या वेळी होईल.

स्पर्धेतील विजेत्यांना एकूण ६,५०,०००/-( सहा लाख पन्नास हजार ) अशी रोख रकमेची बक्षिसे ट्रॉफी प्रमाणपत्र दिली जाणार आहेत. तर अजिंक्यपद पटकाविणाऱ्या विजेत्यास १ लाख २५ हजार रूपये, उपविजेत्यास ५० हजार व रनर अप २५ हजार रूपये रकमेचे रोख पारितोषिक दिले जाणार आहे. तसेच उत्तेजनार्थ ६ ते १० क्रमांक स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रूपये व प्रशस्तीपत्र देखील प्रदान केले जाणार आहे. असून मेन्स फिजिक, महिला शरीर सौष्ठव व वूमन मॉडेल फिजिक स्पोर्ट्स महिलांना देखील रोख रकमेची पारितोषिके ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

**क्रीडा प्रकार व स्पर्धा अधिकधिक तरूण–तरूणींपर्यंत पोहचवणार – किरण सावंत**

किरण सावंत यांनी नुकतीच महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदाची सुत्रे हाती घेतली आहेत . ते स्वत : विविध क्रीडा प्रकार, व्यायाम व फिटनेस विषयी जागरूक असून ते यासंबंधाने ते या बाबतीत कमालीचे पॅशनेट आहेत . हा क्रीडा प्रकार, स्पर्धा, तसेच या क्रीडा प्रकाराप्रति तरूणांमध्ये जागरूकता, आकर्षण वाढविण्याच्या दृष्टीने अधिक उत्तम व भव्य अशा स्पर्धेसाठी आम्ही प्रयत्नशील असणार आहोत, अशी महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे अध्यक्ष किरण सावंत यांची भूमिका आहे .

# आसावरीच्या दिल्लीतील यशाने खेड बुद्रुक येथे सन्मान

आधुनिक केसरी न्यूज



**लोणंद :** खंडाळा तालुक्यातील खेड बुद्रुक ची सुकन्या असलेली आसावरी अशोक रासकर या विद्यार्थीनीने दिल्लीत संपन्न झालेल्या स्पर्धेतून घवघवीत यश मिळविल्या बद्दल तसेच श्रीलंका या देशात होणाऱ्या इंटरनॅशनल स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल खेड बुद्रुक येथीलच महात्मा जोतीराव फुले प्रतिष्ठानच्या वतीने सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन तिला सन्मानित करण्यात आले. यावेळी महात्मा जोतीराव फुले प्रतिष्ठानचे अध्यक्ष रमेश जगन्नाथ रासकर, सदस्य रमेश सर्जेराव रासकर, सदस्य दतात्रय रासकर, उपाध्यक्ष सुनिल रासकर, सचिव भानुदास रासकर, खेड बुद्रुक गावचे सरपंच गणेश धायगुडे पाटील, उपसरपंच धनश्री संदीप रासकर, नारायण दादासो धायगुडे, ग्रामपंचायत सदस्या उमाताई रासकर,यात्रा कमिटी व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते. आसावरी रासकर हिने भालाफेक मध्ये गोल्ड मेडल आणि थाळी फेक मध्ये सिल्व्हर मेडल मिळविलेले आहे. स्टुडंट्स ऑलिम्पिक असोसिएशन दिल्ली यांच्या वतीने १९ व्या स्टुडंट्स ऑलिम्पिक नॅशनल गेम्सचे आयोजन दिल्लीत करण्यात आले होते. यावेळी धावणे, लांब उडी, गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक यां सारख्या विविध मैदानी स्पर्धा संपन्न झाल्या. आसावरी रासकरने भालाफेक आणि थाळी फेकमध्ये चांगली कामगिरी करत यशाला गवसणी घातली आहे.तिचे हे यश महत्वपूर्ण आणि मोलाचे समजले जात असून खेड बुद्रुक मध्ये मानाचा तुरा रोवला गेला आहे. खेडकरांना या यशाबद्दल आनंद झाला असून या यशाची दखल घेत महात्मा फुले प्रतिष्ठानच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन तिचा सन्मान ही ग्रामस्थांच्या उपस्थितीत करण्यात आला. आसावरी रासकर लोणंदच्या शाळेत शिकत असून आसावरीला स्टुडंट्स ऑलिम्पिक असोसिएशनच्या सातारा जिल्ह्याच्या सेक्रेटरी शुभांगी धसाडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभलेले आहे.शुभांगी धसाडे यांनी आसावरी कडून प्रत्यक्ष मैदानातून चांगला सराव करून घेण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. या यशात शुभांगी धसाडे यांचा मोलाचा वाटा असल्याने या यशाबद्दल आसावरी ने सुद्धा शुभांगी धसाडे यांचे विशेष आभार मानलेले आहेत. हे सगळं तुमच्या मुळे माझ्या आयुष्यात घडत आहे. या सगळ्यासाठी धन्यवाद. तुमचा आशीर्वाद सदैव माझ्या पाठीशी राहो हीच अपेक्षा आसावरीने शुभांगी धसाडे यांच्याकडून बाळगलेली आहे.




गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर




# संविधानाचे धिंडवडे काढले जाताहेत

## ज.वि.पवार : मिलिंद सामाजिक कृतज्ञता पुरस्कार प्रदान सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** २०१४ पासून भारताच्या संविधानाचे धिंडवडे काढले जात आहे, असे वक्तव्य जेष्ठ आंबेडकरी विचारवंत व साहित्यिक ज.वि पवार यांनी केले. तसेच, हा देश २०१४ पासून दुभागंण्याचे काम सुरू आहे. धर्माच्या नावाने नव्हे तर संविधानावर हा देश दुभागंण्याचे काम सुरू आहे . संविधानाच्या विरुद्ध लोक अधिक आहे. तर संविधानाच्या समर्थनात लोक कमी आहे. त्यामुळे, तुमचे संविधानाच्या समर्थनात अधिक लोक उभा करण्याचे काम आहे, असे आवाहन त्यांनी केले.यापूर्वी वेगळे संविधान लिहण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना याच देशातील नागरिकांनी घरी



पाठवल्याची आठवण त्यांनी सांगितली. ते मिलिंद सामाजिक कृतज्ञता पुरस्कार सोहळ्यात बोलत होते.
पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे मिलिंद कला महाविद्यालयातर्फे मिलिंद सामाजिक कृतज्ञता पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन मिलिंद कला महाविद्यालयाच्या मैदानात शुक्रवार ( २१ एप्रिल ) रोजी करण्यात आले होते. हा पुरस्कार जेष्ठ आंबेडकरी विचारवंत व साहित्यिक ज.वि पवार यांना प्राचार्या डॉ.वैशाली प्रधान यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी उपप्रचार्य डॉ.संतोष बुरकुल यांची उपस्थिती होती. नामांतराचा लढा हा नामांतराचा होता.तो नामविस्ताराचा नव्हता. मी नामांतरवादी आहे नामविस्तारवादी नाही. आम्ही नामांतरासाठी लढलो. लाट्या काठ्या खाल्ल्या. मुंबईतील मंत्रालयाबाहेर आंदोलन केली. इकडे लोक पेढे वाटत होते.आम्ही तिकडे जेलमध्ये होतो, असा नामांतर लढ्याचा थरारक अनुभव ज.वि पवार यांनी सांगितला.
डॉ. संगीता दोंदे यांनी ज.वि.पवार यांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपप्रचार्य डॉ.संतोष बुरकुल यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्या डॉ.वैशाली प्रधान यांनी केले. डॉ. एस. बी गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. तर, एम.जी शिंदे यांनी आभार मानले.



# आवलगाव येथे ईदगाह मैदानावर रमजान ईदची नामाज अदा

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** आवलगाव येथे रमजान ईदची सामूहिक नमाज अदा करण्यात आली. यावेळी देशाच्या विकासासाठी देशाच्या एकतेसाठी व शांततेसाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. आवलगाव येथे नमाज अदा करण्यासाठी पानेवाडी, आवलगाव खुर्द, देवडी हदगाव, ग्रुरु पिंपरी येथील मुस्लिम बांधव नमाज अदा करण्यासाठी येतात. मुस्लिम बांधवांसाठी रमजान ईद अतिशय आनंदाचा उपवित्र पावन असा सण असतो. मुस्लिम बांधव एकमेकाप्रती मनात कसलाही मतभेद व गैरसमज न ठेवता एकमेकास गळा भेट घेऊन शुभेच्छा देतात.

# चंद्रपुरात वाऱ्यासह पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** अडीच मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय तृतीया तसेच ईदच्या मुहूर्तावर शहरात वीजांच्या कडकडाटासह वादळी वारा व मुसळधार पावसाला दुपारी तीन वाजताच्या सुमारास सुरूवात झाली. हा पाऊस सर्वदूर आहे. विशेष म्हणजे काल शुक्रवारी सायंकाळी ८ ते ८.३० या वेळेत आलेल्या वादळी पाऊसामुळे शहर तथा जिल्ह्यातील अनेक भागात २० ते २५ झाडे कोसळली आहेत. त्यामुळे अनेक भागातील वीज व पाणी पुरवठा खंडित झाला आहे. वडगाव परिसरात मोबाईल टॉवर कोसळले आहे. सुदैवाने जीवीतहानी टळली आहे. शहरात आज दुपारी तीन वाजतापासून वीजांच्या कडकडाटांसह वादळी वारा व पावसाला सुरूवात झाली. या पावसाचा व ढगांच्या कडकडाटाचा जोर चांगलाच आहे. आकाशात काळे ढग एकत्र आले असून पावसाची रिमझीम सुरूच आहे. सर्वत्र अक्षय तृतीया व मुस्लीम बांधवांची ईद सुरू असतांनाच अचानक या पावसाला सुरूवात झाली आहे.

# वडोद बाजार येथे रमजान ईद उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथे रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी वडोद बाजार येथील ईद गाह मैदानात नमाज अदा करून रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली मुस्लिम समाज बांधव रमजान महिन्यात महिनाभर उपवास केले जातात रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी वडोद बाजार येथे हिंदू समाज बांधव व ग्रामपंचायत च्या वतीने मुस्लिम समाज बांधवांना शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी वडोद बाजार येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते उपसरपंच गोपाळ वाघ ग्रामपंचायत सदस्य शेख राजीक,शिवराम मस्के, शुभम गंगाने, माजी सरपंच शेख रज्जाक उस्मान खा पठाण शेख शफीक ,मिर्झा बेग, कलीम पठाण साबेर पठाण, सलीम पठाण जहीर शेख, अखिल शेख, राजू मन्ना ,मोसिन मास्टर, शेख जफर शेख निजाम, मोईन शेख फारूक शेख, मजर शेख,फिरोज शेख ,एजाज शेख, अंजुम शेख ,आणिस शेख, शेख ताये र, ताजमात श हा,शांताराम तोरणमाल, अशोक शिनगारे, गोविंद पांडेजी, आसाराम कोलते, फकिरा मिस्त्री, अजिनाठ वाघ , अरूण वाय कोस, चेअरमन कडुबा म्हस्के, बळवंत वाघ, रमेश वाघ, खातिफ शेख, आदी सा हिंदू मुस्लीम समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुस्लीम समाज बांधवांना शुभेच्छा देण्यात आल्या.



## बारावी नंतरच्या नीट, सीईटी, जेईई तयारीच्या नावाखाली

# दहावीच्या निकालाच्या अगोदरच पालकांची लूट

## कोटामधील उच्चशिक्षित, तज्ज्ञ वर्ग असल्याच्या जाहिराती; मग कॉलेजमधील प्राध्यापक वर्ग अडाणी समजायचा..?

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** आपल्या पाल्याने उच्च शिक्षण घ्यावे, डॉक्टर, इंजिनियर व्हावे शेत मुजरा पासून अधिकाऱ्यापर्यंत सर्वच पालकांना हीच अपेक्षा असते.
आपल्या पाल्याला चांगल्यातले शिक्षण मिळावे, शिक्षण घेत असताना त्याला कुठल्याही गोष्टीची उणीव भासू नये. यासाठी पालक सतत धडपडत असतो.
मात्र अनेक ठिकाणी ढासळलेली शिक्षण व्यवस्था असल्या कारणाने गेल्या दोन-चार वर्षांमध्ये अमुक_ तमुक सरांचे क्लासेस, करिअर अकॅडमी, चित्रकला क्लासेस, हस्ताक्षर क्लासेस यांचा बाजार सुरू झाला आहे व खासगी क्लासचालकांनी दुकानदारी सुरू केली आहे. त्यामुळेच शिक्षणाच्या नावाखाली खासगी क्लासेसचा धाराशिव व लातूर जिल्ह्यात सुळसुळाट झाला आहे. अनेक वेळा तुलनात्मक शिक्षण याबाबत सरकारी व खासगी शाळांमध्ये चढाओढ लागलेली असते. यात खासगी शाळांनी सरकारी शाळांवर मात केल्याचे सध्या तरि पाहावयास मिळत आहे. नेमका याचाच परिणाम म्हणजे पालकांमधून पाल्यांना सरकारी शाळेत न घालता खासगी शाळेत घालण्याची चढाओढ सुरू असल्याचे दिसून येते. यामध्ये भरमसाठ फी, वेगवेगळ्या इव्हेंटच्या नावाखाली पैसे गोळा असे प्रकार सर्रास सुरू असतात.
नुकतेच शालेय व कॉलेजच्या परीक्षा संपल्या आहेत.






कॉलेजमध्ये नाहीतर, क्लासेसमध्ये प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी रांगा लावल्याचे भयानक असे चित्रं पहावयास मिळते आहे. शिक्षणाची पंढरी म्हणून नावाजलेल्या लातूर शहराकडे ग्रामीण भागातून पाल्याचा व पालकांचा ओढा लातूरकडे रवाना होत आहे. आम्ही सांगेल त्या ठिकाणी कुठल्याही कॉलेजमध्ये ऍडमिशन ठेवा, कॉलेजमध्ये ऍडमिशन नावालाच राहील क्लासेस नियमित करावे लागतील. असंच क्लासेस वाल्यांच म्हणणं असल्याचं पालकांमधून सांगितलं जात आहे. तुमचा पाल्य अभ्यासात हुशार आहे,आमच्या क्लासेसच्या परीक्षेमध्ये त्याने चांगले मार्क घेतल्यामुळे त्याला आमच्या क्लासेसच्या फीस मध्ये दहा टक्के सूट दिली जात आहे. लवकरात लवकर ऍडमिशन घ्या,नाहीतर बॅचेस फुल होतील. अशा पद्धतीची भीती क्लासेस वाल्यांकडून पालकांना घातली जात आहे.तुम्ही जर तुमच्या पाल्यास आमच्या क्लासेस मध्ये ठेवले तर तो नक्कीच डॉक्टर किंवा इंजिनियर होईल अशा थापा पालकांना फोन करून दिल्या जात आहेत.
यासाठी शाळेकडूनही क्लासेस वाल्यांना विद्यार्थ्यांच्या पालकाचे नंबर दिले जात आहेत.ते नंबर क्लासेस वाल्यांना पुरवण्यासाठी शिक्षकांची साखळी असल्याचेही काही पालकांमधुन बोलले जात आहे.

# घराणेशाही थांबविण्यासाठी एकनाथ दादा पवार यांना विधानसभेत पाठवा

## लोहा- कंधार मतदारसंघ : दत्ताभाऊ शेंबाळे यांचे जाहीर आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**महेंद्र बोराळे**

**कंधार :** लोहा कंधार मतदारसंघात गेल्या पंचवीस तीस वर्षांपासून कार्यकर्त्यांना संतरज्या उचलायला लावून मी, माझा मुलगा-मुलगी, बहीण, सून ,जावइ आणि माझेच नातेवाईक दाजी भावजींच्या या घराणेशाही वृत्तीतून होत आलेल्या राजकीय वाटचालीला प्रतिबंध घालायचे असेल तर एकनाथ दादा पवार यांचा राजकीय वारसदार फक्त आणि फक्त कार्यकर्ताच असल्याने त्यांनाच विधानसभेत पाठवण्याचे आवाहन भारतीय जनता पक्षाच्या किसान मोर्चा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य दत्ताभाऊ शेंबाळे यांनी केले. सूर्योदय मन्याड फाऊंडेशनचे अध्यक्ष व भारतीय जनता पक्षाचे राज्य प्रवक्ते एकनाथ दादा पवार यांनी लोहा-कंधार विधानसभा निवडणुक लढविण्याचा नव्हे तर जिंकण्याचा संकल्प केला असून सतत गत चार वर्षांपासून लोह- कंधार विधानसभा मतदारसंघ पिंजून काढला आहे. प्रत्येक गावातील, वाडी- तांड्यातील मतदार, जनता, युवक,वयोवृद्ध, तसेच विविध पक्ष संघटनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने स्वयंस्फूर्तीने सहभागी होत आहेत. एकनाथ दादा पवार म्हणतात, लोहा-कंधार विधानसभेची निवडणूक मला जनतेसाठी जिंकायची आहे. चाळीस वर्षात या विधानसभा मतदारसंघाचा विकास झाला नाही याचे कारण म्हणजे इच्छा शक्तीचा अभाव व फक्त मी व माझे कुटुंब हेच आहे. निवडणूक कोणतीही असो फक्त मी व माझेच कुटुंब. काही दिवसांपूर्वी कोरोना काळात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले होते की, माझे कुटुंब, माझी जबाबदारी...! त्यांच्या या आदेशाचे तंतोतंत पालन करण्यात लोहा-कंधार विधानसभा मतदार संघातील राजकीय पुढारी कुठेही कमी पडले नाहीत. माझंच पोरगं, माझीच पोरगी.माझीच बहीण. माझाच दाजी,.माझाचं पुतण्या. माझाचं जावई. माझीच सूनं हेच घसा कोरडा पडे पर्यंत म्हटले जात आहे. काही लोकांनी तर नातवांची पण जोड लावून ठेवली, माझेच नातेवाईक, माझचं कुटुंब याला मात्र आता या विधानसभा मतदारसंघातील जनता वैतागली असून 'अबकी बार, एकनाथ दादा पवार....!' हा संकल्प स्वतः हून जनतेनेच केला आहे. याचाच एक भाग म्हणून दोन दिवसापूर्वी फुलवळ येथील महादेव मंदिर येथे पंचक्रोशीतील कार्यकर्त्यांचा मेळावा भारतीय जनता पक्षाचे किसान मोर्चा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य दत्ता शेंबाळे यांनी आयोजित केला होता. या मेळाव्यास आवाहन करतांना दत्ता शेंबाळे म्हणाले की, कार्यकर्त्यांना राजकारणात संधी हवी असेल तर त्यांनी भक्कमपणे या वेळेस एकनाथ दादा पवार यांच्या पाठीशी नव्हे तर सोबत उभे रहा असे आवाहन दत्ता शेंबाळे यांनी केले. मेळाव्याचे अध्यक्षस्थानी कंधार-लोहा विधानसभा मतदारसंघाचे भावी आमदार एकनाथ दादा पवार हे होते,दत्ता शेंबाळे पुढे म्हणाले की, मागच्या तीस वर्षांपासून या मतदारसंघात कार्यकर्त्यांचा वापर फक्त कढी पत्यांसारखा निवडणुकी पुरताच करण्यात आला आहे, संधी द्यायची वेळ आली की, माझे कुटुंब, माझी जबाबदारी, या मतदारसंघात एकही कार्यकर्त्यांला मिळाला नाही.असे न्याय मिळालेले कार्यकर्ते दाखवा, कोणत्याही पक्षात पहा,'गमके मारे' कार्यकर्ते व युवकांमधे नैराश्य दिसत आहे. मी,एकनाथ दादा पवार यांच्या विषयी,त्यांच्या विकास काम करण्यासाठीच्या कार्यपद्धतीला अतिशय जवळ जाऊन पाहिले आहे. तुम्ही पण पाहा. अनुभव घ्या. खात्री करा. व एकनाथ दादा पवार यांचे काम करा. कारण, एकनाथ दादा पवार यांचा कोणीही राजकीय वारसदार नाही, दादाच म्हणतात, माझा राजकीय वारसदार हा माझा कार्यकर्ताच असेल. याची गांभीर्याने नोंद घ्या. व एकनाथ दादा पवार यांनाच आमदार करा. कारण १९९५ ला परिवर्तनाची पहिली बैठक मी या फुलवळच्या जागृत महादेव मंदिरात घेतली होती. आणि कंधार विधानसभा मतदार संघात कायापालट झाला होता. या महत्त्वपूर्ण मेळाव्याला पंचक्रोशीतील प्रमुख कार्यकर्ते, पत्रकार व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# फुलंब्रीतील डॉ.आंबेडकर स्मारकाशेजारील अतिक्रमण काढण्यासाठी आमरण उपोषण

## स्मारकाच्या सुशोभिकरणाच्या कामात होतोय अडथळा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरातील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाशेजारील जागेवर झालेले नवीन अतिक्रमण तात्काळ काढून टाकण्यात यावे, या मागणीसाठी सकल बौद्ध समाज बांधवांच्या वतीने आकाश सुभाष गंगावणे यांनी आज गुरुवार दि.20 रोजी पासून आमरण उपोषण सुरू केले आहे. फुलंब्री शहरात सध्या भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. या स्मारका शेजारीच एका व्यक्तीने पत्र्याचे शेड टाकून अतिक्रमण केले आहे. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारका भोवती होणाऱ्या सुशोभीकरणाच्या कामात अडथळा निर्माण होत आहे. या अतिक्रमणाविषयी नगरपंचायत कार्यालय येथे वेळोवेळी पाठपुरावा करून सुद्धा कोणतीही कारवाई अथवा दखल घेतली जात नसल्याने या पूर्वी ही नगरपंचायत कार्यालयास बौद्ध समाज बांधावा तर्फे



दिनांक 4 जानेवारी 2023 रोजी रीतसर अतिक्रमण काढण्यात यावे यासाठी निवेदन देण्यात आले आहे. परंतु या निवेदनावर अद्याप पर्यंत कुठलीच कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे आज गुरुवार दि.20 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मरकाशेजारील नवीन अतिक्रमण काढून टाकण्याच्या मागणीसाठी आमरण उपोषण सुरू करण्यात आले असून यांची नगरपंचायत कार्यालयाने सदर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन होणार अनुचित प्रकार टाळावा असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# अस्तित्वाच्या लढतीसाठी भर उन्हात प्रचाराचे तांडव

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** तालुक्यात सध्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीचा धुराळा चालू असल्याने दि.२२एप्रिल रोजी रखरखत्या उन्हात रिंगणात उभ्या असलेल्या पँनलच्या उमेदवारांनी नारळ वाढुन प्रचार धुमाळीस सुरुवात केल्याने तालुक्यात सर्वच ठिकाणी निवडणूक मय वातावरण तयार झाले आहे. त्यामुळे अस्तित्वांच्या या रणसंग्रामात कोणाच्या अंगावर विजयी गुलाल पडणार याकडे संपूर्ण तालुक्यातील जनतेचे लक्ष लागुन राहिले आहे. सध्या तालुक्यात फक्त बाजार समितीच्या निवडणूकीचे रंगतदार वातावरण असल्याने फक्त विजयी कोणी होणार या चर्चेला उधाण आले आहे. सध्या दिंडोरी बाजार समिती निवडणूकीत आपले अस्तित्व टाकुन राहाण्यासाठी उमेदवारांनी निवडणूक रिंगणात उडी घेऊन आपली कंबर बांधली आहे. त्यात यंदाच्या निवडणूकीचे ठळक वैशिष्ट्ये म्हणजे अनेक ग्रामपंचायत सदस्यांनी रणसंग्रामात उडी घेतल्याने व आपल्या गावांतील केलेला विकास कामांचा मुद्दा मतदार राजांसमोर ठेवत आपले नशीब अजमवण्यांचा यातून प्रयत्न होणार असे चित्र सध्या दिसत आहे.

यंदा च्या निवडणूकीत सत्तेवर असणाऱ्या असलेल्या संचालक मंडळाला आवाहन देण्यासाठी माजी आमदार रामदास चारोस्कर, ज्येष्ठ सहकार नेते सुरेश डोखळे , भाऊलाल तांबडे,नरेंद्र जाधव,विलास कड , शहाजी सोमवंशी,प्रकाश शिंदे इ.नी परिवर्तन पँनल ची निर्मिती करून एक प्रकारे आवाहन दिल्याने तालुक्यातील राजकीय वर्तुळात विविध स्वरूपांची रंगत आहे.

सहकारी संस्था एकुण मतदार संख्या आहे ७०५,ग्रामपंचायत मधून १११७,व्यापारी संघातून ४५९,हमाल तोलारी ५० असे एकुण २३३१ मतदार मतदान करणार आहे .सध्या दुरंगी लढत होत असल्याने विजयी गुलाल कोणांवर पडणार याकडे संपूर्ण तालुक्यातील जनतेचे लक्ष लागुन राहिले आहे . कारण ही निवडणूक म्हणजे पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणूकीची एकप्रकारे रंगीत तालीम ठरणार आहे .



त्यामुळे नवीन चेहऱ्यांना संधी मिळणार का ? याकडे सर्वाच्या नजरा लागुन राहिल्या आहेत.

दुरंगी लढतीमध्ये अनेक मातब्बर नेते मंडळी आपल्या नशीबांला कौल देण्यासाठी सज्ज झाले असून मतदार बंधूना आपलेसे करण्यावर भर देत आहे. त्यात शेतकरी उत्कर्ष पँनलचे विद्यमान सभापती दत्तात्रय पाटील, मविप्र संचालक प्रविण जाधव,इ.मातब्बर नेते मंडळी निवडणूक रिंगणात आपला पँनल निवडून आणण्यासाठी प्रयत्नशील आहे.

बाजार समितीत एकुण १८ जागांसाठी जवळजवळ४२ उमेदवार निवडणूक रिंगणात आपले नशीब अजमवत आहे. सध्या तालुक्यात सुर्याने आग ओकायला सुरुवात केल्याने व सध्या तालुक्यात तापमानांत दिवसेंदिवस वाढ होत असली तरी निवडणूकीतील उभे असणारे उमेदवार रखरखत्या उन्हात सध्या प्रचार मोठ्या प्रमाणावर करीत आहे.

# वैजापुरात ईद-उल-फित्र-रमजान ईद उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील ईद गाह मैदानावर शहर व पंचक्रोशीतील मुस्लिम बांधव साडे आठ वाजता एकत्र आले व अल्लाहतालाला प्रार्थना केली की, देशात शान्ती नांदू दे,बधूता नांदू दे,दीन दुबळे यांच्या व्यथा व पीडा दूर होऊ दे,देशवाशीयंचे आरोग्य चांगले राहू दे,देशांत शान्ती व बधूता, एकता नांदू दे असे म्हणत ईद-उल,-फित्र ची नमाज अदा केली,आ,रमेश बोरनारे यानी नमाज अदा करण्याच्या जगी पन्नास लक्ष रुपए देऊनमोठा चबुतरा बांधून दिल्या बधल त्यांचे विशेष आभार मानण्यात आले, प्रसंगी आ,रमेश पा,बोरनारे,माजी आ,भाऊसाहेब पा,चिकटगावकर,माजी नगराध्यक्ष बाळासाहेब संचेती,उप विभागीय पोलिस अधिकारी महक स्वामी,तहसीलदार राहुल गायकवाड,मुख्याधिकारी भागवत बिघोत, पो.नि.संजय लोहकरे , शिवसेना तालुका प्रमुख राजेन्द्र साळुंके,शहर प्रमुख पारस घाटे, प्रशांत सदाफळ, विशाल संचेती,दिनेश राजपूत,सचिन वाणी,संजय निकम, आप्पासाहेब पाटिल, माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, देवीदास वाणी,नगरसेवक डॉ,निलेश भाटिया, दशरथ बनकर, शैलेश चव्हाण,राजेश गायकवाड, न्यानेश्वर टेके,अमोल बोरनारे,संजय बोरनारे,प्र शांत शिंदे, प्रमोद निकाले,रमेश त्रिभुवन, जितेंद्र चापानेरकर,यानी उपनगराध्यक्ष साबेरखान, सदर -ए काझी हफिजोधिन,राजू काझी, मजीद कूरेशी,इम्रान कूरेशी,अखिल शेख,मस्जिद इमाम नादीम,व सर्व मुस्लींम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या,चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# ॲड. तनुजा जमशेर तडवी यांना सावित्रीबाई फुले गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** जळगाव जिल्ह्यातील बोरखेडा खुर्द ॲड तनुजा तडवी यांना दि. १३ एप्रिल २०२३ रोजी बृहन्मुंबई महानगर पालिका सावित्रीबाई स्त्री संसाधन केंद्र यांच्या तर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमादरम्यान ॲड. तनुजा तडवी सहा. कायदा अधीकारी विधी विभाग बृहन्मुंबई महानगर पालिका यांना सावित्रीबाई फुले पुरस्कार राज्य महिला आयोग अध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांच्या हस्ते बहाल करण्यात आला हा पुरस्कार तनुजा तडवी यांच काम कार्य चांगले न्याय मिळवुन देनारे असल्यामुळे देण्यात आला तनुजा तडवी यांच मुळ गाव बोरखेडा खुर्द ता.यावल जि.जळगाव .सध्या यावल आहे तनुजा तडवी यांना हा पुरस्कार मिळाल्या बद्दल त्यांच खुप कौतुक होत आहे आणि संपुर्ण आदिवासी समाजा तर्फे त्यांच अभिनंदन होत असून पूर्ण परिसरामधून शुभेच्छांचा त्यांच्यावर वर्षाव होत आहे.

